(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला.)

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, आज राज्य विधिमंडळाच्या या वर्षातील पहिल्या अधिवेशनामध्ये माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर झालेल्या चर्चेला उत्तर देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार कै.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षाच्या शुभारंभाच्या कामाला सुरुवात झालेली आहे. या वर्षामध्ये महाराष्ट्राच्या विकासाची दिशा कशाप्रकारे असावी याबद्दल आपल्याला या चर्चेतून काही उद्बोधन घेण्याची गरज आहे. माननीय विरोधी पक्ष नेते, विविध पक्षाचे गट नेते, सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन शासनाला अतिशय महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. त्याबद्दल मी सर्वांचे प्रथम मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, राज्यपालांचे अभिभाषण हा एक प्रथेचा भाग असला तरी त्यावरील संपूर्ण चर्चा गांभीर्यपूर्वक वातावरणात व अभ्यासपूर्ण व्हावी व प्रत्येक मुद्याला शासनाने उत्तर द्यावे किंवा त्या मुद्यांची नोंद घेऊन त्या दिशेने धोरणामध्ये परिवर्तन करावे अशी सर्वसामान्य जनतेची अपेक्षा असते. गेल्या दोन वर्षात राज्यपालांच्या अभिभाषणावर झालेल्या चर्चेतील मुद्यांचा मी स्वत: गंभीरपणे अभ्यास केलेला आहे. या वर्षी चर्चेच्या दरम्यान झालेली भाषणे काही वेळ मी सभागृहात व काही वेळ माझ्या खोलीमध्ये बसून ऐकलेली आहेत. त्यातून पुढे जाण्याचे कार्य सुकर होईल अशी मला खात्री आहे. आज आपण यशवंतराव चव्हाण साहेबांचे नाव घेतो. त्यांनी राज्यकारभाराला सुरुवात करुन दिली ती दिशा सोडून आपण वेगळया दिशेने चाललो आहोत काय असा विचार केला तर विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र खूप पुढे गेल्याचे दिसून येते. त्यावेळचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

संदर्भ, त्यावेळची प्राथमिकता आणि आजची प्राथमिकता, आजची लोकसंख्या, राज्यात होणारे नागरीकरण, होणारा विकास या गोष्टी वेगळ्या आहेत आणि आपले प्रश्नही वेगळे आहेत. परंतु त्यांनी प्रशासनाला दिलेली दिशा व गेल्या काही वर्षात आपण ज्या दिशेने आपण चाललो आहोत, त्याबद्दल गंभीरपणे विचार करण्याची गरज निर्माण झालेली आहे याबद्दल कोणाच्याही मनामध्ये शंका नाही.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

महाराष्ट्र हे एक अग्रणी राज्य राहिलेले आहे. जगाच्या मोठ्या राष्ट्रांची लोकसंख्या पाहिली तर त्या मालिकेमध्ये महाराष्ट्राचा 12वा नंबर लागतो. युरोप मधील कोणत्याही राष्ट्रापेक्षा आपल्या राज्याची लोकसंख्या जास्त आहे. अमेरिकेतील कोणत्याही राज्यापेक्षा आपल्या राज्यातील लोकसंख्या जास्त आहे. म्हणून आपल्या राज्याबद्दल विचार करताना आपल्याला त्या दृष्टीने विचार केला पाहिजे. म्हणून आपण आपल्या राज्याला महाराष्ट्र असे म्हणतो. अत्यंत महत्वाच्या टप्प्यावर आपण येऊन पोहोचलो आहोत. या अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना विरोधी पक्षाकडून जे जे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत ते राजकीयदृष्टया प्रेरित होऊन उपस्थित केलेले आहेत. जी टीका केलेली आहे ती राजकीयदृष्टया प्रेरित होऊन केलेली आहे. असे असले तरी त्यामध्ये हरकत घेण्यासारखे काही नाही. सकारात्मक टीका असेल तर तिचे स्वागत केले पाहिजे. परंतु काही वैयक्तिक टीका झाली. त्या टीकेचा राज्याच्या राजकारभाराच्या दृष्टीने किती उपयोग होतो किंवा अशा प्रकारची टीका कशाकरिता केली जाते याचे कित्येत वेळा वैषम्य वाटते. विरोधी पक्षाकडे आता टीका करण्यासारखे मुद्दे राहिलेले नाहीत म्हणून त्यांची गोंधळलेल्या सारखी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे त्यांनी राज्यपालांच्या अभिभाषणाला भरकटलेले अभिभाषण अशी नेहमी सारखी टीका केलेली आहे. त्या टीकेकडे अधिक लक्ष न देता जे मूळ मुद्दे उपस्थित झालेले आहे त्यांना मी उत्तर देणार आहे.

सभापती महोदय, सर्वप्रथम औद्योगिकदृष्टया महाराष्ट्र आघाडीवर आहे की नाही या बद्दल सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काही मुद्दे उपस्थित केले. मला या ठिकाणी आवर्जून सांगावयाचे आहे की महाराष्ट्र हे उद्योगाच्या बाबतीत अग्रगण्य राज्य आहे आणि राहिल. यापेक्षा अधिक गतीने त्याला पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न चालू राहील. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम नावाची जागतिक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. या संस्थचे दरवर्षी स्वित्झर्लंड मधील डाओस या ठिकाणी अधिवेशन भरते. त्या अधिवेशनाला उपस्थित राहाण्यासाठी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री या नात्याने मला निमंत्रण होते. परंतु अन्य कामामुळे मला त्यांचे निमंत्रण स्वीकारता आले नाही. इंडिया इकॉनॉमिक समिट नावाचे भारताचे महाअधिवेशन गेल्या 27 वर्षापासून दिल्लीमध्ये होत होते. यावर्षी आम्ही त्यांना निमंत्रण दिले आणि पहिल्यांदा ते मुंबईमध्ये भरविण्यात आले. हा मुंबईचा आणि महाराष्ट्राचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

बहुमान आहे. अनेक आंतरराष्ट्रीय नेते, काही पंतप्रधान, काही उद्योगमंत्री, व्यापार मंत्री त्या अधिवेशनामध्ये आले आणि यशस्वीपणे ते अधिवेशन पार पडले. त्या दृष्टीने मुंबई आणि महाराष्ट्र जगामध्ये फोकस होण्यास मदत झाली. त्यानंतर महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून त्यांनी मला डाओसला येण्याचे निमंत्रण दिले होते.

सभापती महोदय, निर्यातीच्या दृष्टीने काही टक्केवारी सांगण्यात आली. मी आपल्याला सांगू इच्छितो की महाराष्ट्राची औद्योगिक उत्पादनाची संख्या असेल, महाराष्ट्राच्या औद्योगिक रोजगाराचा आकडा असेल, महाराष्ट्रामध्ये झालेली गुंतवणूक असेल, त्या बाबतीत व विशेषत: जी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये झाली त्या गुंतवणुकीच्या बाबतीत विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, महाराष्ट्राचे आकडे हे दादरा, नगरहवेली, दीव, दमण यांच्यासह असतात आणि ते खरे आहे. कारण आरबीआयचे जे मुंबईतील कार्यालय आहे ते सर्वांचे आकडे एकत्रित करुन आकडेवारी प्रसृत करते. वेगळे आकडे आपल्याला मिळू शकतील. परंतु जी प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक आली त्याचे आकडे आरबीआयच्या माध्यमातून माझ्याकडे आलेले आहेत. मला वाटते माननीय विरोधी पक्षनेत्यांकडेही ते आकडे असतील. त्यामध्ये महाराष्ट्र, दादरा, नगरहवेली आणि दीव दमण यांच्याकडे देशातील एकूण गुंतवणुकीच्या 34 टक्के परकीय गुंतवणूक आलेली आहे. या ठिकाणी गुजराथ राज्याची बरीच तारीफ करण्यात आली. गुजराथ राज्यामध्ये फक्त 5 टक्के परकीय गुंतवणूक आलेली आहे. अर्थातच आपापल्या राज्यात उद्योग येण्याच्या दृष्टीने चढाओढ निर्माण झालेली आहे आणि त्यामध्ये काही गैर आहे असे मानण्याचे कारण नाही.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

देशात येणारा प्रत्येक उद्योग हा महाराष्ट्रातच आला पाहिजे. आपण प्रत्येक उद्योग महाराष्ट्रात आणण्याचा प्रयत्न करतो. काही प्रकल्प महाराष्ट्रात न येता इतर राज्यात जातात. जवळपास बंदराची सोय असते तसेच त्यांची त्या ठिकाणी काही गुंतवणूक असते म्हणून ते इतर राज्यात जातात. महाराष्ट्रात कोणकोणते उद्योग आलेले आहेत त्या बाबतची माहिती सभागृहाला देत आहे. मॅन्युफॅक्चरींग उद्योग पाहिले तर त्यात मर्सिडीज, महिंद्रा, भारत फोर्ज, बजाज, फोर्ड मोटार, व्होक्स वॅगन, ह्युंदेई या कंपन्या महाराष्ट्रात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या भाषणात एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला आहे, ते भाषण मी पाहिले. जनरल इलेक्ट्रीक ही जगातील पाच मोठया कंपन्यापैकी एक मोठी कंपनी आहे. ती कंपनी आपल्या येथे आली. परंतु त्या कंपनीला सुविधा न मिळाल्यामुळे निघून गेली असा त्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केलेला आहे. तो उल्लेख मी दुरुस्त करु इच्छितो. जनरल इलेक्ट्रीक कंपनीचे मालक काही दिवसापूर्वी मुंबईत आले होते. त्यांना मी भेटीचे निमंत्रण दिले होते. त्यांच्याबरोबर स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या स्नेहभोजनास मी माझ्या सहकाऱ्यांनाही बोलाविले होते. त्या बैठकीमध्ये महाराष्ट्रात पुणे जिल्हयातील चाकण परिसरामध्ये मोठी गुंतवणूक करण्याचे त्यांनी आश्वासन दिले होते. अमेरिकेचे व्यापार मंत्री या महिन्यात किवा त्यांची तारीख निश्चित झाली नाही तर अधिवेशन संपल्याबरोबर मुंबईत येणार आहेत, त्यांचेसमोर महाराष्ट्र सरकार आणि जनरल इलेक्ट्रीक कंपनी यांच्यामध्ये सामंजस्य करार होणार आहे. त्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबतचे निमंत्रण मी माननीय विरोधी पक्षनेते यांना देत आहे. त्यामुळे ही कंपनी महाराष्ट्राबाहेर गेली आहे असे म्हणणे बिलकूल चुकीचे आहे. त्याचबरोबर ब्रिजस्टोन मोटार ही जगात सर्वात मोठी ट्रक उत्पादन करणारी कंपनी आहे. त्या कंपनीचे काम येथे सुरु झालेले आहे. अनेक कंपन्या राज्याच्या विशाल धोरणांतर्गत या ठिकाणी आलेल्या आहेत.

सभापती महोदय, विशाल प्रकल्पाबद्दल माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये काही आकडे दिले आहेत. माझ्याकडे सगळया आकडेवारीची यादी आहे, त्या यादीतील सगळी माहिती आपल्याला देऊ इच्छितो. 303 प्रकल्प हे विशाल धोरणाचा स्वीकार केल्यानंतर आलेले आहेत. उद्योगातून किती गुंतवणूक झालेली आहे, त्यापैकी मागासलेल्या भागात किती प्रकल्प गेले याची

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

देखील माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. जवळपास 7 टक्के उद्योग हे मागास भागात गेलेले आहेत. त्याबाबतची संपूर्ण यादी सन्माननीय सदस्यांना देऊ इच्छितो. ती यादी पाहिली तर प्रचंड मोठया प्रमाणात गुंतवणूक झालेली असे आपल्याला दिसून येईल. औद्योगिक उत्पादनामध्ये 9.50 टक्के लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्राचा वाटा 18 टक्के आहे. परदेशी गुंतवणूक 34 टक्के आहे. रोजगार निर्मितीच्या बाबतीत 26 उद्योग समुहामध्ये एकंदरीत मोजमाप केले जाते. या 26 उद्योग समूहामध्ये जवळजवळ दहा उद्योग समूहामध्ये आपला प्रथम क्रमांक आहे. यापैकी 20 उद्योग समूहामध्ये आपण दोन किंवा तीन क्रमांकावर आहोत. 27 टक्के निर्यात आपल्या राज्यातून होते. उद्योगधंद्यांच्या बाबतीमध्ये महाराष्ट्राचा दर्जा हा कमी व्हावयास लागला आहे असे म्हणणे बिलकूल सत्य नाही.

सभापती महोदय, मी विशाल प्रकल्पाची माहिती देत होतो. 303 विशाल प्रकल्प महाराष्ट्रात आलेले आहेत. अमरावती, नागपूर, औरंगाबाद व कोकण विभाग या ठिकाणी 174 प्रकल्प आलेले आहेत. त्यात वस्त्रोद्योगाचे किती प्रकल्प आहेत, मॅन्युफॅक्चरींगचे किती प्रकल्प आहेत याची माहिती मी कालांतराने देतो. नागपूर विभागामध्ये 100, औरंगाबाद विभागात 43 आणि कोकण विभागात 42 एवढे प्रकल्प आहेत. दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर हा केंद्र शासनाचा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. तो प्रकल्प महाराष्ट्रातील ज्या ज्या भागातून जाणार आहे. त्या प्रकल्पाच्या माध्यमातून 2 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून 23 लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. विदर्भात सगळयात महत्वाचा मिहान प्रकल्प आहे. 2000 या वर्षापासून हा प्रकल्प रखडला होता. मी माझ्या कामाला सुरुवात केली तेव्हा असे लक्षात आले की, अनेक महत्वाचे प्रकल्प प्रलंबित आहेत. ते थंडया बस्त्यात ठेवले होते. ते प्रकल्प राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे होते. त्या प्रकल्पांना चालना देण्याचा मी प्रयत्न केला आहे. महत्वाचे उदाहरण नागपूरच्या मिहान प्रकल्पाचे देऊ इच्छितो.

यानंतर श्री. भोगले...

अनुधावित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

आपण त्या प्रकल्पासाठी काही हजार हेक्टर जमीन घेतली. परंतु किरकोळ म्हणजे 150 हेक्टर जमीन न घेतल्यामुळे, ती जमीन दुस-या धावपट्टीच्या क्षेत्रात येत असल्यामुळे प्रकल्प रखडला होता आणि त्या प्रकल्पाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाला होता. जो मोठा एव्हिएशन हब निर्माण करावयाचा आहे तो होईल की नाही असा प्रश्न निर्माण झाला होता, तो प्रश्न आता आम्हाला सोडविता येईल. जमीन अधिग्रहण झालेल्या लोकांना 12.5 टक्के जमीन परताव्याचा मोबदला देत असताना विकसित जमिनीऐवजी रोख रक्कम असा पर्याय दिल्यामुळे तो प्रश्न आता मार्गी लागेल. त्यामुळे मिहान प्रकल्पामध्ये आता मोठमोठ्या कंपन्यांचे प्रकल्प येऊ लागले आहेत.

सभापती महोदय, गेल्या आठवड्यात नागपूरला इन्फोसिस ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची आय.टी.क्षेत्रातील कंपनी आलेली आहे, ही कंपनी त्या ठिकाणी जवळजवळ 8 हजार इंजिनिअर्सना रोजगार देणार आहे. महिन्याभराच्या आधी देशातील सर्वात मोठी आय.टी.कंपनी टी.सी.एस.लिमिटेड या कंपनीने त्या ठिकाणी भूमीपूजनाचा कार्यक्रम केला आहे. मिहान प्रकल्पामधील बोईंग विमान कंपनीचे काम जोरात सुरु आहे. एच.सी.एल., महिंद्रा सत्यम या कंपन्यांनी त्या परिसरात जमीन घेतली आहे आणि त्यांनी त्यांचे काम सुरु केले आहे. आम्ही जमिनीबद्दलचा आणि दुसरी धावपट्टी करण्याचा जो निर्णय घेतला त्यामुळे नागपूर परिसरात 10 वर्षापासून रेंगाळत पडलेल्या महत्वाकांक्षी मिहान प्रकल्पाचे काम वेगाने पुढे जायला सुरुवात झाली आहे.

सभापती महोदय, समतोल विकास करणे आणि त्या विकासाची पुन्हा पाहणी करणे यासाठी डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली नवीन आयोग स्थापन केल्याचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात केलेला आहे. त्या डॉ.विजय केळकर आयोगामार्फत अनेक विभागांमध्ये जाऊन बैठका घेऊन त्यांचा अहवाल लवकरच शासनास सादर केला जाईल. तरी पण या राज्यातील 12 जिल्हयांचा मानवी विकास मूल्यांक देशातील सरासरीपेक्षा कमी आहे. म्हणून राज्याने मानवी विकास अभियानामध्ये पुन्हा बदल करुन तालुका हा केंद्रबिंदू मानून जिल्ह्याऐवजी तालुका गृहित धरुन राज्यातील 1/3 म्हणजे जवळजवळ 125 तालुक्यांवर फोकस करण्याकरिता प्रयत्न सुरु केला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

सभापती महोदय, विजेच्या बाबतीत देखील घोषणा केली होती. डिसेंबर, 2012 पर्यंत राज्य भारनियमन मुक्त करण्याकरिता राज्य शासनाने प्रयत्न सुरु केले आहेत. खापरखेडा येथील 500 मे.वॅट आणि भुसावळ येथील 500 मे.वॅटचा पहिला संच असेल किंवा जल विद्युत निर्मितीच्या माध्यमातून 74 लहान प्रकल्पामधून 200 मे.वॅट वीज निर्मिती असेल, अशा प्रकारे महानिर्मिती कंपनीने स्वत:चे प्रकल्प हाती घेतले आहेत आणि त्यामधून 1500 मे.वॅट वीज निर्मितीचे उद्दिष्ट साध्य होईल अशी अपेक्षा आहे. खाजगी वीज निर्मिती उद्योग देखील चालू आहेत. राज्य विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेनुसार राज्यामध्ये सिंगल फेजिंग आणि कृषी पंप वाहिन्यांपैकी 50 टक्के कृषी खात्यांना रात्रीच्या वेळी 10 तास वीज उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये मध्यंतरीच्या काळात कोळशामुळे अडचण निर्माण झाली होती. परंतु राज्याला भारनियमन मुक्त करण्याचे धोरण आहे ते निश्चितपणे यशस्वी होईल याबद्दल मला अडचण वाटत नाही.

सभापती महोदय, आज शेतीबद्दल अनेक अडचणीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. महाराष्ट्रामध्ये जवळजवळ 83 टक्के शेती कोरडवाहू आहे. त्यात पावसाचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाले तर लगेच उत्पादनावर परिणाम होतो. दर खाली वर होतात. मध्यंतरीच्या काळात काही धोरणामुळे कापसाची निर्यातबंदी असेल, साखरेची निर्यातबंदी असेल, कांद्याची निर्यातबंदी असेल, हे नागरी ग्राहकांच्या हिताचे घेतलेले निर्णय शेतकऱ्यांच्या दृष्टीने अपायकारक ठरतात. त्याकरिता जे निर्णय केंद्र सरकारने घेतले त्याबाबत राज्याच्या प्रयत्नाने किंवा आपल्या सर्वांच्या प्रयत्नाने कित्येक वेळेला सर्वपक्षीय शिष्टमंडळांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे जाऊन ते निर्णय आपण बदलून घेतले आहेत. तरी पण काही काही वेळेला दरामध्ये चढउतार होत असतात. त्यामुळे पहिल्या वर्षी आपण 1 हजार कोटीचे पॅकेज दिले. यावर्षी 2 हजार कोटींचे पॅकेज दिले आहे. त्या पॅकेजबद्दल देखील याठिकाणी चर्चा करण्यात आली. काहींना पैसे मिळाले नाहीत असे सांगितले गेले. ही गोष्ट खरी आहे की.....

नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

इतक्या मोठ्या प्रमाणात आतापर्यंत आपल्या राज्यामध्ये किंबहुना देशात केंद्र सरकार सोडून कुठेही, कोणत्याही राज्यात मदतीचा हात मिळाला नाही एवढी मदत आपल्या राज्याला मिळत आहे. ती कोणकोणत्या क्षेत्रात दिलेली आहे त्याची आकडेवारी घेण्यासाठी वेळ लागेल पण 300 कोटीची ही मदत देण्यात आलेली आहे. तसेच यावर्षी बजेटच्या तरतुदीप्रमाणे 1800 कोटीची तरतूद करण्यात आली असून प्रत्येकाला ते पैसे मिळतील यात शंका नाही. त्याचबरोबर दूरदृष्टीने ग्रुप इन्शुरन्सच्या माध्यमातून विमा उतरविण्याचे काम सुध्दा आपल्याला करावे लागेल. अद्याप त्यात फार मोठे यश आलेले नाही, कारण केंद्र सरकारने काही तांत्रिक अडचणी निर्माण केलेल्या आहेत. तरी सुध्दा या पध्दतीत काही बदल करण्यासाठी केंद्र सरकारकडे आपले प्रयत्न चालू आहेत.

मागील दोन वर्षात राज्यात बियाण्याचे पुरेसे वाटप झालेले आहे. विदर्भातील अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा, अकोला आणि वर्धा या आत्महत्याग्रस्त 6 जिल्ह्यांमध्ये सोयाबीन, तूर इ. पिकांचे बियाणे बदलण्याचा कार्यक्रम आपण गेल्या दोन वर्षात राबविला आणि त्याला चांगल्या प्रकारचे यश आलेले आहे. अर्थात तुरीच्या किंमतीबद्दल पुन्हा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्या अनुषंगाने आपण केंद्र सरकारला विनंती केलेली आहे की, प्रति क्विंटल 500 रुपये प्रमाणे तुरीला जे अनुदान दोन महिन्यासाठी देण्याचा निर्णय राबविला होता तो कायमस्वरुपी राबवावा.

महोदय, पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाबद्दलचा प्रश्न देखील सभागृहात उपस्थित करण्यात आला. त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, पोलीस दलाचे आधुनिकीकरण झालेले नाही असा जो आरोप करण्यात आला तो संपूर्णपणे बिनबुडाचा आहे. नुकतेच केंद्रीय गृह मंत्री मुंबईत येऊन गेले. त्यांनी तळेगांव येथे एनएसजी हबचे उद्घाटन केले. त्याप्रमाणे तळेगांव येथे अत्याधुनिक तंत्राच्या मदतीने स्फोटके निकामी करण्यासाठी प्रशिक्षण केंद्र देखील कार्यान्वित करण्यात आले. गुप्त वार्ता यंत्रणेचे जाळे पसरविणे, नक्षलविरोधी प्रचार करणे, नक्षलवाद्यांना अटक करुन त्यांचे नेतृत्व नष्ट करणे अशा प्रकारे विविध उपाययोजना केल्या आहेत. तसेच कोब्रा बटालियन, सीआरपीएफचे विशेष कृती दल यांच्या कार्यक्षमतेमुळे नक्षलवाद्यांचे 7 दलम निष्क्रीय झालेले आहेत अशी माझी माहिती आहे. तसेच नक्षलविरोधी कारवाया रोखण्यासाठी आपण 1054 पोलीस शिपायाची पदे निर्माण केली. तसेच 13 नवीन दूर क्षेत्रे निर्माण केलेली आहेत. त्यात

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

जंगल टॅक्टीज प्रशिक्षण, अल्फा हब प्रशिक्षण केंद्रे निर्माण केलेली आहेत. कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांना पदोन्नती, वेतन, प्रोत्साहन भत्ता, ट्रायबल अलाऊंसेस देणे वगैरे प्रयत्न केले आहेत. त्यामुळे नक्षलवाद्यांची संख्या कमी करण्यात जरुर मदत होईल. अर्थात ही लढाई आपण पूर्णपणे जिंकलेलो नाही नक्षलवाद्यांची संख्या मात्र कमी करण्यात यशस्वी झालो आहोत. त्याचप्रमाणे पोलिसांची हेल्पलाईन चालत नाही, त्यावर पोलीस सापडत नाहीत अशा प्रकारच्या तक्रारी करण्यात आल्या. त्यासंदर्भात मी पोलीस महासंचालकांना माहिती घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

महोदय, राज्यात झाडांची संख्या वाढावी म्हणून एक कार्यक्रम राबविण्याचे प्रयत्न आपण सुरु केले आणि त्या कार्यक्रमाबद्दल टीकाही झाली. या कार्यक्रमानुसार 100 कोटी झाडांची लागवड करण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम सुध्दा आपण घेतला असून त्यात राज्य शासनाच्या सर्वच विभागांना सामील करुन घेण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक महिन्याच्या 15 आणि 25 तारखेला प्रत्येक जिल्ह्यात किती रोपटी तयार झाली, कशा प्रकारे कार्यक्रम राबविला जात आहे याबद्दलचा अहवाल मुख्य सचिवांकडे येईल अशी व्यवस्था केली आहे. मला वाटते जगाच्या पाठीवर हा एक सर्वात मोठा कार्यक्रम असेल अशी मला खात्री आहे.

कोयना नदीचे पाणी कोकणाला देण्यासाठी सभागृहात मुद्दा उपस्थित करुन तशी मागणी करण्यात आली. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि ठाणे या चार जिल्ह्यांमध्ये तसेच मुंबई व उप नगर या भागात पिण्यासाठी व सिंचनासाठी खाजगीकरणातून बीओटी तत्वावर हे पाणी द्यावे अशीही सूचना करण्यात आली. यासंबंधी शासन स्तरावर प्राथमिक चर्चा चालू आहे. पण माझ्या मते हा प्रकल्प अत्यंत महागडा आहे. असे असले तरी व्यावहारिक असेल तर निश्चितपणे तो करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

महोदय, संपूर्ण राज्यात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविण्याचे प्रयत्न शासन करीत असून त्या माध्यमातून गंभीर आजारामुळे एखाद्या गरीब कुटुंबाचे कंबरडे मोडते. त्यात कर्करोग किंवा हृदयरोगासारखे भयंकर रोग असतात त्यावर उपचार करताना गरिबांची दमछाक होते. आपल्याकडे अशांची संख्या जवळपास 85 टक्के असून त्यातील ज्यांचे उत्पन्न 1 लाखापेक्षा

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

कमी असेल त्यांना ही मदत करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यासाठी आपण एका राष्ट्रीयकृत इन्शुरन्स कंपनीच्या निविदा स्वीकारलेल्या आहेत. त्या कंपनीच्या माध्यमातून कॉल सेंटर वगैरे प्रक्रिया सुरु झालेली असून सुरुवातीला पहिल्या टप्प्यात 8 जिल्ह्यांचा या योजनेत समावेश करण्यात आला असून त्यानुसार ओळख पत्रे तसेच आरोग्य कार्डांचे वितरण सुध्दा जवळपास 4.10 लाख लोकांना करण्यात आले आहे, उर्वरित वितरण एप्रिल अखेर पूर्ण होणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण ....

सभापती महोदय, राज्याच्या आर्थिक स्थितीबद्दल या ठिकाणी चर्चा केली गेली. यामध्ये राज्य सरकारवर कर्जाचा डोंगर आहे, राज्याच्या तिजोरीमध्ये खडखडाट आहे, असे शब्दप्रयोग करण्यात आले होते. यासंदर्भात मला असे सांगावेसे वाटते की, जगामध्ये आर्थिक मंदीचे वातावरण असतांना देखील आपल्या राज्याची आर्थिक स्थिती सुदृढ आहे.

सभापती महोदय, सन 2008-2009 मध्ये राज्याचे महसुली उत्पन्न 81 हजार कोटी रुपये होते, सन 2009-2010 पर्यन्त ते 86 हजार कोटी रुपयांवर पोहोचले, सन 2010-2011 मध्ये 1 लक्ष 6 हजार कोटी रुपये झाले आणि या वर्षी 1 लक्ष 21 हजार कोटी रुपयांवर जाणार आहे. याचा अर्थ, राज्याच्या महसुली उत्पन्नामध्ये भक्कम वृध्दी होत आहे.

सभापती महोदय, राज्यावर कर्जाचा डोंगर आहे, राज्याला फार मोठी देणी द्यावयाची आहेत, अशी टीका करण्यात आली. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, राज्याचे कर्ज आणि उत्पन्नाची आकडे पाहिली तर आपल्याला असे दिसून येईल की, राज्यावर सन 2009-2010 मध्ये 26 हजार कोटी, सन 2010-2011 मध्ये 18 हजार कोटी व सन 2011-2012 मध्ये 22 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. कर्जाची ही रक्कम राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या मानाने कमी आहे. इतर राज्यांशी तुलना केली तर आपल्या राज्याचे कर्ज खूप कमी आहे. राज्य सरकारवर सन 2005 नंतर एकदाही ओव्हरड्राफ्ट घेण्याची वेळ आलेली नाही, हे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, संचित कर्ज आणि स्थूल उत्पन्नाची आकडेवारी पाहिली तर महाराष्ट्राच्या कर्जाची टक्केवारी 26.7 टक्के असून गुजरात सरकारची 31 टक्के, उत्तर प्रदेशची 45 टक्के, बिहार 39 टक्के, मध्य प्रदेशची 37 टक्के आहे. महाराष्ट्र राज्याची संचित कर्जाची एकूण टक्केवारी अतिशय समाधानकारक आहे, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. या ठिकाणी मी जी संचित कर्जाची आकडेवारी दिलेली आहे, ती आरबीआयने जाहीर केलेली आकडेवारी आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारच्या निकषानुसार व्याज प्रदानाच्या क्षमतेला फार महत्व आहे. राज्याला राज्याच्या एकूण महसुलाच्या 20 टक्क्यापेक्षा जास्त व्याज द्यावे लागले तर त्याला धोक्याची घंटी समजली जाते. परंतु आपल्या राज्याची आकडेवारी पाहिली तर सन 2009-2010

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

मध्ये 17 टक्के होती, सन 2010-2011 मध्ये ती 15 टक्क्यांवर आली व सन 2011-2012 मध्ये ती 14.85 टक्क्यांवर गेलेली आहे. याचा अर्थ, आपली व्याज प्रदानाची टक्केवारी 20 टक्क्यांपेक्षा खूप कमी आहे.

सभापती महोदय, भारत सरकार असेल किंवा अमेरिकन सरकार असेल, जवळपास प्रत्येक देशाला कर्ज काढावेच लागते. परंतु कर्ज परत करण्याची क्षमता आहे की, नाही ही महत्वाची बाब असते.

सभापती महोदय, या ठिकाणी सरकारवर टीका करण्याचा प्रयत्न केला गेला. मी सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे हे पहिलेच अधिवेशन असल्यामुळे मी समजू शकतो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा नेहमीच राहतील. विरोधी पक्ष नेत्यांनी वैयक्तिक मुद्दा करुन असे भाष्य केले की, राज्याचे मुख्यमंत्री वारंवार दिल्लीला जात असतात. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, मी राज्याच्या हिताचे प्रश्न सोडविण्यासाठी दिल्लीला गेलो नाही, असे आपण मला दाखवून द्यावे. मी दिल्ली येथे किती वेळा, कोणत्या कामासाठी गेलो होतो याची माहिती आपण माहितीच्या अधिकाराखाली घेऊ शकता. योजना आयोगाच्या बैठकांसाठी, राज्याचा प्लॅन मंजूर करण्याच्या बैठकांसाठी मी गेलो होते. राज्यातील शेतक-याला 600 कोटी रुपये प्राप्त करुन घेण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळाला घेऊन मी दिल्लीला गेलो होतो. कापूस, साखर, कांदा या पिकांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित झाल्याबरोबर दिल्ली येथे जाऊन आपण त्यांचे निर्णय बदलावयास लावले आहेत. यामध्ये मला विरोधी पक्षाने सहकार्य केले आहे, ही आनंदाची बाब आहे. इंदू मिलच्या प्रश्नासाठी सर्वपक्षीय बैठक घेऊन दिल्लीला जावे लागले होते. खरे म्हणजे, राज्याचे प्रश्न सोडविण्यासाठी कितीही वेळा दिल्लीला जावे लागले तरी त्याला माझा विरोध राहणार नाही. राज्यातील जनतेसाठी मला दिल्ली येथे कितीही वेळा जावे लागले तरी मला आनंदच आहे. त्यामुळे दिल्लीला जाण्यामध्ये काही गैर आहे, असे मला वाटत नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

माझ्यावर वैयक्तिक टीका देखील करण्यात आली. श्री.आशिष दुवा नावाची व्यक्ती सहाव्या मजल्यावर बसते अशी टीका करण्यात आली. त्यामुळे मला कृपा करून दाखवून द्यावे की, अशी कोण व्यक्ती कुठल्या दालनात बसते, कुणाला भेटते, कधी भेटते. अशा प्रकारचे बिनबुडाचे आरोप करणे सयुक्तिक नाही. आपण जी नावे घेतली आहेत त्यात आपण हा मोठा बिल्डर आहे असा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. आपण मला कुणाबद्दलही ठोस पुरावे दिले तर मी त्याचा निश्चित विचार करेन.

मी 1991 मध्ये पहिल्यांदा राजकारणात आलो. तेव्हा पासून माझ्या राजकीय जीवनाला सुरूवात झाली. त्या आधी माझ्या परिवारातील माझे आई-वडील हे 1952 पासून राजकारणात आहेत. कोणालाही माझ्याबद्दल वैयक्तिक आरोप करायचे असतील तर ते विचारपूर्वक केले तर मी त्याचे निश्चितपणे स्वागत करेन. याला इंग्रजीमध्ये इन्सिल्युएशन म्हणतात. तेथे कोण बसले आहेत यासंबंधातील आपण मला ठोस माहिती द्यावी. कोण तेथे बसले आहे, कोण कोणाला भेटले, कुठल्या दालनात बसतात, असा जो चुकीचा आरोप केला आहे तो अतिशय दुर्दैवी आहे. तरी देखील आपण या संबंधातील माहिती मला द्यावी. शेवटी दिलगिरी व्यक्त करायची किंवा नाही हा त्यांचा प्रश्न आहे.

श्री.रतन टाटा हे मला भेटले नाहीत किंवा त्यांना भेटण्याची गरज वाटली नाही असे देखील वक्तव्य केले आहे. हे देखील बेजबाबदारपणाचे वक्तव्य आहे. श्री.रतन टाटा गेल्या महिन्यामध्ये माझ या निवासस्थानी आले होते. तेव्हा माझी त्यांच्याशी तासभर बैठक झाली. त्या आधी आमची दोन वेळा बैठक झाली होती. श्री.सायरस मेस्त्री यांच्या बरोबर माझी अजून बैठक झालेली नाही. ते टाटा समूहाचे पुढच्य वर्षी अध्यक्ष होणार आहेत. त्यामुळे कुठल्या कुठल्या मोठ्या नेत्यां समवेत माझ ी बैठक झाली याची माहिती मी आपल्याला देतो. कालच स्पेनचे पंतप्रधान मला भेटायला आले होते.

राज्याची कामे करताना राज्यात औद्योगिक गुंतवणूक झाली पाहिजे, आर्थिक क्षेत्रामध्ये गुंतवणूक झाली पाहिजे म्हणून माझे प्रयत्न सुरू असतात. एमओयु साईन करताना मी सर्वांना निमंत्रित करतो. पुढे देखील एमओयु साईन करणार आहे तेव्हा सर्वांना बोलावणार आहे. अशाने एक चांगले वातावरण निर्माण होते. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

गुजरात पुढे चालले आहे, अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न चाललेला आहे. महाराष्ट्राचे नेतृत्त्वाकडे, प्रशासनाकडे संशयी वृत्तीने पाहण्याचा प्रयत्न चालला आहे. गुजरातची तारीफ करण्यामध्ये काय मिळते हे मला समजत नाही. त्यांच्याकडे आकडेवारी असेल तर ती द्यावी. चुकीच्या आकडेवारीमध्ये जाऊ नये असे मला वाटते. .... (अडथळा) .....

सभापती महोदय, माथाडी कामगारांच्या घराबद्दल देखील वक्तव्य करण्यात आले. माथाडी कामगारांचे नेते कराडचे आहेत असे म्हटले गेले. मला अभिमानाने सांगावयाचे आहे की, माथाडी कामगारांचे जवळ जवळ सर्व नेते पश्चिम महाराष्ट्रातील परिसरातील आहेत. अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांना कायद्यान्वये संरक्षण देण्याचा प्रयत्न केला. ते या सदनाचे सन्माननीय सदस्य होते. ते देखील माझ्या गावचे होते. त्यामुळे नेते तिथले आहेत. माथाडी कामगारांना दिलेला भूखंड बिल्डरच्या घशात दिला असेल तर त्याची चर्चा केली पाहिजे. माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था खूप वर्षापासून भूखंड देण्याची मागणी करीत होते. त्यांना 1 हेक्टर जमीन देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. 1488 कामगारांची यादी दिली आहे. हे सर्व कामगार माथाडी आहेत. त्यामुळे सदनिका हस्तांरित करताना ती माथाडी कामगारांनाच करावी अशी देखील अट घातली आहे. आपण गिरणी कामगारांबद्दल बोललो, इतर वर्गाबद्दल बोललो. ज्या लोकांनी मुंबई बांधण्यामध्ये, उभी करण्यामध्ये मदत केली आहे, त्यामध्ये माथाडी कामगार देखील आहेत. काही दिवसांपूर्वीच माथाडी कामगारांच्या इतर संघटनांना देखील सदनिका देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अशा प्रकारे माथाडी कामगारांना घरे मिळणार असतील आणि ती त्यांना मिळू नये असा प्रयत्न करणे योग्य आहे असे मला वाटत नाही.

राज्याच्या आर्थिक परिस्थितीबद्दल, औद्योगिक धोरणाबद्दल, कृषि विषयक प्रश्नाबद्दल देखील विचार केला पाहिजे. मी काल कांद्याच्या प्रश्नाबद्दल निवेदन केले आहे. केंद्र सरकारचा एक प्रस्ताव आला होता. त्यावर देखील गंभीर विचार चालू आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या वतीने दुसरा एका प्रस्ताव लवकरच सभागृहा समोर येईल. पावसाचा जरा काही गोंधळ झाला, पाऊस कमी अधिक झाला तर कांदा, कापूस, साखर, यांच्या उत्पादनामध्ये फरक पडतो.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असंशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दर वर-खाली होतात आणि केंद्र शासनाचे चुकीचे धोरण आले तर त्यामुळे फरक पडतो. त्यावेळी राज्य शासन तत्परतेने शेतकऱ्यांच्या मदतीला धावून गेलेले आहे आणि जात राहणार.आज सिंचनाच्या बाबतीत सांगावयाचे तर गोसीखूर्द प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तसेच पुनर्वसनासाठी एक महत्वाकांक्षी निर्णय घेतलेला आहे. त्याचबरोबर एआयबीपी च्या माध्यमातून जास्तीतजास्त निधी मिळवून आणखी प्रकल्प घेऊन ते राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करुन त्यासाठी जास्त निधी कसा मिळेल यासाठी प्रयत्न सुरु आहेत. तसेच शेतीसाठी कायम स्वरुपामध्ये सिंचनाची व्यवस्था होणार असून अत्यंत मोठ्या वेगाने महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचा जो राष्ट्रीय कार्यक्रम आहे, त्या कार्यक्रमा अंतर्गत गेल्या दोन वर्षामध्ये 300 ते 350 कोटी रुपये खर्च करीत होतो आणि यावर्षी एवढ्या वेगाने कार्यक्रम पुढे नेलेला आहे आणि यावर्षी 1 हजार कोटी रुपयापर्यंत किंवा त्यापेक्षाही जास्त खर्च येईल असे नियोजन केले असून पुढच्या वर्षी ही रक्कम 2 हजार कोटी रुपयापर्यंत खर्च होतील असे आपण नियोजन केलेले आहे.राज्याच्या मागासवर्गीय भागामध्ये मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होईल. त्याच बरोबर ग्रामीण सडक योजनेसाठी निधी येण्याचे बंद झाले होते, त्याला देखील चालना देण्यासाठी राज्य शासनाचे कायम स्वरुपी प्रयत्न सुरु आहेत.

सभापती महोदय, आज या चर्चेमध्ये महाराष्ट्रातील एकंदरीत विकासाच्या परिस्थितीचा आढावा घेण्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी ज्या-ज्या सूचना केलेल्या आहेत, त्या सर्व सूचनांची मी नोंद केलेली असून या सर्व सूचनांचा गंभीरपणे विचार करुन त्या कार्यान्वित करण्यासाठी मी निश्चितपणे प्रयत्न करणार आहे. पण मी आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्य हे सुदृढ प्रशासनाच्या दिशेने, आर्थिक विकासाच्यादृष्टीने, तसेच राज्याचे विकासाच्या बाबतीत, ढोबळ उत्पन्नाच्या बाबतीत जे प्राथम्य आहे ते कायम ठेवण्यासाठी तसेच राज्याच्या औद्योगिक धोरणाच्या बाबतीतील परिस्थिती, रोजगार हमी योजनेची परिस्थिती कायम ठेवण्याकरता आणि राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न तसेच विशेषत: कोरडवाहू शेतकऱ्यांचे प्रश्न किंवा पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असेल तर या सर्वांना तोंड देण्यासाठी हे राज्य सक्षमतेने आणि परिपूर्णतेने काम करीत रहाणार आहे. अशा वेळी विरोधी पक्षाला काही टीका करण्यासारखे मुद्दे नसले तरी देखील त्यांनी जे काही सकारात्मक मुद्दे मांडलेले आहेत त्या बाबत राज्य सरकार जरुर विचार करील.माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे ...

. . . .एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानणारा प्रस्ताव आपण सर्वांनी पारित करावा अशी मी आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

. . . .एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना दोन-दोन मिनिटांमध्ये प्रश्न विचारण्यासाठी परवानगी देतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, स्वाभाविकपणे विरोधी पक्ष सन्माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत बोलत असताना बहुदा माननीय मुख्यमंत्र्यांची अशी कल्पना नसावी की आम्ही सगळे त्यांचे कौतुकच करु. याठिकाणी विरोधी पक्षनेता म्हणून ज्याप्रमाणे माझे पहिलेच भाषण होते,त्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांचे बहुदा दुसरे भाषण होते.सन्माननीय मंत्री महोदय, डॉ.पतंगराव कदम हे तयार गडी आहेत, त्यांनी अनेक मुख्यमंत्र्याची कामगिरी पाहिलेली आहे. तसे आताचे माननीय मुख्यमंत्री नाहीत. त्यामुळे मी समजू शकतो. पण माननीय मुख्यमंत्री महोदय, मी एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, मी माझे भाषण करीत असताना फक्त एकदाच महाराष्ट्र आणि गुजरात बाबत आकडेवारी दिलेली आहे आणि ती देत असताना असेही म्हटले की, याचे मला वाईट वाटते. मात्र मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये जेवढा गुजरातचा उल्लेख होतो तेवढा आम्ही कधीच उल्लेख केलेला नाही. उलट सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी काल त्यांच्या भाषणामध्ये गुजरातच्या टक्केवारीबाबत उल्लेख केला आहे. आमचा मुद्दा असा आहे की, गुजरात राज्य पुढे आहे हे सांगण्यामध्ये महाराष्ट्रातील एक राजकीय कार्यकर्ता म्हणून आम्हाला आनंद नाही आणि जर आम्ही याबाबतीत सांगत असू तर आम्ही तो केवळ पॉझिटीव्हली सांगत असतो की जेणेकरुन आपणही याबाबतीत कसे पुढे जाऊ शकतो.

सभापती महोदय, सायरस मिस्त्रीचा मुद्दा जरा जास्तच झोंबला असेल हे मी मान्य करतो. तसेच मी श्री.रतन टाटा यांना कधीच भेटलो नाही असे म्हटलेले नाही. जो नव्याने पदभार घेणार असतो, तो पंतप्रधान यांना जाऊन भेटतो. पण ते पदभार घेतल्यानंतर भेटावयास गेले नाहीत तर ते अगोदर गेले आणि ते जर या अर्थाने आले असते तर "It was a nice gesture" असे वाटले असते एवढ्यापुरतेच मी म्हटले आणि मी याबाबतीत टीका करीत असताना अतिशय पॉझिटीव्हली करीत आहे.व्यक्तीगतरित्या माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना त्या विषयामध्ये किती आदर आहे हे मला माहिती आहे. कारण मी त्यांच्या मुलाखतीमध्ये ते वाचलेही आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अनुधावित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

पण राज्य म्हणून पाहताना त्यांचे रिफ्लेक्शन्स काय होते तर ते असे होते. हे सर्व पॉझीटीव्ह अर्थाने घेतले पाहिजे होते. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी इंडस्ट्रीयल ग्रोथवर इंटेलीजेन्टली चुटकी साधलेली आहे. काँग्रेस प्रणीत राज्यांमध्ये इंडस्ट्रीयल ग्रोथ किती आहे आणि आपली ग्रोथ किती आहे हे त्यांनी सांगितले. आपल्याकडे परकीय गुंतवणूक जास्त आली, परंतु निर्यातीमध्ये शेजारची राज्य आपल्यापुढे आहेत आणि हे राजीव गांधी फौऊडेन्शनने म्हटलेले आहे.

सभापती महोदय, दोन हजार कोटींच्या पॅकेजपैकी 300 कोटी रुपये दिल्याचे खालच्या सभागृहात सांगितले. परंतु त्यापैकी 120 कोटी रुपये शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले. पूर्ण 300 कोटी रुपये शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेले नाहीत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी येथे पुन्हा 300 कोटी रुपयांचा उल्लेख केला. ज्या भागात शेतीचे पीक वाढले त्या भागात पॅकेज का असा आम्ही विरोधाभास उभा केला त्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उल्लेख करावयास पाहिजे होता.

सभापती महोदय, मी माझ्या भाषणात एका व्यक्तीच्या नावाचा उल्लेख केला होता. दुधाने तोंड भाजल्यानंतर ताक सुध्दा फुंकून प्यावे लागते अशी म्हण आहे. मी आपणावर कोणताही व्यक्तिगत आरोप केलेला नाही. मी फक्त शंका उपस्थित केली होती की, असे काही घडत तर नाही ना ? राज्यामध्ये आदर्श प्रकरण घडले व अन्य घटना घडत आहेत तेव्हा आम्ही हे काळजीपोटी म्हटलेले आहे. असा कोणताही दुवा येणार नाही याची आपण भविष्यात काळजी घ्यावी. दुवा हे अधिकारी वा बिल्डर आहेत असे मी काहीही म्हटलेले नाही. जनता आणि माननीय मुख्यमंत्री महोदयांमध्ये फक्त कामाचा दुवा असला पाहिजे. मी हे सर्व काळजीपोटी म्हटले होते. ही टीका सकारात्मक पध्दतीने घेतली जाईल अशी मला अपेक्षा आहे. शेतकऱ्यांना जी काही मदत दिली त्यातील वस्तुस्थिती समजली तर बरे होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस उत्तर देताना जे भाषण केले तो एक उत्कृष्ट राजकीय भाषणाचा नमुना आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन कोटी पॅकेजच्या संदर्भात उल्लेख केला. नागपूरच्या अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी तातडीने दोन हजार कोटी रुपये देण्यात येतील असे आपणाकडून सांगण्यात आले होते. मरणाऱ्याला गंगा दिली, उपाशी माणसाला जेवणाचे ताट दिले आणि अडलेल्या माणसाला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

तातडीने मदत दिली तर त्याला मदत म्हणतात. सवडीने पैसे दिले जातात त्यास मदत म्हणत नाहीत. आपण 300 कोटी रुपये दिले उर्वरित पैसे तातडीने दिले पाहिजेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या भाषणात कोरडवाहू शेतकऱ्यांच्या बाबतीत घेतलेल्या धोरणाचा उल्लेख आला, परंतु तो उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नव्हता आणि मी ही उणीव काल माझ्या भाषणात सांगितली होती. साखर, कापूस, कांदा हे आज महाराष्ट्रातील ज्वलंत प्रश्न झालेले आहेत. आपणावर जास्त कर्ज नाही असे सांगितले. माझी आपणास विनंती आहे की, आपण संचित खर्चाची एक श्वेतपत्रिका काढावी. आपण कर्ज घेतो पण त्यातून विकास झाला की नाही हे आम्हाला समजत नाही. आपणच श्वेतपत्रिका काढू शकाल असा आम्हाला विश्वास आहे. आपल्या प्रामाणिकपणावर आमचा विश्वास आहे. मी काल लातूरच्या एका महिलेवर होत असलेल्या अत्याचाराचे उदाहरण दिले. आज मंत्रालयात असे अनेक दुवा आहेत, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितलेले दुवा नाहीत. मी काल त्या बाबत सभागृहात उल्लेख केलेला आहे. मंत्रालयात बेकायदेशीर टेबल खुर्च्या टाकून लोक कसे काम करीत आहेत हे सांगितले. आपल्याकडे त्या संदर्भातील नोंदी आल्या असतील. सामान्य प्रशासन विभाग आपल्याकडे आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या नोंदी व्यतिरिक्त अन्य व्यक्ती मंत्री महोदयांकडे काम करीत आहेत. तर काही लोकांची नावे मंत्री महोदयांच्या आस्थापनेवर आहेत परंतु ते तेथे नाहीत, कुठेतरी गायब आहेत या सर्व गोष्टी मी येथे सांगितलेल्या आहेत. आपण या सर्वांची दखल घेतली तर प्रशासकीय यंत्रणा सक्षमपणे पुढे नेण्यास मदत होईल.

सभापती महोदय, मी एका गोष्टीबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांचे कौतुक करतो. माननीय मुख्यमंत्री पदावर राहतील काय या प्रश्नाचे उत्तर त्यांनी " मी ज्यावेळी दिल्लीला जातो त्यावेळी काही तरी करुन आणतो असे दिले. म्हणजे अगोदरच्या मुख्यमंत्री महोदयांमध्ये धमक नव्हती, तेव्हा मी येथे राहणे राज्याच्या दृष्टीने किती उपयोगाचे आहे हे राजकीय समीकरण अतिशय सुंदरतेने मांडले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. महाराष्ट्राची तुलना अमेरिका आणि

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

इतर देशांशी करुन ग्लोबलायझेशनची जो पॅटर्न दाखविला त्याबद्दल माननीय मुख्यमंत्री महोदयांचे कौतुक करण्यास हरकत नाही. महाराष्ट्र तेवढ्या प्रगतीवर गेला तर आम्हा सर्वांना आनंद होईल. माननीय शिवसेना प्रमुखांनी सांगितले आहे की, दुसऱ्यांचे कौतुक करण्यापेक्षा आपल्या महाराष्ट्र राज्याचे मोठेपण सांगावे आणि आमची देखील तीच भूमिका आहे.

सभापती : आता मी प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर कु.थोरात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.00 वाजता पुन : भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.45 वाजता सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

उप सभापती : ही बाब माझ्या लक्षात आलेली आहे. मी सभागृहात आल्याबरोबर तेच बघत होतो.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांकरिता स्थगित करावे.

उप सभापती : सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.02 ते 11.12 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

ठाणे शहरातील माजिवडा येथे सेक्टर 3, सर्व्हे नं.215,216 व 18 या भूखंडावर अनधिकृत बांधकाम होत असल्याबाबत

(1) * 25541 श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री.मोहन जोशी , श्री.राजन तेली , श्री. एस. क्यू. ज़मा : तारांकित प्रश्न क्रमांक 22031 ला दिनांक 21 डिसेंबर, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे शहरातील सेक्टर 3, मौजे-माजिवडे, सर्व्हे नं.215 हिस्सा नं.1 व 2 तसेच सर्व्हे नं.216 व 18 या भूखंडावरील एम.एम.आर.डी.ए.च्या रेंटल योजनेअंतर्गत आकृती सिटी या विकासका मार्फत काम सुरू आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या योजनेमध्ये मोठया प्रमाणात नियमबाह्य कामे सुरू असल्याबाबत ठाणे महानगरपालिकेकडे वारंवार तक्रारी व निवेदने सादर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त कामासंदर्भात चौकशी करून संबधित विकासक व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(4) अद्याप, उक्त प्रकरणी चौकशी करून विकासक व दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) ठाणे महानगरपालिकेच्या सेक्टर क्र.3 मधील मौजे माजिवडा येथील सर्व्हे नं. 215, हिस्सा नं.1/1,1/2,1/3,1/5,1/6,2/1,2/3, 2/4 2/5,2/6 सर्व्हे नं.216 हिस्सा नं.1,2,3 आणि सर्व्हे नं.218 मौजे-माजिवडे या भूखंडावर आकृती सिटी या विकासकाने सादर केलेल्या रेंटल हौसिंग योजने अंतर्गत विकास प्रस्ताव मंजूर असून जागेवर बांधकाम सुरु आहे, हे खरे आहे,

(2) होय.

(3) व (4) काही इमारतीत बांधकाम सुरु करण्याची परवानगी न घेता काम सुरु केल्याने विकासकावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे व रक्कम रुपये 1,45,22,255/- दंड वसूल करण्यात आलेला आहे.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्नाबाबत शासनाने या विकासकावर पायाच्या बांधकामाबाबत दंडात्मक कारवाई केली आहे असे लेखी उत्तर दिलेले आहे. हा प्रश्न केवळ पाया बेकायदेशीर बांधला म्हणून विचारला आहे असे नाही तर ही संपूर्ण योजनाच बेकायदेशीर, अनधिकृत, चुकीच्या पायावर उभी असणारी, पाया कमी खोल घेऊन अधिक मजले बांधले जाणारी आहे. मला वाटते की, शासनाने हा प्रश्न गांभीर्याने घेतला पाहिजे. 2008 मध्ये या

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25541.... श्री.जयप्रकाश छाजेड.....

जागेचा विकास करण्यापूर्वी या आकृती बिल्डरने आयटी पार्क बांधण्यासाठी पर्यावरण खात्याची परवानगी घेतली होती. तेथे आयटी पार्क न करता तेथे रेंटल हौसिंगच्या इमारती उभ्या राहण्यासाठी असे काय घडले ? रेंटल हौसिंगच्या माध्यमातून तेथे टॉवर उभे राहिले. या बिल्डरने बांधकाम करीत असताना पायाचे बांधकाम करण्यासाठी परवानगी घेतली नाही अशा प्रकारची तक्रार करण्यात आली. ठाण्यात काहीही केले तरी चालू शकते असा या विकासकाला महापालिकेबद्दल आत्मविश्वास होता. पायाचे बांधकाम करण्याची परवानगी उशिराने घेतल्याबद्दल महानगरपालिकेने या बिल्डरला दीड कोटी रुपयांचा दंड केला. ही गंभीर गोष्ट मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देत आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, आयटी पार्क करण्याकरिता पर्यावरण खात्याची परवानगी घेतलेली असताना तो पार्क न करता रेंटल हौसिंग योजनेचा प्रस्ताव कसा काय तयार झाला ?

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पायाच्या अनधिकृत बांधकामाकरिता विकासकाला दीड कोटी रुपये दंड आकारण्यात आलेला आहे. वरच्या बाजूला देखील जे जादा मजले घेतलेले आहेत त्यांचा पाया देखील तपासलेला आहे काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये जवळपास 25 टक्क्यापेक्षा अधिक इमारती अनधिकृतपणे उभ्या राहिलेल्या आहेत. त्याबाबतीत दंडात्मक कारवाई करुन त्या नियमित करण्यात येणार आहेत काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न असा आहे की, आकृती बिल्डरने 2008 साली वाणिज्य वापराकरिता परवानगी घेतली होती काय ? ही गोष्ट खरी आहे की, 2008मध्ये त्यांनी वाणिज्य वापराकरिता परवानगी घेतली होती. नंतरच्या काळामध्ये त्यांनी पुन्हा एमएमआरडीए मार्फत जी भाडेतत्वावर घरे बांधली जातात त्याचा प्रकल्प राबविण्यासाठी रितसर परवानगी घेतली. त्यांनी प्लिंथ लेव्हलला म्हणजे पायापासून विनापरवानगी नियमबाह्य बांधकाम केले म्हणून त्यांना दंड आकारण्यात आला असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. त्यांनी जेवढ्या मजल्यांची परवानगी घेतली होती त्यापेक्षा जास्त मजले काही ठिकाणी बांधले म्हणून दंड आकारुन त्यांना पुढील परवानगी दिलेली आहे. ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये 25 टक्क्यापेक्षा अधिक इमारती बेकायदा असल्याचे सांगून त्या इमारती दंड आकारुन नियमित करण्यात येणार आहेत काय अशी विचारणा सन्माननीय सदस्यांनी केली. याबाबतीत मी सांगू इच्छितो की, सर्वसाधारणपणे एफएसआयचे उल्लंघन होत नसेल तर बांधकाम रेग्युलराईज करण्याची तरतूद नियमामध्ये आहे. म्हणून या प्रकरणी दंड आकारण्यात आला. ठाणे महानगरपालिकेने पहिल्यांदाच अशा प्रकारची कारवाई केलेली आहे. एफएसआयचे उल्लंघन केले नसले तरी देखील परवानगी न घेता बांधकाम केल्यामुळे कोट्यवधी रुपयाचा दंड आकारुन तो वसूल करण्यात आलेला आहे.

श्री. भाई जगताप : हा प्रश्न एका इमारतीपुरता मर्यादित नाही. मंत्री महोदयांनी सांगितले की, परवानगी न घेता विकासकाने जादा मजले बांधले. हा एक नेक्सस मुंबई, ठाणे, उल्हासनगर येथील इमारतींच्या बाबतीत आहे. मी ठाणे महानगरपालिकेच्या आयुक्तांचे कौतुक करतो की त्यांनी दंडात्मक कारवाई करण्याचे धैर्य दाखवले. आपले कायदे सुस्पष्ट आहेत. तेव्हा जर अशा प्रकारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दंड भरुन मजले नियमित होत असतील तर हे एक नवे कुरण निर्माण केल्यासारखे होईल. तेव्हा कायद्याच्या तरतुदी प्रमाणे विकासकावर एफआयआर दाखल करुन कारवाई केली तर असे प्रकार कुठे तरी थांबतील. म्हणून विकासकावर शासन एफआयआर दाखल करुन कारवाई करणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : मी या प्रश्नाचे उत्तर आधी दिलेले आहे. मी पुन्हा सांगू इच्छितो की, जागेच्या प्रमाणात त्या त्या भागामध्ये किती कंस्ट्रक्शन करावयाचे यासंदर्भातील निश्चित धोरण ठरलेले आहे आणि त्याला आपण एफएसआय असे म्हणतो. त्या एफएसआयचे उल्लंघन झाले नसेल तर ते बांधकाम सर्वसाधारणपणे रेग्युलराईज केले जाते. पण उल्लंघन केले असेल तर दंड आकारुन बांधकाम रेग्युलराईज करण्याची तरतूद नियमामध्ये नाही. यामध्ये नियमाचे उल्लंघन झालेले नाही. तरी दोन्ही सन्माननीय सदस्यांच्या भावना आणि त्यांच्या प्रश्नाचा रोख लक्षात घेता 2008 साली विकासकाने वाणिज्य वापरासाठी जी परवानगी घेतली होती त्याऐवजी त्यांनी रेण्टल हौसिंग स्कीम का बांधली याची चौकशी करावी लागेल आणि अशा प्रकारे दंड आकारणी करुन प्रकरण मिटविण्याचा प्रयत्न होत असेल तर त्याची देखील खातरजमा केली जाईल.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : ठाणे शहरातील प्रश्न सभागृहात चर्चेला आलेला आहे,त्यामुळे मला देखील या प्रश्नाच्या अनुषंगाने काही माहिती शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. वास्तविक पाहता ठाणे शहरात ज्या प्रमाणे अनियमता झालेली आहे, त्याप्रमाणे अनेक ठिकाणी अनियमितता झाल्या आहेत. ठाणे महापालिकेचे आयुक्त हे अत्यंत कर्तव्यदक्ष आणि कार्यक्षम आहेत. त्यांनी अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत अतिशय सिरियसली लक्ष घातलेले आहे. ठाणे शहरातील एका विकासकाच्या कामाच्या संदर्भात मी स्वत: दोन वर्षापूर्वी शासनाकडे तक्रार केली होती. त्या तक्रारी संदर्भात मला राज्य शासनाकडून उत्तर प्राप्त झालेले नाही, तसेच महापालिकेकडूनही मला उत्तर प्राप्त झालेले नाही. ठाणे शहरात पर्यावरण विभागाची परवानगी न घेता एक मोठा प्रकल्प त्या ठिकाणी उभा राहतो आहे. त्या प्रकल्पाच्या संदर्भात मी स्वत: लेखी तक्रार दिली होती. त्या तक्रारीची मला राज्य शासनाकडून साधी पोचही मिळालेली नाही. ठाणे शहरात दुसऱ्या एका विकासकाने 13 टॉवर्स विना परवाना बांधलेले आहेत. त्या विकासकांचे नाव सभागृहाला हवे असल्यास मी ती माहिती देईन. त्या विकासकाला देखील ठाणे महापालिका आयुक्तांनी नोटीस दिलेली आहे. या ठिकाणी महत्वाचा प्रश्न असा आहे की, राज्य शासन याबाबतीत खरोखरच काही दखल घेणार आहे काय ? शासनाने याबाबतीत दखल घेतली नाही तर ती प्रकरणे तशीच दबलेली राहतील. याच्यामध्ये नेमका संशय कोणावर घ्यावयाचा हा प्रश्न आहे.

ठाणे शहरात एका विकासकाने आपल्या होणाऱ्या बिल्डींगमधील लोकांना जाण्या-येण्यासाठी मार्ग मिळावा म्हणून आपल्या प्लॉटमध्ये नॅशनल हायवेला जोडून रस्त्यासाठी जागा दिलेली आहे. ठाणे शहरात अशा प्रकारची अंधाधुंदी चालली आहे, त्याबाबतीत राज्य शासन तातडीने लक्ष घालील काय ? माननीय नगरविकास राज्यमंत्री महोदय, ठाणे शहरातील ज्या अनियमिता मी आपणाला सांगतो आहे. त्या अनियमितते बाबत आपण खरोखरच गांभीर्याने दखल घ्यावी. या सर्व प्रकल्पांची मी आपल्याला माहिती देतो. सन्माननीय सचिवांसह त्या प्रकल्पांना भेटी द्याव्यात. त्या ठिकाणी मोठया प्रमाणात गैरव्यवहार व अनियमितता झाल्याचे प्रत्यक्षदर्शी आपणास पहावयास मिळेल. त्यानंतर संबंधित विकासकांवर शासनाकडून ताबडतोबीने ॲक्शन घेतली जाईल काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय राज्यमंत्र्यांनी सचिवांसह या प्रकल्पांना भेटी द्याव्यात अशा प्रकारच्या आपण सूचना दिल्या आहेत. आमचे आग्रहाचे म्हणणे आहे की, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. त्या भूखंडावर सात टॉवर्स उभे केले आहेत. यासंबंधीचा अहवाल आम्हाला दोन आठवड्यात दिला जाईल काय हा खरा प्रश्न आहे. याबाबतचा अहवाल देण्याचे काम काही मोठे नाही. ते अतिशय लहान काम आहे.

उप सभापती : मी या ठिकाणी जे प्रश्न विचारले आहेत, त्या प्रश्नांची माननीय मंत्री महोदयांनी उत्तरे द्यावीत...

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आम्हालाही माहिती आहे की, यापूर्वी अशा प्रकारच्या अनियमिततेच्या बाबतीत आपण चेअरवरुन शासनाला काही निर्देश दिले होते. हा एक मोठा नेक्सस आहे म्हणून हा प्रश्न राखून ठेऊन, त्याबाबतीत सांगोपांग चर्चा होऊन त्याबाबतीत शासनाने सभागृहातच उत्तर द्यावे व या प्रश्नांचा सोक्षमोक्ष लावावा अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, आपण चेअरवरुन ज्या भावना व्यक्त केल्या, त्याबाबतीत मी प्रथम उत्तर देतो. आपल्याच प्रश्नाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनीही काही मुद्दे उपस्थित केले. या सगळया प्रश्नाचा समारोप करण्यासाठी राज्यमंत्र्यांनी व सचिवांनी या अनियमितेबाबत पाहणी करावी असे आपण निर्देश दिलेत. मी यापुढे जाऊन सांगू इच्छितो की, नगरविकास विभागाचा मी राज्यमंत्री असल्यामुळे मला काही मर्यादा आहेत. या विषयाबाबतच्या आपल्या सगळया भावना सभागृहाचे नेते आदरणीय मुख्यमंत्री महोदयांपर्यंत पोहोचवीन. आपण सांगितलेल्या...

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय नगरविकास मंत्र्यांनी जे वक्तव्य केले त्यास माझी हरकत आहे..

श्री. भास्कर जाधव : माझे वाक्य पूर्ण होऊ द्यावे. नंतर आपण माझ्या वाक्याला हरकत घ्यावी. सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे मी स्वत: व नगरविकास विभागाचे प्रधान सचिव (1) यांना बरोबर घेऊन या विषयाची पाहणी करीन व त्याबाबतचा अहवाल आपणाला सादर करीन. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी देखील एक प्रश्न उपस्थित केला आहे...

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय सभागृहात उत्तर देतात, त्यावेळी राज्यमंत्री म्हणून त्यांना मर्यादा नाहीत. परंतु त्यांनी उत्तर देताना सांगितले की, राज्यमंत्री म्हणून मला काही मर्यादा आहेत. "काही मर्यादा" असे शब्द रेकॉर्डवर राहू नयेत. जर राज्यमंत्र्यांना मर्यादा असतील तर आम्ही त्यांना सभागृहात प्रश्नच विचारणार नाही. चुकीचे वाक्य रेकॉर्डवर आलेले आहे. राज्यमंत्री हे शासन म्हणून उत्तर देत आहेत. (अडथळा) सभापती महोदय, माझी हरकत पूर्ण झालेली नाही...

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..... ता.प्र.क्र.25541...

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांच्या मर्यादा काय आहेत याची मला माहिती आहे. त्यांना काहीही अधिकार नाहीत हेही आम्हाला माहिती आहे. परंतु हे वक्तव्य रेकॉर्डवर राहू नये. माननीय राज्यमंत्री उत्तर देण्यासाठी सभागृहात येतात, त्यांच्याकडे या व्यतिरिक्त काहीही अधिकार नाहीत. परंतु असे वक्तव्य रेकॉर्डवर राहणे योग्य नाही. सभापती महोदय, मी हरकत घेण्याचे मुख्य कारण म्हणजे माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव हे अभ्यासू आहेत, सभागृहाची बैठक सुरु होण्यापूर्वी मी माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांना हेच सांगितले की, माननीय नगरविकास राज्यमंत्री चांगल्याप्रकारे ब्रिफिंग घेतात, सभागृहात स्पष्टपणे उत्तरे देतात. त्यामुळे मी त्यांच्यावर अधिक प्रेम करतो. याच सभागृहात त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, गिरणी कामगारांना मोफत घरे देऊ. परंतु काल शासनाने गिरणी कामगारांना मोफत घरे देण्याचे अमान्य केले आहे. त्यामुळे मी काल माझ्या भाषणात या प्रसंगाचा उल्लेख केला होता. माननीय नगरविकास राज्यमंत्री ज्या राजकीय कुळातून राजकारणात आलेले आहेत त्यांची तेथील आक्रमकता या ठिकाणी दिसून येते. ती आक्रमकता ते अद्याप विसरलेले नाहीत. त्यामुळे त्यांचे वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशी मी विनंती करतो.

उप सभापती : आक्षेपार्ह वक्तव्य कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी वरवरची मलमपट्टी सुचविली आहे. माननीय राज्यमंत्र्यांना अधिकार मिळत नाहीत त्याबद्दल ते का भाष्य करीत नाहीत? माननीय राज्यमंत्र्यांनी त्यांचे मूळ दुखणे आपल्या माध्यमातून मांडले आहे. त्यावर मार्ग काढला पाहिजे. हा नेक्सस योग्य नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्याला आणि सभागृहाला हेच सांगू इच्छितो की, आपल्या सूचनेचे निश्चितपणे पालन केले जाईल. मी स्वत: पाहणी करेन. कोणकोणत्या भागात बेकायदेशीर बांधकामे झाली आहेत याची आपण स्वत: माहिती देणार आहात. कारण आपण त्याच भागात रहात आहात. त्यामुळे आपल्याला याची अधिक माहित आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, हा प्रश्न राखून ठेवावा. प्रश्न राखून ठेवण्याची गरज नाही एवढेच मला सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : या संदर्भात अहवाल सभागृहापुढे येईपर्यंत हा प्रश्न राखून ठेवू. माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरामुळे सभागृहाचे समाधान झालेले आहे. परंतु मी लिहिलेल्या पत्राची दोन वर्षे दखल घेतली गेली नाही. 15 दिवस हा प्रश्न राखून ठेवल्याने काही फरक पडणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाच्या सेवेतील मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या वारसांना अनुकंपातत्वावर नोकरीत सामावून घेण्याबाबत

(२) * २६३७० ***प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे*** **:** सन्माननीय ***मुख्य मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सेवेतील मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपातत्वावर नोकरीत सामावून घेण्याची भरती प्रक्रिया गेल्या ४ ते ५ वर्षांपासून बंद आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भरतीवरील बंदी उठवून अनुकंपातत्वावरील वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ५/६/२०१० नुसार दिनांक २२/८/२००५ नंतरच्या अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांच्या नियुक्तीवर १ वर्षासाठी निर्बंध होते, शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ३०/६/२०११ नुसार सदर निर्बंध आणखी १ वर्षासाठी वाढविण्यात आले आहेत. मात्र दिनांक २२/८/२००५ पूर्वीच्या अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांना नियुक्ती देण्याच्या संदर्भात शासनाचे कोणतेही निर्बंध नाहीत.

(२) व (३) वरील शासन निर्णय निर्णयाद्वारे दिनांक २२/८/२००५ नंतरच्या अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांच्या नियुक्तीवर असलेले निर्बंध उठविण्याच्या संदर्भातील प्रस्तावावर वित्त विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे,

प्रा.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, शासन सेवेतील मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर शासन सेवेत सामावून घेण्याबद्दलचा हा प्रश्न आहे. मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील वारसांना शासन निर्णयानुसार आतापर्यंत अनुकंपा तत्वावर सेवेत घेतले जात होते. परंतु 2005-06 पासून नोकर भरती झालेली नाही. उत्तरामध्ये हे खरे नाही असे म्हटले आहे. शासन निर्णय क्रमांक-23/10 (वित्त सुधारणा), दिनांक 29/11/2000 नुसार काही प्रमाणात निर्बंध शिथिल करण्यात आले होते आणि भरती प्रक्रिया सुरु झाली होती. परंतु दिनांक 22.8.2005 च्या शासन निर्णयानुसार अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवरील उमेदवारांच्या नियुक्तीवर निर्बंध घालण्यात आले होते. भरती प्रक्रिया सुरु करीत असताना क आणि ड संवर्गातील अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबत निर्बंध घातले गेले आहेत. हे निर्बंध किती दिवसात उठविण्यात येतील? निर्बंध उठविण्याबाबतचे आदेश सर्व शासकीय विभागांना पाठविण्यात येतील काय?

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26370.....

प्रा. फौजिया खान : महोदय, अनुकंपा तत्वावरील भरतीच्या संदर्भात वित्त विभागाने सन 2010 मध्ये निर्बंध घातले होते पण ते फक्त दि. 22.8.2005 नंतरच्या भरतीबाबत मर्यादित होते. तसेच दि. 30.6.2011 रोजी पुन्हा एक वर्षासाठी तोच निर्णय एक्स्टेंड करण्यात आला. आता शासनाने दि. 31.12.2011 पर्यंतच्या अनुकंपा नियुक्तीसाठी असलेल्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांच्या भरतीवरील निर्बंध शिथिल करण्यास मान्यता दिली असून वित्त विभागाकडून याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, उत्तर में कहा गया है कि 2005 के बाद के लोगों को प्रतीक्षा सूची पर रखा गया है. इतने साल के बाद आप उनके डिपेन्डेन्ट को नौकरी देंगे तो वे कहीं ओवर-एज न हो जाए, इसके लिए क्या आप उनको एज लिमिट में रिलेक्सेशन देंगे ?

प्रा. फौजिया खान : महोदय, शासनाने अनुकंपा तत्वावरील भरतीसाठीची वयोमर्यादा 40 वर्षांवरुन 45 वर्षापर्यंत वाढविलेली आहे. तसेच सन 2005 पूर्वीची जी प्रतीक्षा यादी आहे त्यातील 1731 उमेदवार शिल्लक असून त्यानंतर 7849 एवढे उमेदवार प्रतीक्षा यादीत आहेत. या सर्वच यादीतील उमेदवारांची भरती करण्यासंबंधीचे निर्बंध उठविलेले आहेत.

श्री. कपिल पाटील : महोदय, सन 2005 पूर्वीच्या भरतीसाठी कोणतेही निर्बंध नव्हते पण तरी देखील त्यातील उमेदवारांना नियुक्ती दिलेली नाही. आता शासनाने जो निर्णय घेतला त्यानुसार सर्वच विभागांना कळवून सन 2005 पूर्वीच्या भरतीवरील निर्बंध उठलेले असल्याने ती पदे तातडीने व अगोदर भरावीत आणि त्यानंतरची पदे किती कालावधीत भरण्यात येतील ?

प्रा. फौजिया खान : महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, सन 2005 पूर्वीची 1731 उमेदवारांची प्रतीक्षा यादी असून त्यांना अगोदर नियुक्ती देण्यात येईल, उर्वरित पदांवरील भरतीसाठी असलेले निर्बंध उठविले असून त्यासंबंधीचे आदेश लवकरच निघतील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई शहराच्या धर्तीवर ठाणे शहरातील मोडकळीस आलेल्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी चटईक्षेत्र निर्देशांक वाढवून देण्याबाबत

(3) *25320 श्री.संजय केळकर, श्री.विनोद तावडे, श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.रामनाथ मोते : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी चटईक्षेत्र निर्देशांक 3 इतका देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मुंबई उपनगर व ठाणे शहर येथे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचे प्रमाण जास्त असून तेथील रहिवाशी जीव मुठीत धरुन वास्तव्य करीत आहेत, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, मुंबई शहराप्रमाणे या शहराला पुनर्विकासाच्या दृष्टीने चटईक्षेत्र निर्देशांक 3 इतका देण्याची स्थानिक जनता व लोकप्रतिनिधींकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, श्री.दिनेश अफजलपूरकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने देखील आपल्या अहवालात अशा शिफारशी शासनास केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(5) मुंबई उपनगर व ठाणे शहरास भविष्यात होणारी जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी मुंबई शहराप्रमाणे चटईक्षेत्र निर्देशांक 3 देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) अंशत: होय.

मुंबई शहरातील "अ" वर्ग उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी शासनाकडील दिनांक 21.05.2011 च्या अधिसूचनेअन्वये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, 1991 नियम 33(7) मध्ये फेरबदल मंजूर झालेला असून त्यानुसार चटईक्षेत्र निर्देशांक 2.5 वरून 3.00 इतका करण्यात आलेला आहे.

(2), (3), (4), (5) व (6) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम क्रमांक 33 (6) नुसार जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीसंदर्भात अस्तित्वातील इमारतीचा चटईक्षेत्र निर्देशांक व नियमावलीप्रमाणे अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांक यापैकी जास्त चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे.

ठाणे शहरामध्ये अधिकृत धोकादायक इमारतीच्या विकासासाठी नियमामध्ये असलेल्या इतर

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अटी / शर्तीनुसार दाट वस्तीबाहेरील क्षेत्रामध्ये कमाल 2.00 चटईक्षेत्र निर्देशांक व दाटवस्तीमधील क्षेत्रामध्ये कमाल 3.00 चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे.

वरील तरतुदीनुसार जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास अनुज्ञेय आहे.

मुंबई उपनगरामध्ये धोकादायक व मोडकळीस आलेल्या जुन्या इमारतीसाठी प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक देण्याबाबतची शिफारस श्री.दिनेश अफझलपूरकर यांच्या समितीने शासनास केलेली आहे. त्याप्रमाणे प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

तसेच, ठाणे शहरामधील अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे / धोकादायक इमारतीच्या संदर्भात पुर्नविकासासाठी श्री.बी.के.अग्रवाल समितीच्या शिफारशी विचारात घेऊन त्यावर निर्णय घेण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

श्री. संजय केळकर : महोदय, हा प्रश्न सन 2009 पासून वेगवेगळ्या आयुधांच्या माध्यमातून सभागृहात उपस्थित करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. त्यात मग तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना अथवा अन्य आयुधांचा वापर करुन शासनाचे लक्ष वेधलेले आहे. यासंदर्भात दि. 3.2.2011 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. अशोक चव्हाण यांनी एक बैठक घेतली होती. त्यांच्याकडे आम्ही जवळपास 25 हजार लोकांची स्वाक्षरी असलेले निवेदन देऊन भेट सुध्दा घेतली होती. त्यावर अद्याप कोणताही निर्णय मात्र झालेला नाही. दरम्यानच्या काळात "आदर्श" सोसायटीचे प्रकरण सुध्दा पुढे आले पण ठाण्यातील लाखो लोकांचा प्रश्न मात्र अद्यापही सुटलेला नाही. अशाच प्रश्नासाठी शासनाने मुंबईत अफझलपूरकर समिती, पुण्यात एक समिती आणि ठाण्यात सुध्दा अग्रवाल समिती नियुक्त केली होती. त्याचबरोबर डिसेंबर, 2010 मध्ये नागपूर अधिवेशनात शासनाच्या वतीने सांगण्यात आले होते की, यासंदर्भात जी समिती नियुक्त केली तिचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत धोरण जाहीर करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रमाणित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

या सगळया विषयाला 3.5 वर्षे होऊन गेलेली आहेत. या प्रश्नाच्या निर्णयाकडे धोकादायक इमारतीमध्ये राहणारे रहिवासी डोळे लावून बसलेले आहेत. त्यामुळे या विषयाच्या संदर्भातील निश्चित धोरण शासन जाहीर करणार आहे काय, समितीची अहवाल आला आहे काय? नाही तर पावसाळयात पुन्हा इमारती कोसळून जिवीत व वित्त व जीवीत हानी होईल परंतु त्याचे काहीही सोयरसुतक राज्य सरकारला राहणार नाही. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात निश्चित धोरण काय राहणार आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी दिली तर बरे होईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मुंबई व ठाणे शहरांचा प्रश्न क्लब करुन विचारलेला आहे. ठाण्यामध्ये ज्या धोकादायक इमारती आहेत, अनाधिकृत इमारती आहेत त्यांना एफएसआय किती देणार व या इमारती रेग्युलराईज करण्याच्या दृष्टीने शासनाचे नक्की धोरण काय राहणार आहे असा प्रश्न उपस्थित केलेला आहे.

सभापती महोदय, धोकादायक व अनाधिकृत इमारतींच्या संदर्भात सातत्याने मागणी होत आहे ही वस्तुस्थिती आहे व शासन या प्रश्नाच्या दृष्टीने सकारात्मक विचार करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे. ही मागणी होत असतांना सन्माननीय सदस्य म्हणतात की, महसूल खात्याची जी जागा असते त्यावरील बांधकामे रेग्युलराइज करतांना त्यासंदर्भात काही नियम असले पाहिजे. तसेच दुसरे असे की, नागपूर शहरामध्ये गुंठेवारीचा 2001 साली कायदा आणला होता त्याचा सुध्दा वापर करावा. एमआरटीपी ॲक्ट,1966 नुसार कायद्यामध्ये तरतूद करावी किंवा 2006 साली उल्हासनगर शहरासाठी शासनाने धोरण आखले होते तशा प्रकारचा कायदा करुन ठाणे शहर किंवा ठाणे जिल्हयाचा प्रश्न सोडवावा अशी प्रकारची मागणी होती. त्यामुळे बी.के.अग्रवाल यांचा अहवाल आल्यानंतर या सगळया बाबतीत कायद्यामध्ये एकत्रित तरतूद कशा प्रकारे करता येईल यासाठी राज्याचे नगररचनाकार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली गेली होती व या समितीचा अहवाल आला आहे काय अशी विचारणा सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. या समितीचा अहवाल शासनाला दि. 9.11.2011 रोजी प्राप्त झालेला असून यासंदर्भात शासन अंतिम निर्णय घेण्याच्या निष्कर्षाप्रत आलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 25320 .....

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये मला अनाधिकृत बांधकामाचा उल्लेख आढळलेला नाही असे असतांनाही मंत्रीमहोदयांनी त्याचा उल्लेख केलेला आहे. मुंबई शहर व ठाणे शहरांच्या धोकादायक इमारतींचा प्रश्नामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. मुंबई शहरापुरती रिपेअर बोर्डाची जी हद्द आहे ती वाढविण्याची मागणी गेल्या दोन तीन वर्षापासून सातत्याने होत आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, यासंभर्भात गेल्या दोन तीन वर्षापासून सातत्याने मागणी होत असतांना शासनाकडून सांगितले जात आहे की, शासन यासंदर्भात सकारात्मक असून त्यासाठी अफजलपूरकर समिती नेमण्यात आलेली आहे. त्यामुळे धोकादायक इमारतीच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय किती दिवसात पूर्ण करणार आहे व त्यासंदर्भातील घोषणा या अधिवेशनाच्या काळातच केली जाणार आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या लक्षात एक बाब आणून द्यावयाची आहे की, प्रश्नामध्ये "ठाणे शहरातील अनाधिकृत बांधकामे" असा वाक्य प्रयोग करण्यात आल्यामुळे त्यासंदर्भात मी उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी धोकादायक इमारतींच्या संदर्भात निर्णय किती दिवसात घेतला जाईल असा प्रश्न उपस्थित केलेला असल्यामुळे मी सभागृहाला सांगू इच्छितो की, यासंदर्भातील निर्णय लवकरात लवकर घोषित केला जाईल.

उप सभापती : आता पुढील तारांकित प्रश्न पुकारण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ठाणे शहराच्या धोकादायक इमारतींच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी उपस्थित केलेला आहे. हा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत. बिल्डरांच्या अनाधिकृत बांधकामाच्या प्रश्नाला आपण 20 मिनिटांचा अवधी दिलेला आहे परंतु जेथे जनतेचा जीव धोक्यात येऊ शकतो अशा प्रश्नावर 2-4 मिनिटात पुढे जाणे मला तरी योग्य वाटत नाही त्यामुळे मी प्रश्न उपस्थित करण्याची विनंती केली व आपण त्या विनंतीस मान देऊन प्रश्न विचारण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. मला पहिल्यांदाच असे विचारावयाचे आहे की, माननीय राज्य मंत्र्यांना या विषयावर सांगण्याचा अधिकार आहे काय ? त्यांना सांगण्याचा अधिकार असेल तरच मी प्रश्न विचारतो.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25320...

श्री.विनोद तावडे....

त्यांना अधिकार नसेल तर तो प्रश्न राखून ठेवावा. माननीय मुख्यमंत्री सभागृहात असताना आम्हाला हा प्रश्न विचारण्यास आपण अनुमती द्यावी. ह्या प्रश्नासंबंधी काही तरी लॉजीकल एन्ड आला पाहिजे. माननीय राज्यमंत्र्यांना अधिकार नसेल तर मग आमचा प्रश्न देखील वाया जातो. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवावा. ज्यावेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहात येतील तेव्हा आपण हा प्रश्न चर्चेला पुन्हा घ्यावा. आम्हाला काही घाई नाही, एवढीच मला विनंती करावयाची आहे.

उप सभापती : माननीय विरोधी पक्ष नेते आपणाला कसली घाई नाही ?

श्री.विनोद तावडे : : सभापती महोदय, दर अधिवेशनाला शासन अफझलपूरकर रिपोर्ट विचाराधीन आहे असेच उत्तर देत असते. त्यामुळे शासनाची विचाराची मंद गती काय आहे हेच मला कळत नाही. याचे जर उत्तर येणार नसेल तर हा प्रश्न खरोखरच राखून ठेवावा. ज्यावेळी मुख्यमंत्री सभागृहात येतील त्यावेळी यासंबंधी उत्तर घेण्याचा प्रयत्न करू या.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, मी अत्यंत स्पष्टपणे सांगितले आहे की, महसूल विभागाच्या जमिनीवर झालेले बांधकाम नियमित करताना, त्याला एफएसआय देताना कोणता कायदा, नियम वापरावा यासंबंधी देखील चर्चा झाली आहे. उल्हासनगर करिता शासनाने नियम केला आणि निर्णय घेतला. त्या धर्तीवर हा निर्णय घ्यावा अशी देखील मागणी करण्यात आली आहे. एमआरटीपी ॲक्ट 1966 च्या अन्वये निर्णय घ्यावा असा देखील उल्लेख मी येथे केला आहे. नागपूर शहराकरिता एकत्रित गुंठेवारी करण्याचा निर्णय घेतला आहे, तो नियम अवलंबवावा काय, याचा एकत्रितपणे अभ्यास करण्यासाठी नगररचनाकार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे. त्यांचा दिनांक 9.11.2011 रोजी अहवाल आलेला आहे. निर्णय घेण्यापूर्वी आपल्याला काही कायद्यांमध्ये बदल देखील करावा लागणार आहे. त्यामुळे शासन अंतिम निर्णय घेण्याच्या निष्कर्षाप्रत आलेले आहे, असा माझा मघाशी शब्दप्रयोग होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : माननीय मंत्रिमहोदय, आता आपण सांगितले की, शासन अंतिम निष्कर्षाप्रत आलेले आहे. आता आपल्याला तीन महिन्यांचा अवधी पाहिजे आहे. आपण मागितल्याप्रमाणे मी आपल्याला तीन महिन्यांचा निश्चित असा कालावधी देतो. परंतु, पुढच्या अधिवेशनाच्या आत आपण निर्णय घेतला पाहिजे. जुलैमध्ये आपले पुढचे अधिवेशन होईल. त्यामुळे आपल्याला तीन महिन्यांचा कालावधी मिळतो. तेव्हा त्या अधिवेशनामध्ये या संबंधीचा निर्णय ह्या सभागृहामध्ये झाला पाहिजे किंवा त्या आधी झाला पाहिजे, एवढा मी आपल्याला निदेश देत आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मुंबईतील उपनगरातील स्वरूप बघितले तर शासनाने पेंडींग असलेल्या प्रश्नासंबंधी निर्णय घेतलेला आहे. मी सांगतो की, पुढच्या अधिवेशनाच्या पूर्वी निश्चितपणे शासन या संबंधातील अंतिम निर्णय घेईल.

उप सभापती : पुढचे अधिवेशन म्हणजे पुढचे अर्थसंकल्पीय अधिवेशन नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, येणाऱ्या अधिवेशनापूर्वी अंतिम निर्णय घेण्यात येईल.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या पुष्पनगर येथील भूखंडासह 25 भूखंड भाडेपट्टयाच्या नावाखाली विकासकांना विकणे

(4) * 25706 श्री.सतीश चव्हाण , श्री.एम.एम.शेख , श्री.विक्रम काळे : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या पुष्पनगर येथील भूखंडासह 25 भूखंड भाडेपट्टयाच्या नावाखाली खाजगी विकासकांना विक्री करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या प्रकरणास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) असे निदर्शनास आले नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांना विचारू इच्छितो की, उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : नाही.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, अत्यंत धडधडीत असत्य उत्तर दिलेले असल्यामुळे शासनाने अधिकाऱ्यांची चौकशी केली पाहिजे. उत्तरात असे म्हटले आहे की, कुठलाही प्रोजेक्ट बीओटीवर सुरू नाही. चार प्रोजेक्ट पूर्ण झालेले आहेत. त्यापैकी स्वीमिंग पूलचा एक प्रोजेक्ट माझ्या घरालाच लागून आहे. मी तेथे रोज पोहायला जातो आणि उत्तरात म्हटले आहे की, एकही प्रोजेक्ट सुरू नाही. महापालिकेने काय केले हे मी काही विचारणार नाही. महापालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही हे कारण पुढे करून प्रोजेक्ट आणत आहेत. जे प्रोजेक्ट पूर्ण झाले त्याबद्दल आमचे काहीच म्हणणे नाही. भविष्यात कुठलाही प्रोजेक्ट बोआटीवर देऊ नये असे आदेश शासन महापालिकेला देईल काय तसेच, अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिल्याबद्दल त्यांच्याविरूद्ध हक्कभंग आणता येईल काय ?

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25706 . . . .

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हक्कभंग आणणे की न आणणे हा सन्माननीय सदस्यांचा अधिकार असून त्याबाबत त्यांनी काय ते ठरवावयाचे आहे. पण सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, याबाबतीत अशा प्रकारची धडधडीत असत्य माहिती दिलेली आहे.आपण माझा शब्द लक्षात ध्यावा. जर संबंधित अधिकाऱ्यांनी खोटी माहिती दिली असेल आणि सन्माननीय सदस्यांनी तशा प्रकारचे पुरावे आणि माहिती दिली तर सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती ग्राह्य धरुन त्या अनुषंगाने कारवाई करणे ही आपल्या सभागृहाची प्रथा आहे.मी आपल्यामार्फत सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाच्या अनुरुप जर योग्य ती माहिती दिली आणि सन्माननीय अधिकाऱ्यांनी खोटी माहिती दिली असेल तर कठोरातील कठोर शिक्षा करुन अधिवेशन संपण्यापूर्वी त्यासंबंधीची माहिती घेण्याची जबाबदारी मी याठिकाणी घेतो. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न सांगितला की, याठिकाणी अशा प्रकारची बांधकामे झाली ती झाली, परंतु यापुढे होणार नाहीत काय? परंतु मुळातच अशा प्रकारची बांधकामे झाली आहेत की नाही याबाबत शोध घेऊ या आणि जर तसे झाले असेल तर त्यांच्यावर कारवाई करु या. पण माझी आताची माहिती अशी आहे की, महानगरपालिकेने स्वत:च्या मालकीची अशा प्रकारची कोणतीही बांधकामे किंवा अशा प्रकारचा कोणताही भाडेपट्टा कोणालाही दिलेला नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्याकडे दिनांक 30 जानेवारी 2012 चे दैनिक सामना हे वर्तमानपत्र आहे.

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : आमच्याकडे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जर तुमच्याकडेही असेल तर ते तुम्ही वाचावे. "आमच्याकडेही आहे"असे जे म्हटले त्याचा अर्थ काय? मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की,याचा इतिहास 1956 सालापासूनचा आहे आणि मनपाने सांगितले की, तो आमचा भूखंड आहे. याबाबतीत न्यायालयीन लढा देत-देत शेवटी मनपाला सदरहू भूखंड 2010 मध्ये मिळाला. ज्यावेळी खाजगी विकासकांना भूखंड देण्याचा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी 24 मे 2010 रोजी विधीज्ञ श्री.राजेंद्र देशमुख यांनी बिल्डरच्या बाजूने अभिप्राय दिला की, भूखंड देऊन टाका. आता तेथे बांधकाम देखील सुरु झालेले आहे अशी यातील बातमी आहे. माझ्याकडे जी माहिती होती, ती मी दिली.मनपाच्या खांद्यावर कोणाचे ओझे आहे असे आयुक्तांना विचारले तर ते फक्त हसले. मी याबाबतीत वेगळा प्रश्न विचारणार आहे कारण तो याच्याशी संबंधित नाही. पण मनपाचे अधिकारीच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25706 . . . .

श्री.दिवाकर रावते . . ..

हे महापालिकेला प्रचंड प्रमाणात लुटत आहेत अशा प्रकारची नावानिशी बातमी आहे. त्यामुळे मघाशी तुम्ही जे म्हटले त्याचे मी स्वागत करीत आहे कारण तुम्हाला आता भातकरांवरच कडक कारवाई करावी लागणार आहे. काय परिस्थिती आहे ते पहा. ही जागा बिल्डरला दिली. त्यांच्यात दोन पाटर्नर आहेत. त्यामधील एक श्रीमती अर्चना जोगळेकर यांचे कदाचित त्यांच्याशी कौटुंबिक संबंध आहेत. अशा प्रकारे कुटुंबातील एका व्यक्तीला त्यांनी त्यांच्या मुलाची पार्टनरशीप मध्ये जागा दिली अशा प्रकारच्या सर्व बातम्या आहेत म्हणजेच कुंपणच शेत खात आहे. अशा प्रकारे जर आयुक्तांकडे निर्णय क्षमता असेल आणि शेकड्याच्याच घरातील अधिकारी बुडवित आहेत आणि महानगरपालिकेचे आयुक्त काहीही करण्यास तयार नाहीत अशी तेथे परिस्थिती निर्माण झालेली आहे. माझी तुम्हाला एवढीच विनंती आहे की, या पध्दतीने खाजगी बिल्डरनां निविदा न काढता, धोरण न ठरविता किती भूखंड दिले असतील याबाबतीत आपण चौकशी करावी. तसेच मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, पुण्याचे आयुक्त जे संभाजीनगर मध्ये आयुक्त म्हणून आले होते. त्यांनी असे सांगितले की, 800 कोटी रुपयांची बेकायदेशीर बांधकामे झालेली आहेत आणि ते भूखंड महापालिकेचे आहेत म्हणून तेथील काम तोडावयास घेतले होते.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अप्रमाणित प्रत / अप्रमाणित प्रत

ता.प्र.क्र.25706...

श्री.दिवाकर रावते....

श्री.बंड यांना पुन्हा आयुक्त पदावर आणावे अशी माझी विनंती आहे. कारण त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या कारवाया गंभीर होत्या. त्यांची तेथून बदली करण्यात आली. खरे म्हणजे त्यांची चौकशी केली पाहिजे. संभाजीनगर पालिकेने 800 कोटी रुपयांचे भूखंड गिळंकृत केले होते म्हणून त्यांनी तेथे बुलडोझर लावले होते. वर्तमानपत्रात सर्व बातम्या आल्या. या बातम्या असत्य असतील तर वर्तमानपत्रांवर कारवाई करावी. वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या असत्य आहेत याचा खुलासा देखील महानगरपालिका आयुक्त करीत नाही. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण सांगत आहेत की, त्या जलतरण तलावामध्ये ते स्वत: पोहोयला जातात. त्यांच्या चार नातेवाईकांनी असे भूखंड घेतलेले आहेत. ते म्हणाले जे झाले ते झाले, परंतु पुढे असे व्हायला नको आणि जे झाले आहे त्यांना लटकावू नका हा त्यातील भाग आहे. तेव्हा आपण हे प्रकरण बाहेर काढा म्हणजे काय झाले आहे ते आपणास समजेल. तेव्हा याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांचे मूळ प्रश्नाकडे लक्ष वेधू इच्छितो. पहिली गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्य बी.ओ.टी.तत्वाचा उल्लेख करीत आहेत. हा खाजगी डेव्हलपर्सच्या संदर्भातील प्रश्न आहे त्याचा बी.ओ.टी.शी काही संबंध नाही. सन्माननीय सदस्यांनी जानेवारी 2012 वा त्या दरम्यान हा प्रकार उघडकीस आला हे खरे आहे काय असा प्रश्न विचारला. मी प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर दिलेले आहे. प्रश्नानुरुप म्हणजे प्रश्नाच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल हे मी सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी काही वर्तमानपत्रांचा येथे उल्लेख केला आणि सांगितले की, वर्तमानपत्रावर कारवाई करणार काय ? त्याबाबत सांगू इच्छितो की, वर्तमानपत्रांवर कारवाई करण्याचा आपल्याला अधिकार नाही. साधारणत: सभागृहात वर्तमानपत्रातील बातमीच्या आधारे विचारलेले प्रश्न तितकेसे गांभीर्याने घेतले जात नाहीत अशी सभागृहाची प्रथा आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी या ठिकाणी वस्तुनिष्ठ माहिती दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी देखील काही माहिती दिली.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वर्तमानपत्रात जी बातमी आली ती आमच्या वाचनात आली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन वार्ताहर बातमी काढत असतात. आपण वर्तमानपत्रास लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणतो. सन्माननीय मंत्री महोदय येथे सांगत आहेत की, वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या तितक्या ग्राह्य धरत नाहीत. तर मग आपण वार्ताहर गॅलरी कशासाठी ठेवली आहे आणि सभागृहात काय झाले हे वार्ताहर लिहीत आहेत त्यास जनता कशाला ग्राह्य धरेल ? वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या ग्राह्य धरायच्या नाहीत असे सन्माननीय मंत्री महोदयांनी एक विदारक सत्य आणलेले आहे. तेव्हा आपण येथील वार्ताहर गॅलरी बंद करावी. कारण वर्तमानपत्रात जे काही येईल ते जनतेने कशाला ग्राह्य धरायचे, आणि त्यांना चौथा स्तंभ तरी कशाला म्हणायचा ?

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनी बिल्डरला आंदण म्हणून देण्याचे काम झालेले आहे. मी आपणास काही नावे वाचून दाखवितो. महापौर बंगल्याच्या बाजूला, रेल्वे स्टेशन येथे मल्टीफ्लेक्स उभारण्यात आलेले आहे आणि हे काम तेजस कन्स्ट्रक्शनला देण्यात आलेले आहे. सिध्दार्थ उद्यानासमोर फूडप्लाझा उभारण्यासाठी जागा दिलेली आहे. शहानूर मिया दर्गा परिसर येथे शॉपिंग मॉल उभारण्याचे काम सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी स्वत: सांगितले की, ज्योतीनगर येथे जलतरण तलाव केलेला आहे आणि ते स्वत: तेथे पोहावयास जातात. ही सर्व ढळढळीत उदाहरणे असताना लेखी उत्तरामध्ये हे खरे नाही, प्रश्न उद्‌भवत नाही अशी असत्य माहिती दिलेली आहे. या ठिकाणी जी असत्य माहिती देण्यात आलेली त्याबाबत सन्माननीय सदस्य हक्कभंग आणणार आहेत. परंतु असत्य माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांना शासन निलंबित करणार काय ?

असंशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25706...

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा विनम्रपणे सांगू इच्छितो की, एमआरटीपी ॲक्ट, 1979 नुसार महानगरपालिकेला स्वत:च्या मालमत्तेची विक्री, विनियोग, हस्तांतरण करण्याचा किंवा भाडयाने देण्याचा अधिकार आहे. बाजारभावापेक्षा कमी दराने प्रॉपर्टी द्यायची असेल तर त्यासाठी महानगरपालिकेने शासनाची परवानगी घेतली पाहिजे असा नियम आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25706....

श्री. भास्कर जाधव ...

सन्माननीय सदस्य तेच सांगत आहेत. त्यामुळे मी पुन: पुन: सांगितले की, आपण ती माहिती द्यावी. माहिती दिल्यानंतर या प्रश्नानुरुप अधिकाऱ्यांनी जर खोटी माहिती दिली असेल तर या सभागृहात यापूर्वीच सांगितल्यानुसार अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाई करण्यात येईल हे मी कबूल केलेले आहे. बीएमसी ॲक्ट 79 प्रमाणे त्यांनी ही कारवाई केली असेल आणि ती नियमबाह्य केली असेल तर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील डी.एन.नगर येथील म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास करणे

(5) * 25434 श्री.किरण पावसकर,ॲड. उषा दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.जयवंतराव जाधव : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील डी.एन.नगर येथील म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास दोन विकासकांच्या वादात रखडला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर वसाहतीचा विकास करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सचिन अहिर श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1), (2), (3) व (4) डी.एन.नगर अभिन्यासामधील इमारत क्रमांक 2 ते 9 या एकूण 8 इमारतींची एक फेडरेशन स्थापन करण्यात आलेले आहे. फेडरेशनने पुनर्विकासासाठी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडे 70% संमतीपत्राचा ठराव घेऊन प्रस्ताव सादर केलेला होता. सदर ठरावात संस्थेने विकासक म्हणून वैदेही आकाश यांची नियुक्ती केलेली होती व वास्तुशास्त्रज्ञ म्हणून एलोरा प्रोजेक्ट कन्सल्टंट यांची नियुक्ती केलेली होती, तद्नंतर संस्थेने विकासक वैदेही आकाश व वास्तुशास्त्रज्ञ एलोरा प्रोजेक्ट कन्सल्टंट यांची नियुक्ती रद्द करून रुस्तमजी यांची विकासक म्हणून व मिठी यांची वास्तुशास्त्रज्ञ म्हणून नेमणूक केलेली असून त्या अनुषंगाने विकास करारनामा केला आहे. संस्था व विकासक हे विकास करारनामा परस्पर करीत असतात संस्थेच्या विंनतीनुसार मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने संस्थेस / फेडरेशनला दिनांक 1.7.2006 रोजी त्यात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने नाहरकत प्रमाणपत्र जारी केलेले आहे. सदर भूखंड सी.आर.झेड. ने बाधित असल्यामुळे संबंधित विभागाच्या परवानग्या घेऊन पुढील बांधकामाची कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय, श्री. सचिन अहिर यांचा वाढ दिवस असल्यामुळे मी प्रथम त्यांचे अभिनंदन करतो आणि त्यांना निरोगी उदंड आयुष्य लाभो अशा शुभेच्छा देतो.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मी याबाबत बोलणार होतो.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय,अंधेरी पश्चिम, मुंबई येथे म्हाडाची न्यू डी.एन.नगर वसाहत आहे. ही वसाहत 20218 चौ.मीटरच्या भूखंडावर वसलेली आहे. त्याचबरोबर त्याठिकाणी मनोरंजनासाठी 7000 स्क्वेअर मीटरचा आणखी एक पट्टा आहे. या वसाहतीतील रहिवाशांनी एकत्रित येऊन एक युनियन तयार केली आणि पुनर्विकासासाठी सन 2005 मध्ये निविदा मागविल्या. या ठिकाणी 480 रहिवाशी रहात आहेत. त्यांनी त्या काळात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25434....

श्री. किरण पावसकर...

वैदेही आकाश हौसिंग प्रा. लि.ला मान्यता दिली. उत्तरात म्हटल्याप्रमाणे त्यानंतर दुसऱ्या रुस्तमजी रिअल इस्टेट यांच्या बरोबर करार करण्यात आला. तिघांबरोबर वेगवेगळा करार करताना तेथील मूळ रहिवाशांना जे 540 स्क्वेअर फूटचे घर देण्यात येणार होते ते 480 स्क्वेअर फूटाचे करण्यात आले. माझा प्रश्न एवढाच आहे की, ही वसाहत म्हाडाची आहे. म्हाडा स्वत:ची वसाहत अशा लोकांना पुनर्विकासासाठी देत आहे. तेथे हजारो करोड रुपयांचा फायदा होणार आहे. हजारो करोड रुपये या रुस्तमजी रिअल ईस्टेट यांना मिळणार असतील तर या वसाहतीचा पुनर्विकास म्हाडा स्वत: का करीत नाही?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मुंबईमध्ये एक नवीन व्यवसाय आलेला आहे. री-डेव्हलपमेंट करताना किंवा एसआरएच्या योजना घेताना छोटया कंपन्या पुढे येतात काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने तेथील रहिवाशांची मनधरणी करतात. त्यातून एक ग्रुप फॉर्म होतो. त्यातून याच्या मान्यता मिळविल्या जातात त्यानंतर या मोठया कंपन्यांना सेलेबल कॉम्पोनन्ट किती आहे या बेसिसवर पुन्हा या अधिकाऱ्यांनाच बरोबर घेऊन त्यांच्याशी चर्चा करुन त्यांच्याकडे हा सेलेबल कॉम्पोनन्ट दिला जातो. त्यामध्ये मोठ-मोठया कंपन्यांची नावे आहेत. म्हाडा आपल्या मूळ उद्देशापासून दूर गेल्यानंतर या व्यवसायात टाटा, गोदरेज, रुस्तमजी आणि एल.टी. या रिअल ईस्टेट आलेल्या आहेत. म्हाडाचे अधिकारी तसेच शासनाचे काही अधिकारी या कंपन्यांचे प्रतिनिधी म्हणून काम करीत आहेत. मी जाणीवपूर्वक ही गोष्ट सांगतो की, शासनाचा मूळ उद्देश असा होता की, रहिवाशांना चांगली घरे मिळावीत, त्यांचे राहणीमान चांगले व्हावे. एसआरए योजनेंतर्गत झ ोपडपट्टीचे निर्मूलन करुन त्यांचेही राहणीमान चांगले व्हावे. या प्रकरणासारखी अशी कित्येक प्रकरणे आहेत की त्याठिकाणी मोठे खाजगी बिल्डर आलेले आहेत. ते हजारो, करोडो रुपये घेत आहेत आणि आजही रहिवाशी मात्र बाहेर रहात आहेत. डी.एन. नगरमधील रहिवाशी मागच्या 6 वर्षापासून बाहेर रहात आहेत. शासनाने उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, सुरुवातीला वैदेही आकाश यांची नियुक्ती केली होती त्यानंतर त्यांनी रुस्तमजी यांना काम दिलेले आहे. आता त्यांना परवानगी मिळावयाची आहे. सभापती महोदय, अंधेरी पश्चिम सारख्या भागामध्ये म्हाडाचे पैसे लुटून दुसरे बिल्डर मोठे होणार असतील तर त्यामध्ये शासनाने हस्तक्षेप करुन तेथील रहिवाशांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25434....

श्री. किरण पावसकर....

न्याय देण्यात येईल काय तसेच अशा प्रकारे पुनर्विकास करण्याचे काम पहिल्यांदा एका कंपनीला द्यायचे, नंतर दुसऱ्या कंपनीला द्यायचे आणि त्यानंतर तिसऱ्या कंपनीला द्यायचे अशी रहिवाशांची फसवणूक होत असेल तर शासन त्याच्यामध्ये हस्तक्षेप करुन म्हाडा स्वत: या ठिकाणी पुनर्विकास करणार आहे का?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे सांगितलेले आहे ते काही अंशी खरे आहे. मुंबई शहरामध्ये दोन-तीन विभाग असे आहेत विशेष करुन झोपडपट्टीमध्ये राहणारी जी व्यक्ती आहे मग ती शासकीय जमिनीवर असेल किंवा खाजगी जमिनीवर असेल त्यांना अधिकृत दर्जा देऊन त्या ठिकाणी पुनर्विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यावर शासन निश्चितपणे काही अंकुश ठेवू शकते. परंतु अनुभव असा आहे की, मोठया प्रमाणात खाजगीकरणाच्या माध्यमातून पुनर्विकास करण्याचा लोकांचा कल आहे ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25434.... श्री. सचिन अहिर ....

म्हणून या अगोदर सुध्दा म्हाडाच्या माध्यमातून हे करण्याचा प्रयत्न केला. या ठिकाणी एक गोष्ट सांगावी लागेल की, हे जे भाडेकरु आहेत ते म्हाडाचे भाडेकरु नाहीत. काही वर्षे अगोदर त्यांना म्हाडाच्या जमिनीवर मालकी हक्काने हे फ्लॅट्स दिल्यानंतर त्यांनी संयुक्तरित्या हा विचार केलेला आहे. ज्यावेळी त्यांना हे फ्लॅट्स देण्यात आले त्यामध्ये एलआयजीचे फ्लॅट्स असतील, एमआयजीचे फ्लॅट्स असतील आणि त्यांनी त्याही पेक्षा मोठ्या घरामध्ये जावे ही आपली अपेक्षा होती. म्हणून आपण नियम 33(5) मध्ये नवीन सुधारणा करुन, आहे त्यापेक्षा जास्त मोठे बांधकाम करुन घेऊन किंवा जास्त चटईक्षेत्र देऊन त्यांना चांगली घरे देऊ शकतो का याचा विचार केला. त्या चटईक्षेत्रावर प्रिमियम आकारुन हे करण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे.

सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, अनेक ठिकाणी आता बार्गेनिंग सुरु झालेले आहे. आपण 400 फुटाची किंवा 414 फुटाची सिलिंग लावली पण आता 400 फुटाऐवजी कोणी 500 फूट जागा मागतात, कोणी 700 फूट जागा मागतात तर कोणी 1 हजार फूट जागा मागतात. या सर्व गोष्टी आपल्याला पहावयास मिळतात. म्हणून म्हाडाने स्वत: हे करावयाचे का या बाबतीत विचार करुन काही भागामध्ये, काही क्लस्टरमध्ये शासनाच्या माध्यमातून ते करण्याचा प्रयत्न केला. या पुढच्या काळामध्ये खाजगी विकासकाने ते न करता म्हाडाने करावयाचे का याचा विचार केला. ही भूमिका शासनाच्या वतीने घेतल्यानंतर त्याला भाडेकरुंचा प्रचंड मोठ्या प्रमाणावर विरोध झाला. भाडेकरुंचा मूलभूत हेतू असा होता की, आम्ही या ठिकाणी ओनरशीपने राहात आहोत आणि आपण आम्हाला फक्त एफएसआय देता, त्यासाठी आम्ही तुम्हाला प्रिमियम देतो. त्यामुळे आमचा विकास केव्हा करावा, कोणी करावा हे शासन आमच्यावर लादू शकत नाही, अशा प्रतिक्रिया काही फेडरेशनच्या माध्यमातून देण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, याही प्रकरणामध्ये वारंवार विकासक बदलण्याची प्रक्रिया झाली. अर्थात विकासक बदलण्याच्या बाबतीत आपले कोणतेही नियंत्रण नसते. कारण फेडरेशन ॲक्ट प्रमाणे किंवा सोसायटी ॲक्ट प्रमाणे फेडरेशनने जो बहुमताने निर्णय घेतलेला आहे किंवा 70

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

टक्के पेक्षा जास्त लोकांनी जो निर्णय घेतलेला आहे तो शासन म्हणून आपल्यावर बंधनकारक असतो. या प्रकरणामध्ये किंवा ज्या ठिकाणी म्हाडाच्या ज्या काही जमिनी आहेत त्या ठिकाणी भाडेकरु ओनरशीपने जरी राहात असले तरी ते लोक जर पुढे येत असतील तर निश्चितपणे म्हाडाच्या माध्यमातून असे पुनर्विकासाचे काम हाती धेण्याची शासनाची तयारी आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, ज्या दोन तीन ठिकाणी विकासक बदलण्यामध्ये भाडेकरुंची किंवा तेथील रहिवाशांची फसवणूक झालेली आहे त्या ठिकाणी शासनाने हस्तक्षेप करुन म्हाडा स्वत: तेथील विकास करणार का ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी सांगितले की, रहिवाशांची जर तयारी असेल तर निश्चितपणे म्हाडा देखील हे प्रकल्प घेण्यास तयार आहे. किंबहुना हेच नाही तर मुंबई शहरामध्ये ज्या ठिकाणी दोन विकासक येत आहेत असे अनेक प्रकल्प अडकलेले आहेत. एका विकासकाने 100 फुटाची जागा देतो असे सांगितले तर दुसऱ्या विकासकाने सांगितले की, मी तुम्हाला 500 फुटाची जागा देतो. त्यामुळे लोकांची चलबिचल होते. ज्या ठिकाणी लोकांची तयारी असेल त्या ठिकाणी शासन स्वत: हे प्रकल्प घेण्यास तयार आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, या प्रश्नावर बोलत असताना मी दोन मुद्दे मांडू इच्छिते. मुंबई शहरामध्ये म्हाडाच्या 54 वसाहती आहेत. या 54 वसाहतींमध्ये सर्वसामान्य लोक राहतात. हे लोक वेगवेगळ्या ग्रुपचे आहेत. सगळेच लोक ओनरशीपचे नाहीत. काही लोक भाडे तत्वावर राहात आहेत, काही स्लम क्लिअरन्सचे लोक राहात आहेत तसेच काही ओनरशीपचे लोक राहात आहेत. पहिल्यांदा आपल्याला त्यांची वर्गवारी करणे गरजेचे आहे. कन्नमवार नगर, विक्रोळीमध्ये ज्या इमारती रस्त्यामध्ये गेल्या त्या लोकांना महानगरपालिकेमार्फत म्हाडाच्या ज्या इमारती दिल्या गेल्या त्या इमारतींचे आयुष्य आता संपलेले आहे. इमारत क्रमांक 30 ते 44 पर्यंत ही वस्ती आहे. त्यांचा पुनर्विकास होणे गरजेचे आहे. घाटकोपरचा कोणी तरी शहा नावाचा बिल्डर आला होता. तो कोण आहे हे मला माहीत नाही. त्यांनी पहिल्यांदा त्यांना मधाचे बोट दाखवले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25434.... श्रीमती अलका देसाई ....

आम्ही तुम्हाला घरे बांधून देऊ अशा प्रकारचे आश्वासन दिले. आज एनडीआय सारखा एक प्रगत बिल्डर त्या ठिकाणी आला. आता आमच्या एका सहकाऱ्यांनी या ठिकाणी सांगितले की, यांनी असे पॅकेज करावयाचे आणि नंतर ते कोणाला तरी सरेंडर करुन मधली दलाली घेऊन मोकळे व्हावयाचे आणि लोकांना मात्र रस्त्यावर आणून सोडावयाचे, असे चालले आहे. आज त्या ठिकाणी एनडीआय बिल्डर ते बांधकाम करु शकलेले नाही. लोकांना भाडे देऊ असे सांगितले परंतु ते सुध्दा दिलेले नाही.

माझा प्रश्न असा आहे की, ते बांधकाम कधी सुरु होणार आहे ? एमआयजी कॉलनी गांधीनगर, वांद्रे येथे मुंबई बोर्डाने तळमजला अधिक चार मजले अशी मंजुरी दिली. मुंबई बोर्डाच्या बैठकीमध्ये त्यांना परवानगी दिली. गृहनिर्माण विभागाचे सचिव त्यासाठी अत्यंत तळमळीने काम करताना दिसत होते.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25434..... श्रीमती अलका देसाई..

या मंडळींना मदत झाली पाहिजे. त्यावेळच्या वांद्रे येथील गृहनिर्माण मंडळाच्या कार्यालयात बसणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांनी त्या इमारतीचे व एनओसीचे वाटोळे केलेले आहे. गांधीनगर, वांद्रे (पूर्व) या भागातील इमारतींना परवानगी केव्हा दिली जाणार आहे, त्यांचे करोडो रुपये शासनाकडे पडून आहेत. त्या इमारतींना बांधकामाची केव्हा परवानगी मिळणार आहे ? सचिवांनी यापूर्वी तशा प्रकारचे आदेश दिल्यानंतरही गृहनिर्माण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्या आदेशाचे पालन केलेले नाही, त्यामुळे गृहनिर्माण मंडळाच्या अधिकाऱ्यांवर शासन केव्हा कारवाई करणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कन्नमवार नगर व गांधीनगर बाबत प्रश्न विचारले आहेत. पण मूळ प्रश्न त्यापेक्षा वेगळा आहे. काही विकासक जास्त एरिया देतो असे सांगून लोकांबरोबर ॲग्रीमेण्ट करतात. ॲग्रीमेण्ट केल्यानंतर लोकांना पश्चाताप होतो. म्हणून 2009 साली शासनाने सोसायटी ॲक्टमध्ये सुधारणा करुन असा निर्णय घेतला आहे की, या पुढील काळात सोसायट्यांना विकासक नेमावयाचा असेल तर त्यासाठी त्यांनी टेंडर काढावे, त्यासाठी प्रसिध्दी द्यावी, जाहिरात द्यावी. बिडींग मागवून ते सोसायटीच्या जनरल बॉडीच्या मिटिंगमध्ये ठेवावे. त्यानंतरच त्या विकासकाच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात यावे. अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेतला असल्यामुळे असे प्रकार होणार नाहीत.

सचिवांच्या स्तरावरील विषय उपस्थित करण्यात आला आहे की, सचिवांनी आदेश दिल्यानंतरही गृहनिर्माण मंडळाचे मुख्याधिकारी आदेशाचे पालन करीत नाहीत. याबाबतची दखल घेऊन त्या संदर्भात सचिवांना सूचना दिल्या जातील.

<u>तारांकित प्रश्न क्रमांक 25238 राखून ठेवण्याबाबत</u>

उप सभापती : माननीय मुख्यमंत्री महोदय विधानसभेच्या सभागृहातील कामकाजात व्यस्त असल्यामुळे मी हा प्रश्न राखून ठेवत आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई महानगरपालिकेतून निवृत्त झालेल्या निवृत्ती धारकांची थकबाकी वाटप केली नसल्याबाबत

(7) * 25710 **श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , श्री.अरुण गुजराथी , श्री.रमेश शेंडगे , ॲड.उषा दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई महानगरपालिकेतून निवृत्त झालेल्या 1 लाख 5 हजार निवृत्तीधारकांची 1200 कोटी रुपयांची थकबाकी वापराविना पडून असल्याचे माहे जानेवारी, 2012 च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर रक्कम वाटप न करण्याची कारणे काय आहेत,

(3) तसेच, सदर रक्कम वाटप करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, सदर रक्कम वाटपाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) महानगरपालिकेच्या सन 2011-12 च्या अर्थसंकल्पात निवृत्तीवेतन धारकांसाठी निवृत्तीवेतनादी लाभांच्या थकबाकीपोटी रक्कम रु.1063 कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

(2) व (3) दि.1.7.2005 ते 1.1.2006 रोजी किंवा त्यानंतर सेवा समाप्त झालेल्या निवृत्तीवेतनधारक / कुटूंब निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनात तसेच निवृत्तीवेतन नियमात सुधारण करण्यास महानगरपालिकेची जानेवारी 2012 मध्ये मान्यता प्राप्त झालेली असून महानगरपालिकेतील निवृत्तीवेतनधारक/ कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांना सुधारित वेतनश्रेणी व सुधारित निवृत्तीवेतन नियम यानुसार निवृत्तीवेतनादी फायदे देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच माहे डिसेंबर, 2011 पासून मूळ निवृत्तीवेतनादी / कुटुंब निवृत्तीवेतनाच्या 5 टक्के अंतरिम वाढ देण्यात येत आहे. तसेच निवृत्तीवेतवादी फायद्यांच्या संभाव्य थकबाकीपोटी रु.25000/- इतकी ठोस आगाऊ रक्कम माहे मे, 2010 मध्ये अधिदानीत करण्यात आली आहे. यावर्षी थकबाकीपोटी 5 टक्के अंतरिम वाढ देण्याच्या संदर्भात उपलब्ध तरतूद रु.1063 कोटींपैकी आतापर्यंत रु.3.86 कोटी खर्ची पडलेली आहे. पुढील दोन महिन्यात निवृत्ती वेतनाच्या थकबाकीपोटी देय रक्कमेची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांना लेखी उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेतून निवृत्त झालेल्या 1 लाख 5 हजार निवृत्तीधारकांची 1200 कोटी रुपयांची थकबाकी वापराविना पडून आहे काय, असा मी प्रश्न विचारला होता. लेखी उत्तराच्या शेवटी असे नमूद केले आहे की, 1063 कोटींपैकी

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आतापर्यंत 3.86 कोटी रुपये खर्ची पडले आहेत. मग मी जो प्रश्न विचारला आहे तो खरा नाही का ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, तशी वस्तुस्थिती नाही असे शासनाने लेखी उत्तरात म्हटलेलेच नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : माझ्या पहिल्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी होय, हे पैसे शासनाकडे पडून आहेत असे उत्तर दिले पाहिजे होते. त्याची कारणे दिली असती तर मी समजू शकलो असतो. त्यामुळे लेखी दिलेले उत्तर चुकीचे आहे असे माझे म्हणणे आहे. 1063 कोटींपैकी फक्त 3.86 कोटी रुपये खर्च झाले आहेत याचा अर्थ बाकीचे पैसे पडून राहिले आहेत. निवृत्तीधारकांना त्यांचे उर्वरित आयुष्य नीट रहावे, त्यांचा उदरनिर्वाह चालावा या उद्देशाने निवृत्तीवेतन दिले जाते. या उद्देशालाच काळिमा फासण्याचे काम करण्यात येत आहे. निवृत्तीवेतन देण्यामध्ये विलंब झाला आहे त्याबाबत सत्वर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणत आहेत तसा हा विषय नाही. जे कर्मचारी निवृत्त झाले आहेत त्यांची नियमित पेन्शन सुरु झालेली आहे. ती थांबलेली नाही. त्यांना ॲडहॉक रक्कम म्हणून 25 हजार रुपये सुध्दा देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे त्यांना आताच्या पेन्शनपेक्षा 5 टक्के वाढीव रक्कम देण्यात आली आहे. या निवृत्तीवेतनामध्ये पे कमिशनच्या निर्णयाप्रमाणे जो फरक आलेला आहे त्या फरकाची रक्कम देण्यासाठी 1200 कोटी नव्हे तर सन 2011-12 या वर्षासाठी 1063 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. ती रक्कम वितरित झाली नाही. पण त्यांची पेन्शन कोठेही थांबलेली नाही.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यात असलेल्या 21 गावांसाठीची प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना बंद असल्याची निदर्शनास आलेली बाब " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे व रामनाथ मोते यांनी "तत्कालीन नालासोपारा नगरपरिषदेच्या हद्दीतील सोपारा खाडीवरील जुन्या पुलाच्या दुरुस्तीकडे सिडको व एमएमआरडीएने केलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे व भगवान साळुंखे यांनी "मुंबई विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या एकूण पदांपैकी सुमारे 51 टक्के पदे रिक्त असल्याचे दिनांक 19/10/2011 रोजी निदर्शनास आल्याची बाब" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी येथील झोळंबेपाठोपाठ परिसरातील लगतच्या 20 गावातील सर्वच डोंगर मायनिंगमुळे नष्ट होणार असून भूगर्भाची नैसर्गिक रचना बदलून जाण्याची निर्माण झालेली भीती" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, भगवान साळुंखे, संजय केळकर व डॉ. नीलम गो-हे यांनी "शासनाने कांद्याला 897 रुपये प्रति क्विंटल एवढी किमान आधारभूत किंमत जाहीर करुनही कांदा उत्पादक शेतक-यांना हमीभाव न मिळाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी "रत्नागिरी गणपतीपुळे स्थळाचा आरेवारे समुद्रीमार्ग विकसित करण्याकरिता पुरेसा निधी देऊन विकासाची कामे तातडीने करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "रायगड जिल्ह्यातील मौजे बिरवाडी, ता. महाड येथे दिनांक 25 फेब्रुवारी 2012च्या पहाटे सशस्त्र दरोडा पडून दरोडेखोरांच्या हल्ल्यात एका मुलीची निघृण हत्या होण्याची घटना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते व विनोद तावडे यांनी "चिपळूण (जि. रत्नागिरी) तालुक्यातील गोंधळे मजरे कोंढर सह आसपासच्या दहा गावातील जनतेसाठी तांबी नदीवर पुलाची उभारणी व्हावी म्हणून जनतेची गत 10 वर्षापासूनची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर व रामनाथ मोते यांनी "राज्यात अधिकारी, ठेकेदार यांनी संगनमताने खोट्या शिधापत्रिका तयार करुन अब्जावधी रुपयांचा भ्रष्टाचार करुन निवडणुकीत पुरावा म्हणून वापरल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील 18 बँका बुडण्याच्या मार्गावर असून त्यातील 4 बँका इचलकरंजी येथील असल्याची बाब उघडकीस आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उप सभापती...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील हुंबरठ स्वजलधारा ही नळपाणी योजना सन 2000 साली सुरु होऊनही अर्ध्या गावाची योजना पहिल्यापासूनच बंद असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभा फडणवीस व श्री. जगदीश गुप्ता यांनी "गोंदिया जिल्ह्यातील एका मुलीचे लग्न करण्याच्या नावावर विक्री केल्याचे प्रकरण उघडकीस येणे, या प्रकरणी जिल्हास्तरावर चौकशी समिती गठीत करुन मुलींची विक्री करणा-या सूत्रधारास अटक करुन कारवाई करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य 93च्या सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारली आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी./मु. शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला येथील प्रादेशिक फळ संशोधन केंद्राने आंब्याचे रायपिंग चेम्बर बांधण्यासाठीची निविदा "रत्नागिरी टाईम्स" या दैनिकातून इंग्रजीमध्ये प्रसिध्द केल्याबाबत श्री. परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"महाराष्ट्राची राजभाषा मराठी असताना राज्य शासनाच्या नगररचनाकार विभागाने सिंधुदुर्गातील भूमिपूत्र शेतक-यांसाठी चक्क इंग्रजी भाषेमध्ये, स्थानिक दैनिकांमध्ये दिनांक 13.2.2012 रोजीच्या सुमारास प्रसिध्द केलेली नोटीस, त्याच बरोबर वेंगुर्ला येथील प्रादेशिक फळ संशोधन केंद्राने आंब्याचे रायपिंग चेम्बर बांधण्यासाठीचे टेंडरही इंग्रजी भाषेत प्रसिध्द करणे, सदरहू निविदा फक्त परप्रांतीय ठेकेदारांना मिळण्याच्या उद्देशाने दिली असल्याचा तेथील ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेला संशय. दिनांक 19.3.2012 रोजीच्या रत्नागिरी टाईम्समध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, रत्नागिरी यांनी दिलेली निविदेची सूचनाही इंग्रजीमध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. याबाबत शासनाने चौकशी करुन यास जबाबदार असणा-या अधिका-यांवर कारवाई करण्याची आवश्यकता. याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय,शासकीय कामकाजामध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासंबंधी या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली असून आणि शासनाने राजभाषेचा वापर करण्याच्या सूचना दिलेल्या असून या सूचनांचे पालन न करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे.

पृ. शी./मु. शी. : सायबर क्राईमचे दिवसेंदिवस वाढत असलेले प्रमाण याबाबत श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापराबरोबर सायबर क्राईमचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून भारतात दर पाच प्रौढ व्यक्तींपैकी 4 व्यक्ती सायबर क्राईमच्या शिकार ठरत असून कायद्याच्या अज्ञानामुळे गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण अतिशय कमी असल्याने गुन्ह्यांची आकडेवारी फारशी मोठी नसली तरी सायबर क्राईम नोंदविण्याची योग्य पध्दत नागरिकापर्यंत पोहोचली नसल्यानेच घडणारे आणि नोंदविण्यात येणा-या गुन्ह्याच्या प्रमाणात फरक पडत आहे. महाराष्ट्रात आयपीसी अंतर्गत सर्वाधिक सायबर गुन्हे नोंदविले गेले असून जोपर्यंत आय.टी.ॲक्ट अंतर्गत गुन्हे नोंदविले जाणार नाहीत तोपर्यंत आरोप सिद्ध होऊन गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण कमीच राहणार असल्याने याबाबत कडक उपाययोजना करणे गरजेचे असल्याने मी या विशेष उल्लेखाद्वारे शिफारस करीत आहे."

सभापती महोदय, राज्यामध्ये जे सायबर क्राईम घडत आहेत ते सायबर क्राईम नोंदण्याची योग्य पध्दत नागरिकापर्यंत पोहोचलेली नाही. त्यामुळे ख-या गुन्हेगाराला शिक्षा होत नाही. मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष या गोष्टीकडे वेधू इच्छितो की, सायबर क्राईम झाल्यानंतर 6-6 महिने त्याचा तपास लागत नाही. एखादा क्राईम झाल्यानंतर गुन्हेगार मिळत नसेल तर आपण एक वेळ समजू शकतो. परंतु सायबर क्राईममध्ये गुन्हेगाराचे अकौण्टस आणि इतर सर्व डिटेल्स असतात, सर्व पुरावे असतात. असे असताना गुन्हेगाराला पकडण्यासाठी सहा-सहा महिने लागतात. मागे बान्द्रयाच्या सायबर सेलमध्ये मी स्वत: जाऊन आलो. एका सायबर सेलवरुन कोणाच्याही कॅरेक्टरबद्दल वाईट लिहिणे किंवा एखादे ठिकाण बॉम्ब ब्लास्टने उडवून टाका असा मॅसेज देणे, गोळया घालून मारा अशा पध्दतीचे मॅसेज देणे आणि ते दिल्यानंतर त्याबाबतीत कुठलीही कारवाई होत नाही. ही कारवाई न होण्याचे कारण म्हणजे सायबर सेलमधून क्राईम रिपोर्ट झाल्यानंतर एफआयआर नोंदण्याची जी पध्दत आहे ती चुकीची आहे.

..6..

श्री. किरण पावसकर...

याबाबतीत योग्य असे मार्गदर्शन झालेले नाही. म्हणून या बाबतीत कडक उपाययोजना करण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : कोल्हापूर जिल्हयातील करडवाडी पंचक्रोशीमध्ये गेली 15 वर्षे गवु रेडयांच्या कळपांच्या त्रासाने शेतकरी त्रस्त असून दोन शेतकऱ्यांचा झालेला मृत्यू याबाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, कोल्हापूर जिल्हयातील करडवाडी पंचक्रोशीामध्ये वेदगंगा नदीच्या बाराही महिने वाहणाऱ्या मोसमात शेतकरी पिके घेत आहेत. बाराही महिने कष्ट करुन पोट भरणारे शेतकरी गेली 15 वर्षे गव्यांच्या कळपाच्या त्रासाने अगदी त्रस्त झाले आहेत. गेल्या 3 वर्षामध्ये गवुरेडयांच्या हल्ल्यांमुळे करडवाडी गावच्या दोन शेतकऱ्यांना आपले प्राण गमवावे लागले. येथे रोज कोणा ना कोणा बरोबर गवु रेडयांच्या कळपाशी मुठभेट होत आहे. गेल्या वर्षी म्हणजे 2011 मध्ये रेडयाच्या हल्ल्यामध्ये शेतकऱ्यांचा झालेल्या मृत्यूनंतर गावामध्ये सरकारी धोरणाबद्दल लोकांच्या मनात चीड निर्माण होऊन आंदोलन उभे राहिले होते. त्यावेळी तालुका तहसीलदार माननीय निता शिंदे यांच्या साक्षीने जिल्हा वन विभागाचे सब डी.ओ. यांना निवेदनातून केलेल्या मागणीची शासनाने कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही. दुर्दैवाने जर पुन्हा अशी घटना त्या पंचक्रोशीत घडल्यास त्यास शासनच जबाबदार राहील. त्यामुळे याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन कारवाई करण्याची आवश्यकता."

सभापती महोदय, याबाबतीत शासनाने सत्वर कार्यवाही करावी अशी माझी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास विनंती आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. :उस्मानाबाद जिल्हयातील 17 आदिवासी लाभार्थ्यांना भाकड जनावरांचे वाटप करणे याबाबत ॲड.उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत आदिवासी कुटुंब स्वावलंबी व्हावेत यासाठी बीड आणि उस्मानाबाद जिल्हयातील एकूण 17 लाभार्थ्यांची शंभर टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे वाटप करण्याचा निर्णय घेऊन लाभार्थ्यांना भाकड जनावरांचे वाटप होणे, परिणामी लाभार्थ्यांची झालेली निराशा व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

सभापती महोदय, या 17 आदिवासी लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांचे वाटप करण्याबाबत शासनाने सत्वर कार्यवाही करावी, अशी माझी या निमित्ताने शासनास विनंती आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी : राज्यातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी विशेष प्रदूषण नियंत्रण अधिका-यांची नेमणूक करणे याबाबत श्री.हेमंत टकले वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, राज्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळ हे विभागीय कार्यालयांमार्फत पर्यावरणावर देखरेख ठेवत असतात. परंतु राज्यातील जी पवित्र तीर्थस्थळे आहेत, त्या ठिकाणी होणाऱ्या भाविकांची गर्दी आणि ज्याला आपण मायग्रेडींग पाप्युलेशन म्हणतो अशा पध्दतीने असणारी मोठी लोकसंख्या या गोष्टीचा विचार केला तर ही सगळी तीर्थस्थळे चांगली राखावीत म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रत्येक तीर्थस्थळांच्या ठिकाणी एक विशेष अधिकारी नेमावा. त्या तीर्थक्षेत्रासाठी अद्ययावत प्रयोगशाळा व तांत्रिक मनुष्यबळ निर्माण करुन द्यावे, म्हणजे तेथील पर्यावरणाचा त्रास होणार नाही या दृष्टीने शासनाने सत्वर कार्यवाही करावी अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास विनंती करीत आहे.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : अलिबाग तालुक्यातील आक्षी येथील सोमेश्वर मंदिराचे जीर्णेव्दार करण्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, अलिबाग, जि.रायगड पासून सुमारे 5 किलोमीटर अंतरावर असलेल्या आक्षी गावी " नृपती केशी देवराय आणि देवगिरी यादव नृपती रामचंद्र देव" असा शिलालेख सापडल्याने आक्षी गावाला पुरातन नगर असे महत्व प्राप्त होणे, याच गावात सोमेश्वर महादेवाचे पुरातन मंदिरही आहे, मात्र या मंदीराच्या सर्वच वास्तू आता जीर्ण होण्याच्या प्रतिक्षेत असणे, सोमेश्वर मंदिरा समोर एक दीपमाळ असून ती चारशे वर्षापूर्वीची असणे, सबब या चारशे वर्षापूर्वीच्या पुरातन वास्तूचे जतन करण्यासाठी शासनाने तीर्थक्षेत्र विकास निधीतून काही रक्कम मंजूर करुन या मंदिराचा व वास्तुचा जीर्णोध्दार करण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : आदिवासी आणि अतिदुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळांच्या इमारती जीर्ण अवस्थेत असणे याबाबत श्री.केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील आदिवासी आणि अतिदुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळांच्या अनेक इमारती जीर्ण अवस्थेत असून कोसळण्याच्या अवस्थेत असणे, त्यामुळे सदर शाळांतील विद्यार्थी दुसऱ्या विभागाच्या इमारतींमधून विद्यार्जन करीत असणे, गोंदिया जिल्हयातील गोरेगाव पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्राम बोळूंदा या आदिवासी गावातील जिल्हा परिषद शाळेची इमारत कोसळण्याच्या अवस्थेत असणे, त्यामुळे तेथील विद्यार्थी आरोग्य विभागाच्या इमारतीत बसून विद्यार्जन करीत असल्याचे निदर्शनास येणे, सदर शाळेत 1 ते 7 पर्यंत वर्ग असून एकूण 157 विद्यार्थीसंख्या असणे, परंतु जिल्हा परिषदेने सदर शाळेला फक्त दोन वर्गखोल्या बांधण्याची मंजुरी प्रदान करणे, मात्र शाळा व्यवस्थापन समितीला 75 टक्के रक्कम देऊन सुध्दा इमारतीचे काम अद्याप सुरु झाले नसणे, काही शाळांमध्ये एका खोलीत मुख्याध्यापकांचे कार्यालय असून दुसऱ्या खोलीत सर्व विद्यार्थी एकत्र विद्यार्जन करीत असणे, काही शाळामध्ये आवारभिंत, प्रवेशव्दार आणि स्वयंपाकखोली आदींची सोय नसणे, त्यामुळे शासनाचे "सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत कोणताही मुलगा शाळाबाहय राहू नये आणि त्यांना योग्य दर्जाचे शिक्षण मिळावे" हे धोरण अपयशी ठरणे, त्यामुळे उपरोक्त 157 विद्यार्थी व अशाप्रकारे राज्यातील हजारो विद्यार्थ्यांसमोर शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे राज्यातील जिल्हा परिषद शाळांच्या जीर्ण झालेल्या इमारतीची पाहणी करुन, विद्यार्थी संख्या विचारात घेऊन त्या इमारत बांधकामाची मंजुरी प्रदान करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना, कार्यवाही व यावर शासनाने करावयाचे निवेदन. धन्यवाद.

---------- यानंतर श्री. भोगले...

अनुवादित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : नद्यांच्या प्रदुषणावर प्रभावी उपाययोजना करणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये राज्यातील नद्यांची संवर्धन योजना सुरु केली आहे. नद्यांच्या प्रदुषणाबद्दल उपाययोजना करावी याबद्दल खास करुन उल्लेख केला आहे तो म्हणजे शहरे आणि मोठ्या गावांमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्यांची विल्हेवाट लावणे. परंतु देशातील 35 प्रदुषित नद्यांमध्ये महाराष्ट्रातील सर्वाधिक 7 नद्यांचा समावेश आहे आणि नद्यांचे प्रदुषण होण्यासाठी जी कारणे आहेत त्यामध्ये शहरांमधील किंवा गावातील सांडपाण्यांबरोबर रासायनिक मैला हे एक महत्वाचे कारण आहे. म्हणून नदी संवर्धन योजना पुरेशी नाही. त्यामध्ये रासायनिक मैला ज्या ज्या ठिकाणी साचला जातो तो रोखण्याच्या दृष्टीने जोपर्यंत प्रभावी उपाययोजना आपण करीत नाही तोपर्यंत प्रदूषण कमी होणार नाही. त्यासोबत रेती उपसा व संपूर्णपणे नद्यांच्या प्रदुषणाबाबत विविध उपाययोजनांचा विचार केला तर 7 महत्वाचे उपाय आहेत. या सर्व गोष्टींवर जोपर्यंत अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत नद्यांच्या प्रदुषणावर प्रभावी उपाययोजना होणार नाही. कॅबिनेटमध्ये विशेष बैठक घेऊन आम्ही आराखडा तयार करु असे आश्वासन विधिमंडळामध्ये देऊन देखील कारवाई झालेली नाही या मुद्याकडे मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : म्हाडा कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना लागू करणे याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□य सदस्य श्री.दिवाकर रावते यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, या सदनामध्ये जो विषय वारंवार मांडूनही सरकारला जाग येत नाही आणि वयोवृध्दांचा सन्मान होत नाही तो प्रश्न पुन्हा एकदा आपल्या माध्यमातून सरकारपुढे मांडू इच्छितो. म्हाडा कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबत विधिमंडळामध्ये चर्चा झाली. 1999 मध्ये तत्कालीन गृहनिर्माण मंत्री महोदयांनी म्हाडा कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्यास शासनाने तत्वत: मंजुरी दिली असल्याचे घोषित केले होते. शिवशाही सरकारच्या तत्कालीन गृहनिर्माण मंत्र्यांनी ही घोषणा केली आणि त्यांना पेन्शन योजना लागू करण्याचे मान्य केले होते. दोन महिन्यात मंत्रीमंडळापुढे हा प्रस्ताव आणू आणि मान्यता देऊ असे सांगण्यात आले होते. माननीय सचिव, गृहनिर्माण व उपाध्यक्ष, प्राधिकरण यांनी या संदर्भात 2008 मध्ये आश्वासन समितीपुढे आपली साक्ष नोंदविली. त्या साक्षीमध्ये म्हाडा ठराव क्रमांक 62/90, दिनांक 13.5.2008 नुसार प्राधिकरणाच्या सेवेमध्ये दिनांक 31.10.2005 पर्यंत नियुक्त केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करुन नागरी सेवा अधिनियम, 1982 नुसार निवृत्तीवेतन योजनेचा लाभ देण्यासाठी पेन्शन योजना लागू करण्यास मान्यता देण्यात आली. या पेन्शन योजनेकरिता येणाऱ्या सर्व खर्चाची हमी म्हाडाची राहणार असून पेन्शन योजना वर्धनक्षम करण्याकरिता आर्थिक वर्षामध्ये 56.92 कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यास प्राधिकरणाने मंजुरी दिली आहे. पेन्शन योजनेमधील कोणताही भार शासनावर पडणार नाही. ही योजना म्हाडा स्वबळावर राबविणार आहे अशा प्रकारे म्हाडाकडून सरकारला कळविण्यात आले आहे. दुर्दैवाने हा प्रश्न वारंवार उचलल्यानंतर म्हाडा कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याच्या संदर्भात

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

विधानसभेमध्ये दिलेल्या आश्वासनानंतर, आश्वासन समितीपुढील आश्वासन, म्हाडा प्राधिकरणाचा ठराव हे सर्व करुन देखील आजपर्यंत पेन्शन संदर्भात निर्णय घेतलेला नाही. अत्यंत सहानुभूतीने हा निर्णय शासनाने घ्यावा यासाठी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सरकारला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री श्री.सचिन अहिर यांचे</u>

<u>वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन</u>

उप सभापती : आपल्या सदनामध्ये उपस्थित असलेले राज्याचे तरुण, तडफदार आणि कार्यक्षम गृहनिर्माण राज्यमंत्री नामदार श्री.सचिन अहिर यांचा आज वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सभागृहाच्या वतीने मी त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा देतो आणि त्यांच्या भावी राजकीय कारकिर्दीला देखील मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

--

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>माननीय उप मुख्यमंत्री यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या पुढे ढकलण्यासंबंधी</u>

उप सभापती : आजच्या कामकाजाच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये माननीय उप मुख्यमंत्री यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या चर्चेसाठी दर्शविण्यात आलेल्या आहेत. तथापि, आज माननीय उप मुख्यमंत्री महोदयांच्या विभागाच्या पुरवणी मागण्यांवर विधानसभेमध्ये चर्चा असल्यामुळे आणि त्यांच्या विभागाचे राज्यमंत्री महोदय काही कारणामुळे अनुपस्थित असल्यामुळे माननीय उप मुख्यमंत्री यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या दिनांक 22 मार्च, 2012 रोजी चर्चेला घेण्यात येतील.

नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2011-2012 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना हे माहीतच असेल की, पूरक मागण्यांवरील चर्चेसाठी दि. 21 मार्च, व दि. 22 मार्च, 2012 हे दोन दिवस दिलेले आहेत. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरण पत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रिनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्रिमहोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतो आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व गुरुवार दिनांक 22 मार्च, 2012 करिता असलेल्या सर्व मागण्यांवरील चर्चा गुरुवार, दि. 22 मार्च, 2012 रोजी पूर्ण करावी लागेल. माननीय विरोधी पक्षनेते चर्चेला सुरुवात करतील.

आता मी दुपारी 1.15 वाजेपर्यंत सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.25 ते 1.15 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**स्थगितीनंतर**)

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. विनायक मेटे)

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : आता पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करण्यात येत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करावी.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहात पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु असतांना सभागृहात केवळ एकच मंत्री उपस्थित आहेत. पुरवणी मागण्यांवर सभागृहात किमान चार मंत्र्यांनी तरी हजर राहणे आवश्यक आहे.

तालिका सभापती : आपण आता पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करु तो पर्यंत मंत्री महोदय सभागृहात उपस्थित होतील. आपण काळजी करु नका.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भात काही नियम आहेत. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्री उत्तर देत असतात त्यामुळे त्यासंदर्भात आम्ही समजू शकतो. परंतु पुरवणी मागण्या प्रत्येक खात्याला सदनाकडून मंजूर करुन घ्याव्या लागत असतात. खालच्या सभागृहातही पुरवणी मागण्यांवर मंत्र्यांना उपस्थित रहावे लागते याची आम्हाला कल्पना आहे. आज सभागृहापुढे पुरवणी मागण्यावर चर्चा असून त्यामध्ये ब-याच विभागाचा समावेश आहे त्यामुळे ज्या ज्या विभागाचा समावेश आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये आहे त्या विभागाच्या राज्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य ज्या खात्यावर आपले विचार मांडतील त्याची नोंद दुसरे मंत्री कसे काय घेऊ शकतील ? सभागृहात पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु असतांना एक-दोन मंत्र्यानी उपस्थित राहणे बरोबर नाही.

तालिका सभापती : सभागृहात दोन तीन मंत्री उपस्थित आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आजच्या पुरवणी मागण्यावरील चर्चेशी संबंधित असलेले गृह, सामाजिक न्याय, कृषी व पणन मंत्री, ग्रामविकास मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे एकही मंत्री उपस्थित नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब जे म्हणत आहेत ते बरोबर आहे परंतु चर्चेला सुरुवात केल्यानंतर मंत्रीमहोदयांना सभागृहात उपस्थित राहण्यास कळवण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपल्यालाही कल्पना आहे की, आज जिल्हा परिषदांच्या निवडणुका असल्यामुळे बरेच मंत्री आपापल्या भागात गेलेले आहेत. त्यामुळे जे जे मंत्री येथे उपस्थित नाहीत त्या त्या विभागावरील पुरवणी मागण्यांची चर्चा राखून ठेवण्यात यावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सचिवांच्या माध्यमातून मला नियमातील तरतुदीची माहिती हवी आहे. पुरवणी मागण्यांच्या संदर्भात त्या त्या खात्याच्या मंत्र्यांनाच त्यांच्या खात्याची मागणी मांडावी लागत असते. कोणत्याही विभागाच्या मंत्र्यांना त्या मांडता येत नाहीत अशी नियमात तरतूद आहे. त्यामुळे संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर आपण कसे काय कामकाज करु शकणार आहात. आपण सभागृहाचे कामकाज नियमाने चालविणार आहोत की, नाही ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, माझी सभागृहाला विनंती आहे की, आता आपण पुरवणी मागण्यांच्या चर्चेला सुरुवात करावी व मध्यंतरीच्या काळात त्या त्या विभागाचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित होतील. आता गृहमंत्री तसेच वैद्यकीय शिक्षण मंत्री सुध्दा उपस्थित झालेले आहेत त्यामुळे आता चर्चेला सुरुवात करण्यास काहीच हरकत नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :

(1) गृह मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक बी-1, बी-4

(2) सामाजिक न्याय, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एन-1, एन-3

(3) कृषी व पणन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक डी-3

(4) ग्रामविकास मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एल-1,एल-2,एल-3,एल-7

(5) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक वाय-2,वाय-4, वाय-5,वाय-6

(6) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एम-2, एम-3

(7) वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एस-1

(8) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक टी-1,टी-2,टी-4,टी-5

(9) रोजगार हमी योजना मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक ओ-31, ओ-32, ओ-33, ओ-34, ओ-35, ओ-36, ओ-37, ओ-38, ओ-39, ओ-40, ओ-41, ओ-42, ओ-43, ओ-44, ओ-45, ओ-46, ओ-47, ओ-48,

आजच्या कामकाज पत्रिकेच्या क्रमामध्ये माननीय उप मुख्यमंत्री महोदयांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या चर्चेसाठी दर्शविण्यात आल्या आहेत. तथापि, आज माननीय उप मुख्यमंत्री महोदयांच्या विभागाच्या पुरवणी मागण्यांवर विधान सभेत चर्चा असल्याने व त्यांच्या विभागाचे माननीय राज्यमंत्री काही कारणास्तव अनुपस्थित असल्याने माननीय उप मुख्यमंत्री महोदयांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या दिनांक 22 मार्च 2012 घेण्यात येतील.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) .....

पुरवणी मागण्यांवरील चर्चा आज व गुरूवार, दिनांक 22 मार्च 2012 रोजी घेण्यात येणार आहे. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. पुरवणी मागण्या आणि त्या खालील बाबी यासंबंधी माहिती सन्माननीय सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहे. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाची आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व गुरूवार दिनांक 22 मार्च 2012 रोजी असलेल्या बाकीच्या सर्व मागण्या यावरील चर्चा गुरूवार दिनांक 22 मार्च 2012 रोजी पूर्ण करावी लागेल. आता माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे हे चर्चेला सुरूवात करतील.

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी केवळ एकाच मागणीवर बोलणार आहे. मी गृह विभागाच्या प्रशासनकीय बाबीवर बोलणार आहे.

पोलीस विभागातील 45 हजार कर्मचाऱ्यांच्या पॉलिसी एलआयसी मार्फत उतरविण्यात आलेल्या आहेत. 45 हजार कर्मचाऱ्यांच्या पॉलिसिज काढून आपण एकूण 1500 कोटी रूपयांचा विमा उरविलेला आहे. त्याचा महिन्याला अडीच कोटी रूपये प्रीमियम भरावा लागतो. या द्वारे आपण 45 हजार पोलिसांना विम्याचे संरक्षण देत आहोत. पण जानेवारी 2012 पासून त्यांचा दर महिन्याचा हप्ता जाणे बंद झाले आहे. त्यामुळे एलआयसीने कळविले आहे की, हप्ता आला नाही तर पॉलिसी स्टॅण्डस् टु बी कॅन्सल्ड. मी जेव्हा पुरवणी मागण्या बघत होतो तेव्हा त्यामध्ये मला यासाठी कुठल्याही प्रकारची तरतूद केल्याचे आढळून आले नाही. गृह विभागाने जानेवारी, फेब्रुवारी आणि आता मार्च महिन्याचा एलआयसीचा हप्ता न भरल्याने 45 हजार पोलिसांचे विमा सुरक्षा कवच संपण्याच्या स्थितीत आहे. तेव्हा या बाबत शासन काही उपाययोजना करणार आहे काय ? शासन पोलिसांना भगवान भरोसे सोडणार आहे काय ? एवढेच मला या निमित्ताने आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे होते. यासंबंधी माननीय मंत्री महोदय, योग्य ते उत्तर देतील अशी मला अपेक्षा आहे. .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 47, पान क्रमांक 47 वर बोलण्यासाठी उभा आहे.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आज सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : ठीक आहे. सभापती महोदय, मी जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 49 पान क्रमांक 57 ह्या विभागाच्या पुरवणी मागण्यांवर आज चर्चा आहे काय ?

तालिका सभापती : नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे उद्याच्या पुरवणी मागण्यांचे कागद आलेले दिसतात.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, उद्याच्या विभागाच्या पुरवणी मागण्यांवर भाषण सन्माननीय सदस्यांनी आज केले तरी ते उद्याच्या प्रोसिडिंगमध्ये आपण जोडू शकतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण मला नंतर भाषणाची संधी द्यावी.

तालिका सभापती : ठीक आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण मला माझे विचार व्यक्त करण्यासाठी परवानगी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पान क्र.83, बाब क्र.77 या अंतर्गत शासनाने या विद्यार्थ्यांना परदेशामध्ये शिक्षण घेता यावे म्हणून परदेशी शिष्यवृत्तीसाठी योजना सुरु केलेली आहे. पिढ्यान्पिढ्या ज्या समाजाला उपेक्षित राहून शिक्षणाचा लाभ घेता आला नाही, सवलतीचे लाभ घेता आले नाहीत.तसेच आपण स्व.यशवंतराव चव्हाण यांचे शताब्दी वर्ष साजरे करीत आहोत. त्यावेळेला तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी ही योजना सुरु केली होती आणि त्याला आता पाहिजे तसा प्रतिसाद मिळत आहे. पण आपण गणसंख्येत आणि निधीमध्ये वाढ केलेली नाही, ती कृपया करण्यात यावी आणि सदरहू शिष्यवृत्ती मध्ये वाढ करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा कृषी विभागाच्या संबंधात आहे. पान क्र.27, बाब क्र.29 यामध्ये कृषी विषयक संशोधन शिक्षण याबाबत सांगावयाचे तर मौजे धामापूर येथे गेल्या 50-60 वर्षापासूनचे एक कृषी संशोधन केंद्र आहे आणि ते जवळजवळ 11 हेक्टरच्या परिसरामध्ये तलावाच्या किनारी हे सुंदर केंद्र बसलेले आहे. तेथे काही आंबा, काजू आणि रतांब्याची झाडे आहेत. हे केंद्र पुनरुज्जीवित व्हावे यादृष्टीने माननीय कृषी मंत्री महोदयांकडे बैठक झाली होती आणि माननीय कृषी मंत्र्यांनी याला मान्यताही दिली होती की, त्याठिकाणी शेती व शेती विषयक आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे, अवजारांचे संग्रहालय तयार करणे, तसेच वेगवेगळया कृषी विभागाची प्रात्यक्षिके म्हणजे काजूची कलमे, हापूस आंबा, चिकू, दालचिनीची कलमे, इतर रोपे लावण्यासाठी 400 लाख रुपयांच्या निधीला मान्यताही मिळालेली आहे.परंतु याबाबत आजतागायत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. अशा वेळी जिल्हा शेती विकासावर आधारित त्याची पुनरावृत्ती कृषी पर्यटनामध्ये करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

2डी - 2 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आज या चर्चेच्या निमित्ताने माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील हे स्वत: सभागृहामध्ये हजर असल्याबद्दल आणि त्यांनी माननीय गृह राज्य मंत्र्यांवर कारभार सोपविलेला नाही याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील हे उत्तर देण्यासाठी सभागृहामध्ये उपस्थित असतात.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री सभागृहामध्ये उत्तर देण्यासाठी उपस्थित असतात. परंतु पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देण्याची कामगिरी साधारणत: राज्यमंत्र्यांकडे सोपविली जाते.

सभापती महोदय, बाब क्र.7 मध्ये गुंगीकारक द्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थांच्या बेकायदेशीर वाहतुकीला आळा घालण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे.गेले महिनाभर महाराष्ट्र शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्येमुळे गाजत होता. नंतर त्यांच्या अनुदानासाठी गाजत होता, पीक नासाडीच्या मुद्यावर गाजत होता, अवर्षणाच्या संकटाने गाजत होता. आज सकाळी देखील माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाच्या संबंधात उत्तर देताना आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी हा विषय त्यांच्या भाषणामध्ये घेतला होता. परंतु महाराष्ट्रामध्ये सध्या शेतकरी अफूच्या शेतीसाठी गाजत आहे. पहिल्यांदा ही शेती नांदेड, बीड, परळी या भागामध्ये सापडली आणि परळी म्हणजे माननीय मुंडेसाहेब आणि नंतर ते आपल्या जिल्ह्यातच जाऊन पोहोचले.

श्री.आर.आर.पाटील (खाली बसून) : माझे गाव लांब आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तुमचा सांगली जिल्हा आहे आणि आपण महाराष्ट्र राज्याचे गृह मंत्री आहात. पण दिव्याखाली अंधार आहे हे मी सांगत आहे आणि माननीय गृहमंत्री असे सांगत आहेत की, माझे गाव लांब आहे. महाराष्ट्रामध्ये जे-जे घोटाळे होतात, त्याचा सांगली मध्ये उगम आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सांगली चांगली आहे. आपण जे सांगत आहात तेवढी वाईट नाही. सन्माननीय सदस्यांनी संपूर्ण सांगली जिल्ह्यावर, सांगली शहरावर अशा प्रकारे हेत्वारोप करु नये. तेथे चांगली माणसे देखील आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवारसाहेबांनी त्याच्या करताच आपल्याला गृह मंत्री केले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, एखाद्या जिल्ह्याची अशा प्रकारे बदनामी करणे बरोबर नाही. इतर कोणी राजकीय अभिनिवेषातून अशा प्रकारे बदनामी केली तर मी मान्य करीन पण सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या तोंडून ते नको आहे. ज्यावेळी आपण सांगलीमध्ये येता, तेव्हा वेळोवेळी लोक स्वागत करतात आणि आपण त्या सांगलीच्या बाबतीत असे म्हणत आहात. अशा प्रकारे एखाद्या जिल्ह्यावर हेत्वारोप करणे बरोबर नाही.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांना मी म्हणालो ते मनापासून लागलेले दिसले म्हणून मला आनंद झाला. मी आपल्या मार्फत मंत्री महोदयांना जाणीव करुन देतो की, सांगलीमध्ये बोगस नोटा सापडल्या. राज्यामध्ये बनावट दूध तयार होत असल्याचे प्रथम नगर नंतर सातारा, त्यानंतर सांगली येथे आढळून आले. त्या शिवाय बलात्कार, दरोडे या गुन्ह्याचा उगम त्या जिल्ह्यामध्ये आहे. आपण महाराष्ट्राचे गृह मंत्री असताना या सर्व प्रकारच्या अनैतिकता सांगली जिल्ह्यात होत असल्याच्या बातम्या आम्हाला वाचायला मिळतात. आम्हाला दिव्याखालचा अंधार बोचत आहे.

सभापती महोदय, अफूची शेती करण्याच्या संदर्भात कायद्यामध्ये काय तरतूद आहे हे सांगितले पाहिजे. त्यामुळे आता एक गोंधळ निर्माण झालेला आहे. आमच्याकडे आम्ही खसखस पिकवितो, आपल्याकडे तो पिकवितात की नाही ते मला माहीत नाही. ब्रिटीश काळामध्ये राजस्थान, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्यातील काही भागात ब्रिटीशांनी 100 वर्षाच्या लीजवर अफूची शेती करण्याची अधिकृत परवानगी दिली होती. आपणास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण अफूची शेती करण्यावर बंदी आणली आणि तसा कायदा केला. मग अफूची शेती करणारे सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की, ब्रिटीश काळात त्यांना 100वर्षाच्या लीजवर शेती करण्याची परवागनी दिलेली असल्यामुळे मुदत संपेपर्यंत शेती करण्याची परवानगी दिली. काही ठिकाणी अफूची शेती करण्यास परवानगी आहे तर काही ठिकाणी नाही असा गैरसमज होण्याची शक्यता आहे. कायद्याची बाजू मी सांगितली आहे. या प्रश्नावर विभागाचे सचिव चांगल्या प्रकारे प्रकाश टाकतील. माननीय गृह मंत्री महोदयांनी प्रकाश टाकल्यास आम्हाला आनंद होईल.

सभापती महोदय, या प्रकरणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार त्या ठिकाणी अफूची शेती होत आहे. अफूची शेती होत असली तरी त्यांना ते पीक कोणालाही विकता येत नाही. त्यावर केंद्र सरकारची यंत्रणा आणि नियंत्रण आहे. भूल देण्यासाठी त्याचा उपयोग होतो. ते पीक केंद्र शासनाच्या माध्यमातून विकत घेतले जाते. अफूची शेती कोणालाही करता येत नाही असे असताना आपल्या विभागाचे पोलीस शेती उपटत असल्याचे चित्र टी.व्ही.वरपहावयास मिळाले. मी अफूच्या शेतीसंबंधी बोलत आहे, गांजावर नाही. हा गंभीर विषय आहे. शेतकऱ्यांमध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

वेगळी परिस्थिती निर्माण करणारे काही नेते महाराष्ट्रात निर्माण झालेले आहेत. ते अफूची शेती करण्याच्या बाजूने उभे राहतील आणि उद्या आंदोलन करतील. तेव्हा यातील कायदेशीर बाजू प्रथम तपासून घेतल्या पाहिजेत. राज्यात नाही तर ती देशात अफूची शेती होता कामा नये. परंतु काही राज्यांमध्ये अफूची शेती करण्यास ब्रिटीशांनी 100 वर्षाच्या लीजवर परवानगी दिली होती आणि त्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. त्यांना दिलेली मुदत संपल्यावर ती शेती करणे बंद होईल. सरकार मान्यतेने एखाद्या भागात अफूची शेती करायची असेल तर त्यासाठी भविष्यात काय करावे या संदर्भातील मार्गदर्शन कृषी विभाग किंवा गृह विभागाकडून होईल का हा देखील प्रश्न आहे. आज कृषी विभागावर देखील चर्चा आहे. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, पोलीस शेती उपटण्याचे काम करीत होते. ती अफूची शेती होती हे कशावरुन असा प्रश्न देखील उपस्थित होतो. आम्ही हे वर्तमानपत्रात वाचले. आपल्याला त्यातील काही ज्ञान नाही.

सभापती महोदय,सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील हे गुणग्राहक आहेत. रासायनिक दूधाची येथे चर्चा झाल्यानंतर आबांनी हे रासायनिक दूध कसे बनवितात याचे प्रात्यक्षिक नागपूरला करुन दाखविले होते.

यानंतर कु.थोरात...

अशुधारित प्रत / अशुद्धीशाली नाही

श्री. दिवाकर रावते.....

आबांनी दूध कसे तयार करतात याचे प्रात्यक्षिक करुन दूध तयार केले आणि हे दुधा सारखेच लागते हे पिऊन बघा असे सांगितले. म्हणजे एखाद्या गोष्टीचे कौतुक किती करावे. उद्या आम्हाला ते अफू दाखवतील. सभापती महोदय, दुधाचा विषय अत्यंत गंभीर आहे.हे दूध का तयार होते हा वेगळा विषय आहे मी त्या विषयाच्या खोलात जाणार नाही. पण या विषयाच्या संदर्भात देखील चर्चा झाली पाहिजे. अफुच्या संदर्भात वर्तमानपत्रांनी आमचे प्रबोधन केले पण थोडया वेळापूर्वी या सभागृहात मंत्री महोदय श्री. भास्कर जाधव यांनी असे सांगितले की, वर्तमानपत्रात छापून येणारे सर्वच काही बरोबर नसते, त्याला काही अर्थ नसतो. त्यामुळे या वक्तव्याच्या संदर्भात स्वाभिमानी माणसाला काय वाटते ते उद्या समजेल. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून वर्तमानपत्राबद्दल आपल्याला स्वाभिमान आहेच. त्यांचे विधेयक का रखडले याचे उत्तर देखील मंत्री महोदय, श्री. भास्कर जाधव यांनी दिले. या सदनातील एक सन्माननीय सदस्य आहेत. कुठल्या तरी एका वर्तमानपत्राच्या संपादकाच्या घरावर हल्ला झाल्याचे एक प्रकरण होते तेव्हा स्वाभिमान जागृत झाला होता आणि वर्तमानत्रातून अग्रलेख छापून आले होते. तेव्हा याबाबतीत तसा स्वाभिमान जागृत झाला आहे काय हे आम्हाला उद्या समजेल.

सभापती महोदय, मी मूळ विषयाकडे वळतो. खसखस संपूर्ण सुकलेल्या बोंडाची होते. त्याच्यापूर्वी त्या बोंडाला चिरा पाडून चिक जमवतात त्याला अफू म्हणतात असे वर्तमानपत्राच्या माध्यमातून आम्हाला समजलेले आहे. मंत्री महोदयांनी मार्गदर्शन केलेले आहे त्याप्रमाणे मी या ठिकाणी सांगत आहे असे मी म्हटलेले नाही. आपला तो मार्गही नाही. दारु कशी तयार होते असे विचारले तर ते आपल्याला माहीत नाही. कारण तो आपला मार्ग नाही. प्रश्न असा आहे की, संबंधित शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल केलेले आहेत. कारण त्यांच्या मालकीची ती शेती आहे. परंतु हे शेतकरी अफुचे उत्पादन करुन कोणाला विकत होते. ते त्या अफुचे काय करत होते? त्यांच्या पुढे जो कोणी माफिया असेल त्यांच्या पर्यंत शासनाचे हात पोहचले आहत काय? कारण आबा कसे बोलतात हे मी पुढे सांगणार आहे. ते दणदणीत बोलतात. समोरच्या माणसाला घामच फुटला पाहिजे. नंतर त्या माणसाला कळते की, घाम पुसण्याची गरज नाही थंड पाण्याने स्नान केले तरी चालते कारण त्यानंतर कारवाई होतच नाही.सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मी या ठिकाणी अफुच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याचे उत्तर मिळाले तर बरे होईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते. . .

सभापती महोदय, बाब क्रमांक 6 पृष्ठ क्रमांक 8. पोलीस दलातील गुप्त सेवांच्या संदर्भात मी या ठिकाणी बोलू इच्छितो. पोलिसांची काय गुप्त सेवा आहे? तुमच्या आणि आमच्या मराठवाडयामध्ये काय-काय चालले आहे याची माहिती आपल्याला असते. मंत्री महोदय, आबा बीडमध्ये गेले होते. तेव्हा ते असे म्हणाले होते की, येथील जिल्हा बँकेचा घोटाळा हा विरोधी पक्षाच्या गळयात टाकण्यासारखा होता. बँकेचा घोटाळा सर्वांना माहीत आहे. सहकार राज्य मंत्र्यांनी तो उघडकीस आणला आहे. त्याबाबतीत त्यांनी मलाही फोन केला होता आणि हे बघा असे सांगितले होते. मी बीडमध्ये गेलो होते तेव्हा या बँकेची सर्व कागदपत्रे मी पाहिली होती. माझ्या जाहीर भाषणात लोकांनी सभेत उभे राहून श्री. रावते साहेब तुम्ही या प्रकरणाच्या बाबतीत सभागृहात बोलणार आहात काय असा प्रश्न विचारला होता. त्यानंतर आबा बीडमध्ये गेले. मला जसा प्रश्न विचारण्यात आला होता तसा त्यांनाही प्रश्न विचारला असेल. त्यामध्ये आबांचा दोष नाही. आबा गृह मंत्री आहेत, त्यांचेच शासन आहे. ज्यावेळी आम्हाला प्रश्न विचारण्यात येतो त्यावेळी एखादे प्रकरण सभागृहात उपस्थित करणार का असे विचारण्यात येते पण मंत्री महोदयांना प्रश्न विचारण्यात येतो तेव्हा निर्णय घेणार का असे विचारण्यात येते. प्रश्न विचारण्यामध्ये हा फरक आहे. आबांना या बँक घोटाळयाबाबत विचारण्यात आल्यानंतर त्यांनी दणादण सांगून टाकले." येथील जिल्हा बँकेच्या अध्यक्षांना ताडतोब बेडया ठोका" त्यांनी आदेश दिले की, "ते सापडत नसतील तर त्यांची मालमत्ता सील करा." हा अधिकार त्यांना कुठून मिळाला हे मला माहीत नाही.

यानंतर श्री. बरवड....

अनुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

अशा डरकाळ्या आर.आर.आबांनी बीडमध्ये फोडल्या अशा प्रकारचा वृत्तांत आपल्याच लोकमत दैनिकात आला. त्यांच्या बाबतीत डरकाळ्या वगैरे दुसरे कोण लिहिणार ? आबा, आपण बरोबर बोलला की, त्यांना बेड्या ठोकल्या. हाच प्रश्न परभणी जिल्हा बँकेत 1 लाख शेतकऱ्यांना फसविण्याचा गुन्हा करणाऱ्या श्री. बोर्डीकरांच्या संदर्भात उभा होता. त्यांची बाजू घ्यायला श्री. बोर्डीकर हे काही तुमच्या पक्षाचे नाहीत. मी तसा आक्षेपही घेऊ शकणार नाही. श्री. बोर्डीकर फरार आहेत. ते नागपूरला अधिवेशनात सगळीकडे फिरत होते. ते पोलिसांच्या रेकॉर्डवर फरार आहेत. ते परभणीत होते. ते अटकपूर्व जामिनाकरिता सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले. न्यायालयाने अटकपूर्व जामीन फेटाळल्यानंतर ते शरण आले. ही नेहमीची पध्दत आहे. या घोटाळ्यातील आरोपी म्हणून ते शरण आल्यानंतर त्यांना अटक झाली. हेही मला मान्य आहे. प्रत्येक राजकीय नेता अटक होईपर्यंत दणदणीत असतो आणि अटक झाल्यानंतर त्यांच्या छातीतच दुखते. ते रुग्णालयात गेले. संबंधित बँक घोटाळ्याचे आरोपी एक-दीड महिना त्या रुग्णालयामध्ये होते. त्यांना काहीच झालेले नव्हते.

श्री. सुरेशदादा देशमुख : झालेले होते.

श्री. दिवाकर रावते : आपण मला काय सांगत आहात ? आपण त्यांच्या बाबतीत कशाला बोलत आहात ? आज ते तुमच्याकडे आहेत, उद्या कोठे असतील हे माहीत नाही.

श्री. सुरेशदादा देशमुख : मी बँकेचा उपाध्यक्ष आहे.

श्री. दिवाकर रावते : आपण अध्यक्षांचा घोटाळा आपल्या अंगावर घेता का ? नसेल तर आपण खाली बसावे.

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांवर बोलावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुरेशदादा देशमुख या व्यक्तिमत्वाला मी गेली 25 वर्षे ओळखतो.

तालिका सभापती : ते पुरवणी मागण्यांमध्ये नाही.

श्री. दिवाकर रावते : मी पुरवणी मागण्यांवरच बोलत आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुरेशदादा देशमुख उभे राहून म्हणाले की, मी त्या बँकेचा उपाध्यक्ष आहे. मी त्यांना विचारले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते .....

की, अध्यक्षांचा घोटाळा आपल्या अंगावर घेता का ? त्यानंतर सन्माननीय सदस्य खाली बसले. सभापती महोदय, ही खेदाची बाब आहे. मी बाब क्रमांक 6 वर पोलीस दलाच्या गुप्त सेवांबाबत बोलत असताना गुप्त खात्याकडून पोलिसांना हे कळले नाही का ? ते हॉस्पिटलमध्ये बसले होते. त्यांना खास एक वातानुकुलित खोली दिली होती. सर्व राजकीय कार्यकर्ते त्या ठिकाणी भेटीगाठी घेत होते. निवडणुकीची यंत्रणा, निवडणुकीचे नियोजन हे सर्व चालू होते. बाकी मटणासह सर्व साग्रसंगीत अगदी घरी असल्यासारखे चालले होते. हे आरोपीचे लक्षण आहे का ? हे मी पाहिलेले आहे. त्यानंतर ज्या स्टार माझाने ती बातमी जोरजोरात दाखवली त्या स्टार माझाच्या संपादकाला विचारले. मग त्यांनी त्यांच्या स्टार माझा वाहिनीवर काय चालले आहे ते सर्व दाखविले. फक्त त्यांना ती पार्टी स्लिप आऊट करता आली नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. सुरेशदादा देशमुख यांना मी सांगू इच्छितो की, आपण यामध्ये पडू नका.

श्री. सुरेशदादा देशमुख : त्यांना 90 टक्के ब्लॉकेज होते.

श्री. दिवाकर रावते : अजूनही ऑपरेशन झालेले नाही. ते अजून ठणठणीत आहेत. मी त्यांना सुध्दा तेवढीच वर्षे ओळखतो. कापसाच्या गंजीला आग कशी लावावयाची याचे प्रशिक्षण घेण्यासाठी मी जिंतूरमध्येच जात होतो. म्हणजे कापूस जमा झाला की कसा जाळतात हे बघायला जात होतो. चकमक कशी टाकतात याचे महाराष्ट्रातील पहिले उदाहरण जिंतूर आहे. मी हळूहळू सगळे सांगतो. आपण त्या वाटेला जाऊ नका. असंगाशी संग यामुळे काय होते हे आपल्याला माहीत आहे. परभणीमध्ये आपले नाव चांगले आहे. यामध्ये परभणी बदनाम होते. आपला जिल्हा असला तरी परभणीतील 1 लाख शेतकऱ्यांची फसवणूक केल्यानंतर मी गप्प बसावयाचे का ? आपल्याच जिल्ह्यातील 1 लाख शेतकऱ्यांची फसवणूक झालेली आहे. कागदोपत्री कोट्यवधी रुपयांची फसवणूक झालेली आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी सभापतींकडे बघून बोलावे.

श्री. दिवाकर रावते : असंगाशी संग काय असतो ते मी त्यांना पटवून देत आहे.

तालिका सभापती : त्यांना सगळेच माहीत आहे.

श्री. दिवाकर रावते : त्यांना सगळेच माहीत आहे हे मला माहीतच नव्हते.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांवर बोलावे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.सुरेश देशमुख हे आ बैल मुझे मार असा प्रकार करीत असल्यामुळे मी त्यांना उद्देशून बोललो आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 9, मोटर परिवहन वाहनांची दुरुस्ती व परिरक्षण करणे यासंबंधी मागणी करण्यात आली आहे. अंधेरी येथील आरटीओ कार्यालयातील ढिसाळ कारभाराची व त्या ठिकाणाहून हजारो परमीटस् बेकायदेशीरपणे दिली जात असल्याची मोठी बातमी आली आहे. परिवहन खाते माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. सकाळी राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी असे म्हटले आहे की, मी कोणत्याही बाबतीत कसलीही व कोणाचीही पर्वा करणार नाही. मी कोणालाही पाठीशी घालणार नाही. हे ऐकून आम्हाला बरे वाटले आहे. तेव्हा या संदर्भात तातडीने चौकशी करावी व योग्य ती दखल घ्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, गृह विभाग, बाब क्रमांक 15 चौकशी समितीच्या खर्चासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे. जालना जिल्ह्यात वारकऱ्यांच्या अंगावर ट्रक चढल्यामुळे काही वारकरी चिरडले गेल्याची घटना मंत्री महोदयांना माहीत असेल. ही घटना शासनानेही अत्यंत गांभीर्याने घेतली आहे. त्यावेळी सर्वांनी आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. शासनाने या घटनेची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेमली आहे. ज्यांची चौकशी करावयाची आहे ते जिल्हाधिकारी व इतर अधिकारी त्या चौकशी समितीमध्ये आहेत. जिल्हाधिकारी त्या चौकशी समितीचे सचिव आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी समिती नेमल्यानंतर त्या जिल्ह्यात धाक व दहशत निर्माण केलेली आहे. त्यामुळे एकही साक्षीदार साक्ष देण्यासाठी पुढे येण्यास तयार नाही. इतका धाक त्या जिल्हाधिकाऱ्यांनी निर्माण केलेला आहे. कारण तेच या प्रकरणात अडकलेले आहेत. त्यामुळे त्या जिल्हाधिकाऱ्यांची आजच्या आज बदली करण्यात यावी अशी मी मागणी करीत आहे. अन्यथा, ही चौकशी समिती म्हणजे फार्स ठरणार आहे. तसेच चेंगरल्या गेलेल्या वारकऱ्यासंबंधी सदनामध्ये दोन्ही बाजूने ज्या भावना व्यक्त करण्यात आल्या आहेत त्यांचा अवमान होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एका शेतकऱ्याने 15 ऑगस्ट रोजी झेंडा वंदनाच्या वेळी स्वत:ला जाळून घेतले होते. इतकी भीषण परिस्थिती तेथे निर्माण झालेली आहे. ज्यांची चौकशी करावयाची आहे तेच जर त्या चौकशी समितीचे प्रमुख असतील तर चौकशी नीट होणे शक्य नाही. मी त्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

जिल्हाधिकाऱ्यांना ओळखत सुध्दा नाही, माझा त्यांच्यावर रोष सुध्दा नाही. पण त्यांच्यामुळे जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यासाठी त्यांची ताबडतोब बदली करावी. (अडथळा) मी सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, गृह विभागाच्या बाब क्र.15 वर मी बोलत आहे. ही मागणी चौकशी समितीच्या खर्चासाठी करण्यात आलेली आहे. मी एका चौकशी समितीच्या संदर्भातच बोलत आहे.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, आपण पीठासीन अधिकाऱ्यांकडे बघून बोलावे. या पुरवणी मागण्यांसाठी उपलब्ध असलेला वेळ व या चर्चेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या सन्माननीय सदस्यांची संख्या पाहता आपण पुरवणी मागण्यांवरच आपले विचार मांडावेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांच्याकडून मार्गदर्शन घेत आहे, त्याबाबत आपला काही आक्षेप आहे काय ?

तालिका सभापती : आपण सन्माननीय सदस्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देता पुरवणी मागण्यांवरील आपले भाषण लवकर पूर्ण करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मार्गदर्शन माननीय सभापतींकडून घ्यावयाचे असते. पण एखाद्या सन्माननीय सदस्यांना मला मार्गदर्शन करण्याची इच्छा असल्यामुळे मी त्यांना विचारले की, गृह विभाग, बाब क्र.15, चौकशी समितीच्या खर्चासाठी तरतूद या मागणीवर मी जे बोलत आहे त्यात माझे काही चुकले आहे काय ? माझे काही चुकले असेल तर सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात दुरुस्ती करावी. त्यांचे ऐकून मला फार आनंद होईल आणि असे आदर्श सदस्य ज्यावेळी मार्गदर्शन करतात त्यावेळी ते आमच्या कर्तृत्वाची उंची वाढविण्यास मदत करीत असतात. याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांचे कामकाज वेळेवर उरकू नये. शासनाच्या पुरवणी मागण्या, राज्यपालांचे अभिभाषण व अर्थसंकल्प या तीन बाबींवर बोलत असताना सन्माननीय सदस्य आपापल्या भागातील प्रश्न मांडून सरकारची उणीदुणी काढत असतात किंवा सरकारकडून मार्गदर्शन घेत असतात. हे आपण कृपा करुन समजून घ्यावे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

कृषी विभाग, बाब क्र.30, मराठावाडा कृषी विद्यापीठ, परभणी यास सहायक अनुदान देण्यासाठी तरतूद करण्यासाठी ही मागणी केलेली आहे. परभणी कृषी विद्यापीठामध्ये आतापर्यंत कुल सचिवांची नेमणूक झालेली नाही. कोणत्या तरी प्राध्यापकांना कुल सचिव म्हणून काम करण्यास सांगितले जाते. मी गेले वर्षभर कुल सचिवांचे पद भरण्यासाठी मंत्री महोदयांकडे पाठपुरावा करीत आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

मी विभागीय आयुक्तांना याबाबतीत सांगितले होते. या निमित्ताने मी निर्वाणीचे सांगू इच्छितो की, एक वर्ष झाले तरी तेथे कुल सचिव म्हणून कोणी अधिकारी जाऊ इच्छित नसेल तर ते योग्य नाही. शासनाचे अधिकारी त्या पदावर का जात नाहीत ? कोणत्याही सचिवाला माननीय राज्यपाल आणि माननीय राष्ट्रपती यांच्या कार्यालयात जावेच लागते. त्या प्रमाणे परभणीच्या कृषी विद्यापीठाच्या कुल सचिव पदी तीन वर्षासाठी सचिवाची नेमणूक करावी आणि त्या विद्यापीठाचा कारभार सुधारावा अशी मी शासनाला विनंती करतो.

जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 49 संबंधी बोलत असताना मी सांगू इच्छितो की, निम्न पैनगंगा प्रकल्पाचे कार्यालय कर्मचारी नाहीत म्हणून गुंडाळण्यात आले आहे. मराठवाड्याच्या अनुशेषाचा हा प्रश्न आहे. अनुशेष दूर होण्यासाठी प्रकल्प मार्गी लागले पाहिजेत. अर्धा विदर्भ आणि अर्धा मराठवाडा अनुशेषग्रस्त आहे. अशा प्रकारे प्रकल्प कार्यालय गुंडाळण्यात येत असेल तर अनुशेष कसा काय संपुष्टात आणणार ? तेव्हा याकडे शासनाने लक्ष दिले तर बरे होईल.

अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या संदर्भात बोलत असताना मी माननीय मंत्री महोदयांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की, रेशन कार्डाचे घोटाळे फार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. माननीय मंत्री महोदय डॉ. विजयकुमार गावित हे माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांच्यावतीने उत्तर देणार आहेत. वाशिम जिल्ह्यातील कारंजा तहसील कार्यालयामध्ये दिनांक 13.7.2010 रोजी रेकॉर्ड हरविल्याचा रिपोर्ट स्वस्त धान्य दुकानदाराने दिनांक 14.7.2010 रोजी पोलीस स्टेशनला केला व ही बाब संशयास्पद ठरलेली आहे. ही बाब गंभीर आहे. ज्या प्रमाणे मंत्रालयामध्ये फाईल्स हरवतात, आदर्श प्रकरणाच्या फाईल्स हरवतात, न्यायाधीशांच्या सोसायट्याच्या फाईल्स हरवतात त्याप्रमाणे हे रेकॉर्ड हरवायला लागले आहेत. ही बाब अत्यंत गांभीर्याने घ्यावी अशी मी शासनाला विनंती करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या पृ.क्र.72 वरील बाब क्रमांक 65 संबंधी बोलत असताना एका गोष्टीकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो की, गेली अनेक वर्षे मी या सभागृहामध्ये मागणी करीत आहे की, ज्या प्रमाणे आपण नगरपालिकांची अ, ब, क अशी विगतवारी केलेली आहे तशी ग्रामपंचायतींची देखील अ, ब, क अशी विगतवारी करावी. आता शहरालगतच्या ग्रामपंचायती वाढत आहेत. त्या नगरपालिकांपेक्षाही मोठ्या होत आहेत. म्हणून त्या ठिकाणचे ग्रामसेवक, त्यांचा शैक्षणिक दर्जा, त्यांची कुवत पहाता मोठ्या ग्रामपंचायतीसाठी असलेल्या ग्रामसेवकाचे ग्रेडेशन करण्याची गरज निर्माण झालेली आहे. ही गोष्ट शासनाच्या विचाराधीन आहे अशा प्रकारचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी अनेक वेळा दिलेले आहे. माझी या पूरक मागण्यांच्या निमित्ताने शासनाला विनंती आहे मागील तीन अधिवेशनाच्या दरम्यान अ,ब,क ग्रामपंचायती करण्याच्या बाबतीत किती बैठका घेतल्या, काय प्रगती केली हे सांगावे.

सभापती महोदय, मी काल देखील माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना असा उल्लेख केला होता की, ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या 2000 पेक्षा जास्त आहे अशा ग्रामपंचायतींचे विभाजन करण्याचे शासनाने धोरण घेतलेले आहे. केन्द्र शासनाने देखील या बाबतीत मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. तेव्हा अशा ग्रामपंचायतींचे तातडीने विभाजन केले पाहिजे. तसेच ज्या ग्रामपंचायतीमध्ये पुनर्वसन झालेले असेल अशा गावानी स्वतंत्र ग्रामपंचायत मागितली तर ती त्यांना दिली पाहिजे असा कायदा असून त्या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. ती झाली पाहिजे अशी मी मागणी करीत आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, जिल्हा परिषदेचा जो सेस आहे. खनिज उत्पादनाची रॉयल्टी आहे, त्याच्या हिस्सा संबंधित ग्रामपंचायतीला मिळाला पाहिजे असा कायदा असताना खनिज उत्पादनापासून मिळणारे उत्पन्न संबंधित ग्रामपंचायतीला देण्यास महसूल विभागाचे अधिकारी टाळाटाळ करतात. या गोष्टीकडे ग्रामविकास विभागाने लक्ष दिले पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, पाणी पुरवठा विभागाची बाब क्रमांक 150, पान क्रमांक 155 च्या अनुषंगाने मी माझे विचार व्यक्त करीत आहे. अलिबाग नगरपालिकेची पाणी पुरवठा योजना मंजूर होऊन जवळपास 15 वर्षे झालेली आहेत. परंतु त्या योजनेकडे पाणी पुरवठा विभाग अजूनपर्यंत लक्ष देत नाही. अलिबाग येथील नगरपालिका गेली 30 वर्षे शेतकरी कामगार पक्षाच्या ताब्यात आहे. त्यामुळे या पाणी पुरवठा योजनेकडे शासनाकडून गांभीर्याने पाहिले जात नाही. या ठिकाणी माननीय श्री.जयंत पाटील, ग्रामविकास मंत्री उपस्थित आहेत. ते रायगड जिल्हयाचे पालकमंत्री होते. त्यांनी देखील या योजनेच्या संदर्भात बैठक घेतली होती. त्या योजनेसाठी लागणारे पाईप पडलेले आहेत, पाण्याचा साठा करण्यासाठी टाक्या बांधलेल्या आहेत. परंतु त्या योजनेचा मूळ प्लॅनच पाणी पुरवठा विभागाकडे उपलब्ध नाही. या योजनेचे काम शासनाने ताबडतोबीने हाती घ्यावे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 77, बाब क्रमांक 78 ही अन्न व नागरी पुरवठा विभागाची मागणी आहे. भात खरेदी मार्केटींग फेडरेशनच्या माध्यमातून केली जाते. महाराष्ट्रामध्ये विशेषत: पूर्व विदर्भात आणि कोकण विभागामध्ये भाताचे पीक मोठया प्रमाणात होते. गेल्या वर्षी खरेदी करण्यात आलेला भात किंवा धान गोडाऊनमध्ये पडून आहे. काही प्रमाणात धान आणि भात गोडाऊनच्या बाहेर पडून आहे. या वर्षी भात किंवा धान ठेवण्यासाठी गोडाऊनची उपलब्धता नाही. त्यामुळे भात आणि धान उत्पादक शेतकऱ्यांची मोठया प्रमाणात अडवणूक होत आहे. शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून मोठया प्रमाणात फसवणूक होत आहे. विकत घेतलेल्या भाताची भरडाई होत नसेल, तो भात कोणी विकत घेत नसेल तर भात ठेवण्यासाठी पर्यायी गोडाऊनची व्यवस्था मार्केटींग फेडरेशनने तातडीने केले पाहिजे. गोडाऊनला असलेला दर परवडत नाही, त्यामुळे गोडाऊन्स उपलब्ध होत नाहीत, या गोष्टीकडे अन्न व नागरी पुरवठा विभागाने लक्ष घातले पाहिजे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, पान क्रमांक 139, बाब क्रमांक 135 ही पणन विभागाची मागणी आहे. महाराष्ट्रामध्ये एन.सी.डी.सी.मार्फत अनेक औद्योगिक उद्योग उभे केले गेले आहेत. त्यास एन.सी.डी.सी.ने अर्थसहाय्य केले आहे. बरेच उद्योग सहकाराच्या माध्यमातून उभे केले गेले आहेत, त्यांना देखील एन.सी.डी.सी.मार्फत अर्थसहाय्य देण्यात आले आहे. परंतु अनेक उद्योग अपूर्णावस्थेत आहेत. एन.सी.डी.सी.अर्थसहाय्यीत अपूर्णावस्थेतील प्रकल्प जोपर्यंत पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत नवीन प्रकल्प हाती घेऊ नयेत. ज्या प्रकल्पांना 20-20, 25-25 कोटी रुपये दिले गेलेले आहेत आणि त्यांना 2 ते 4 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले तर ते प्रकल्प सुरु होऊ शकतील. कोल्हापूरचा भोगावती सहकारी खत कारखान्यास एन.सी.डी.सी.ने 20 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. अजून 5 कोटी रुपये त्यांना उपलब्ध करुन दिले तर तो कारखाना सुरु होऊ शकतो. एन.सी.डी.सी.ने दिलेले 20 कोटी रुपये वसूल होऊ शकतील. अशा प्रकल्पांचा अभ्यास वित्त व सहकार खात्याने केला पाहिजे. ज्या ज्या प्रकल्पांना एन.सी.डी.सी.ने अर्थसहाय्य केलेले आहे, त्या प्रकल्पांची विगतवारी करुन जे प्रकल्प होणार नाहीत, त्यांना बाजूला ठेवून, जे प्रकल्प पूर्ण होऊ शकतील अशा प्रकल्पांची कामे मार्गी लावली पाहिजेत अशी माझी या निमित्ताने शासनाकडे मागणी आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 134, बाब क्रमांक 133 ही आदिवासी विकास विभागाची मागणी आहे. आदिवासी लोकांचा विकास करण्यासाठी आदिवासी विकास विभाग निर्माण करण्यात आलेला आहे. आमच्या जिल्हयात अनेक आदिवासी पाडे आहेत, त्या ठिकाणी रस्त्याची सोय नाही. आदिवासीची खोटी लोकवस्ती दाखवून आदिवासी पाडयांची तरतूद दुसरीकडे वळविली जाते. ही गोष्ट तत्काळ थांबली पाहिजे.

यानंतर श्री. भोगले....

अनुधावित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

आणि प्रत्यक्षात जे आदिवासी पाडे आहेत त्यांचा विकास झाला पाहिजे. माझ्या तालुक्यात बारशेत हे गाव आहे. 3 कि.मी.अंतरावर असलेल्या या गावाला मी दरवर्षी भेट देत असतो. वन विभागाची परवानगी असताना आदिवासी विभाग त्या गावाच्या विकासासाठी निधी देत नाही. त्या गावामध्ये विजेची सोय उपलब्ध नाही. मी स्वत: भोपाळ येथे जाऊन वन विभागाची परवानगी प्राप्त केली आणि आदेशाची प्रत आदिवासी विभागाला उपलब्ध करुन दिली. ऊर्जा विभागाचे म्हणणे आहे की, डीपीडीसीने तरतूद केली तर आम्ही काम सुरु करु. आदिवासी विकास विभागाने या प्रश्नामध्ये लक्ष घातले पाहिजे. केवळ ग्रँट देणे म्हणजे विकास होत नाही. त्या गावाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. गावांच्या विकास कामासाठी लागणाऱ्या खर्चासाठी निधी देण्याचे काम केले पाहिजे. मला स्वत:ला त्या गावात जायला लाज वाटते. स्वातंत्र्यप्राप्ती मिळून 60 वर्षे उलटून गेली आहेत. अद्याप त्या गावामध्ये वीज नाही. त्या गावातील 12-13 मुलांना मी स्वखर्चाने पदवीपर्यंत शिक्षण दिले, 7 मुलांना पदवी शिक्षणानंतर जिल्हा मध्यवर्ती बँकेत नोकरी मिळवून दिली. अशाच पध्दतीने त्या गावात राहणाऱ्या समाजाचा विकास होण्यासाठी आदिवासी विकास विभागाने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-7, पृष्ठ क्रमांक-11 वर गृह विभागाची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. 26.11 च्या घटनेनंतर समुद्र किनाऱ्यावरील संरक्षण व्यवस्थेत वाढ करण्यात आली आणि सुरक्षेच्या दृष्टीकोनातून काही नियम लागू करण्यात आले. मुंबई शहराचे वैभव असलेल्या मरिन ड्राईव्ह रस्त्यावरुन मलबार हिलकडे जाता येते, तो रस्ता सुरक्षेच्या दृष्टीकोनातून वाहतुकीसाठी बंद करता येईल का? सायंकाळी 7.00 नंतर अतिरेकी हल्ल्याची शक्यता लक्षात घेऊन मरिन ड्राईव्हचा रस्ता बंद करता येईल काय? आज मुंबईच्या गेटवे ऑफ इंडिया येथून अलिबाग येथे 10 मिनिटात समुद्रमार्गे जाता येते. परंतु सुरक्षेच्या कारणास्तव सायंकाळी समुद्रातून प्रवास करण्यास पोलिसांकडून बंदी घालण्यात आली आहे. वास्तविक रस्त्यावरील संरक्षणाची जबाबदारी पोलिसांची आहे. सायंकाळी 7.00 नंतर पोलीस बंदुका घेऊन येतात आणि समुद्रमार्गे प्रवास करण्यास मनाई करतात. वास्तविक समुद्रातील प्रवासास बंदी घालण्याचा शहर पोलिसांना अधिकार नाही. 5 नॉटिकल मैलपर्यंतच पोलिसांना अधिकार आहे. त्यापुढील क्षेत्रात कोस्टगार्ड, त्यापुढे नेव्ही आणि कस्टम यांना अधिकार आहे. 5 कि.मी.च्या त्रिज्येपर्यंत गृह विभागाला अधिकार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

असताना शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या बोटीचा वापर करुन पोलिसांकडून समुद्रात बोटीमधून प्रवास करणाऱ्यांना अडविण्याचे काम केले जात आहे. समुद्रातील प्रवास 24 तास सुरु राहण्याच्या दृष्टीने शासनाने लक्ष दिले पाहिजे. रात्री 8.00 नंतर आम्हाला 10 मिनिटाच्या वेळेत समुद्रमार्गे अलिबाग येथे जाता येते. परंतु पोलिसांकडून आम्हाला प्रवास करण्यास अडविले जाते.

सभापती महोदय, शासनाने पोलीस विभागाला अत्याधुनिक बोटी कशासाठी उपलब्ध करुन दिल्या आहेत? समुद्रामध्ये मोठया जहाजामधून आलेला माल छोट्या बोटीमध्ये उतरविला जातो आणि कस्टम चुकवून तो माल शहरात आणला जातो. हे प्रकार थांबविण्यासाठी ही यंत्रणा उभी केली आहे. त्या गोष्टीकडे लक्ष दिले जात नाही. आज समुद्रामध्ये राजरोसपणे मोठ्या जहाजातील माल छोट्या बोटीवर लादून शहरात आणला जातो. पोलिसांकडून त्याकडे दुर्लक्ष केले जाते, कारण त्यांना हप्ते दिले जातात. गेटवे ऑफ इंडियासमारे मोठमोठी जहाजे उभी केली जातात. त्या जहाजांमधून आणलेला माल छोट्या बोटींमध्ये उतरविण्यात येतो, परदेशातून आलेल्या मालाची तस्करी केली जाते. या प्रकारांना आळा घातला पाहिजे. जे लोक गैरमार्गाने परदेशी मालाची तस्करी करतात त्यांना योग्य ती शिक्षा झाली पाहिजे. पोलिसांची दहशत वाटेल अशा प्रकारचा कायदा तयार करण्याचा शासनाने निर्णय घेतला पाहिजे.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंदी

श्री. जयंत प्र. पाटील.....

अशा प्रकारचा प्रयत्न गृह विभागाने करावा . गृह विभागाने नवीन बोटी आणल्या परंतु त्या चालविण्यासाठी प्रशिक्षण वगैरे या सर्व गोष्टींसाठी वेळ लागणार हे मी समजू शकतो. अशा सर्व गोष्टींचा विचार करुन गृह विभागाने लक्ष दिले पाहिजे अशी मागणी करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, सन 2011-12 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, प्रामुख्याने मी फक्त दोन तीन मुद्यांवरच बोलणार आहे. त्यात प्रथम पृ.क्र. 131 आणि बाब क्र. 124 ते 126-आश्रमशाळांच्या अनुदानाच्या संदर्भातील मागणीच्या बाबतीत मला शासनाला विनंती करावयाची आहे की, आश्रमशाळांच्या व त्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या यांची अत्यंत दुरवस्था आहे. यासंदर्भात सातत्याने तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना तसेच अन्य आयुधांच्या माध्यमातून सभागृहात सन्माननीय सदस्य चर्चा उपस्थित करतात तेव्हा हेच उत्तर शासनाकडून मिळते की, आश्रमशाळांची अवस्था खूप चांगली आहे, चांगल्या प्रकारच्या सुविधा या मुलांना देण्यात येत आहेत. पण वस्तुस्थिती मात्र अतिशय भिन्न आहे. ठाणे जिल्ह्यातील वाडा, विक्रमगड, जव्हार, तलासरी व डहाणू या सर्व भागांचा मी दौरा केलेला आहे. या भागातील आश्रमशाळा व विद्यार्थ्यांचे अत्यंत गंभीर असे प्रश्न आहेत. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी एक दिवस अनपेक्षितपणे व न कळविता माझ्याबरोबर या भागात पाहणी करण्यासाठी यावे. मंत्री महोदय सांगतील त्या शाळेत येण्यास मी तयार आहे. तेथे प्रत्यक्ष जाऊन पाहणी केल्यानंतर खऱ्या अर्थाने वस्तुस्थितीचे दर्शन घडू शकेल. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवर विसंबून न राहता प्रत्यक्ष पाहणी केली तरच वस्तुस्थिती आपल्याला समजू शकेल. शासन आश्रमशाळांसाठी मोठ्या प्रमाणात तरतूद करते परंतु विद्यार्थ्यांना त्याचा काहीच उपयोग होत नाही.

आश्रमशाळांमध्ये अनुशेषाची भरती करण्याच्या संदर्भात कोणतीही बंदी शासनाने घातलेली नाही. पण नेहमी अशी उत्तरे दिली जातात की, शासनाने अशी पदे भरण्यावर बंदी घातलेली आहे म्हणून ही अनुशेषाची पदे भरली जात नाहीत. त्यामुळे पहारेकरी, मदतनीस आणि स्वयंपाकी यांची अनुशेषाची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. ती वर्षानुवर्षे भरली जात नाहीत. त्यात शालेय शिक्षण विभागाने मान्यता देऊन देखील आदिवासी भागात आश्रमशाळा आहेत, आदिवासी उपयोजना क्षेत्रात या आश्रमशाळा असल्याने या विभागाकडून अशा आश्रमशाळांना अनुदान मिळते. पण अशा शाळांचे निरीक्षण करुन पडताळणी केल्यानंतर अहवाल दिलेला असताना, शाळा अनुदानास पात्र आहेत असे जाहीर केलेले असताना देखील या आश्रमशाळांचे अनुदान अडवून ठेवण्याची भूमिका आदिवासी विकास विभागाचे अधिकारी घेत आहेत. माझा या विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बाबतीतील

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

अनुभव अतिशय विदारक आहे. पाठविलेल्या पत्रांना चार-चार, सहा-सहा महिने साधे उत्तर सुध्दा दिले जात नाही, त्यामुळे कोणतीच कामे होत नाहीत. या आदिवासी विकास विभागांमध्ये नटोरियस अधिकारी बसवून ठेवलेले आहेत. श्री. चंदनशीवे नावाच्या अधिकाऱ्यांकडे हे काम आहे. शालेय शिक्षण विभागाकडून शाळा अनुदानास पात्र असल्यासंबंधीचे प्रस्ताव आदिवासी विकास विभागाकडे गेलेले असूनही फक्त मंजुरीच या विभागाकडून घ्यावयाची असते. पण हे चंदनशीव नावाचे अधिकारी जाणूनबुजून वेगवेगळ्या त्रुटी काढून हे प्रस्ताव मंजूर होण्यात अडथळे निर्माण करीत आहेत. यासाठी वर्षभर प्रयत्न करुन देखील अनुदान रिलीज केलेले नाही. त्याचा परिणाम म्हणून आदिवासी भागातील आश्रमशाळातील शिक्षकांना पगार व विद्यार्थ्यांना सुविधा मिळू शकलेल्या नाहीत. मी एखादे पत्र दिल्यानंतर त्यासाठी प्रचंड फॉलो-अप करतो. तसेच माझ्या स्वीय सहाय्यकाच्या माध्यमातून देखील पाठपुरावा करीत असतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

सभापती महोदय, चंदनशीवे नावाचे कक्ष अधिकारी आमदारांना उत्तरे देत नाहीत, आमदारांचा पी.ए.जरी असला तरी तो लोकप्रतिनिधींचा पी.ए. असतो. अधिकृत पी.ए.ला सुध्दा हा कक्ष अधिकारी उत्तरे देत नाही. तो वरुन सांगतो की, आम्हाला केवळ आमदारांचीच कामे असतात असे नसून आम्हाला अन्य कामे सुध्दा असतात.

सभापती महोदय, या संदर्भात मी मुख्य सचिवांकडे संबंधित कक्ष अधिका-याची तक्रार केलेली आहे परंतु यासंदर्भात त्यांनी अद्याप दखल घेतलेली नाही. यासंदर्भातील सर्व माहिती मी माहितीच्या अधिकाराखाली मागवलेली असून यामध्ये काय नोटींग केलेले त्या संदर्भातील सर्व माहिती मी आपल्याकडे पाठवतो. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना अनुदान द्यावयाचे नाही, शाळांना अनुदान द्यावयाचे नाही म्हणून आदिवासी विभागाने त्रुटी काढलेल्या आहेत. खरे म्हणजे शालेय शिक्षण विभागाने सर्व माहिती घेतलेली आहे आता आदिवासी विभागाला केवळ अनुदान रिलीज करावयाचे आहे. परंतु आदिवासी विकास विभाग शाळांची यादी आहे काय, मान्यता आहे काय, शिक्षक नेमले काय, रोस्टर पूर्ण केले आहे काय, विद्यार्थ्यांची यादी द्या, गावाची लोकसंख्या किती आहे, या शाळा आदिवासी क्षेत्रात आहेत काय ? अशा प्रकारची निरर्थक माहिती मागवत असतात. शालेय शिक्षण विभागाने सर्व तपासणी करुनच शाळा अनुदानास पात्र ठरवलेल्या आहेत हे आपण कसे काय विसरता ? याच्याही पुढे जाऊन त्यांना केवळ आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांचीच यादी नको आहे तर प्रत्येक विद्यार्थ्यांच्या उजव्या हाताचे ठसे त्यांना हवे आहेत. अशा प्रकारची नोट तयार करुन अनुदान देण्याची टाळाटाळ आदिवासी विभाग करीत आहे. शाळांनी काय हजारो विद्यार्थ्यांच्या हाताचे ठसे गोळा करीत फिरायचे काय ? अत्यंत वाईट पध्दतीने आदिवासी विभागाकडून अडवणुकीचे काम केले जात आहे.

सभापती महोदय, या विषयाची, अधिका-यांच्या वर्तनाची, काम करण्याच्या पध्दतीची गंभीर दखल मंत्री महोदयांनी घेण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तरात गंभीर दखल घ्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, आदिवासी विभागाचा 6 ऑगस्ट, 2002 चा निर्णय आहे. परंतु असे असतांनाही आमच्या आदिवासी भागातील शिक्षकांना एक स्तरचा लाभ मिळत नाही. पोलिसांना सुध्दा आदिवासी विभागाच्या 6 ऑगस्ट, 2002 च्या निर्णयानुसार एक स्तरचा लाभ मिळत नाही त्यामुळे यासंदर्भात सुध्दा गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या पान क्रमांक 83 वरील बाब क्रमांक 75,76 व 77 च्या संदर्भात मी विचार मांडणार आहे. शिष्यवृत्ती व विद्यावेतनासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, बाब क्रमांक 77 मध्ये मगासवर्गीय विद्यार्थ्यांना 1000 रुपयांची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती देण्यासाठी 57,79,92,000/ रु. निधींची आवश्यकता आहे असे म्हटलेले आहे. मूळ अर्थसंकल्पामध्ये 324,06,39,000/- रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात यासाठी पुन्हा 30 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. या विभागाच्या संकेत स्थळावरुन माहिती घेतली असता आम्हाला असे दिसून आले आहे की, 15 मार्च, 2012 पर्यंत केवळ 44 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. एका बाजूला 324 कोटी रुपयांची मूळ मागणी अधिक नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात 30 कोटी रुपयांची पूरक मागणी असतांना वर्ष संपण्यास केवळ 15 दिवस शिल्लक असतांना यांनी केवळ 44 कोटी रुपये खर्च झाले आहेत. आता हे सामाजिक न्याय विभाग 15 दिवसात 310 कोटी रुपये खर्च करु शकणार आहे काय ? याचा अर्थ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नाही ही फार गंभीर बाब आहे. आम्ही मागणी करुनही जर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होत नसेल तर ती अत्यंत वाईट गोष्ट आहे.

सभापती महोदय, मी पुन्हा सामाजिक न्याय विभागावर विचार मांडणार आहे. अंध-अपंगांच्या शाळांमधील शिक्षकांना सेवानिवृत्ती योजना लागू केलेली आहे. या संस्थांना 100 टक्के अनुदान मिळत असते. यांच्या कर्मशाळा सुध्दा आहेत. कर्मशाळेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्ती वेतन योजना शासनाने अद्यापि लागू केलेली नाही. तसेच पीएफची सुध्दा सवलत दिली जात नाही, पेन्शन योजना सुध्दा नाही. 25-25,30-30 वर्षे काम करुन सुध्दा या कर्मचा-यांना पीएफ,पेन्शन दिली जात नसेल तर ते योग्य नाही. अनुदान संस्थांमध्ये काम करणा-या शिक्षकांना शासन सेवानिवृत्ती योजनेचा लाभ देते तर कर्मशाळेमध्ये काम करणा-या कर्मचा-यांना मात्र सेवा निवृत्ती वेतनापासून वंचित ठेवले जात आहे. खरे म्हणजे हा भेदभाव आहे, हे घटनात्मक दृष्टया बरोबर नाही त्यामुळे याबाबतीतही विचार होण्याची आवश्यता आहे.

यानंतर श्री. भारवि...

अनुवादित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ....

सभापती महोदय, सुरूवातीला शाळा विना अनुदानावर असते. काही वर्षानंतर टप्प्याटप्प्याने या शाळांना अनुदान मिळते. संस्थेने जरी पगार दिला असला तरी विनाअनुदान सेवा ही त्यांच्या एकूण सेवानिवृत्तीसाठी ग्राह्य धरली जाते. त्या आधारे त्यांना पेन्शन आणि ग्रॅड्यूईटि मिळते. सामाजिक न्याय विभागाच्या अंध, अपंगांच्या शाळा आहेत. या शाळांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सुरूवातीची 7-8 वर्षे विना अनुदानित सेवा त्यांच्या ग्रॅड्यूईटिसाठी, पेन्शनसाठी ग्राह्य धरली जात नाही. अन्य म्हणजे शालेय शिक्षण विभागामध्ये ती ग्राह्य धरली जाते. त्यामुळे शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर सामाजिक न्याय विभागाने सुद्धा निर्णय घेतला पाहिजे. शासनाने निर्णय घेतला की, ती सेवा ग्राह्य धरता येत नाही. म्हणजे त्यावर आम्हाला अपीलच नाही काय ? आम्ही ते 100 टक्के मान्य करायचे काय, त्यामुळे याचा कुठे तरी सहानुभूतीपूर्वक विचार होण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक गोष्टीसाठी आम्हाला न्यायालयात जायला नको. म्हणून सामाजिक न्याय विभागाने, शासनाने विचार करावा आणि त्यांची विनाअनुदानित सेवा ग्राह्य धरावी.

आज विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देखील वेळेवर मिळत नाही. शहापूर हा आदिवासी तालुका आहे. 3-3 वर्षे मुलांना शिष्यवृत्ती मिळालेली नाही. एका बाजूला आपण कोट्यवधी रूपये देत आहात. शिष्यवृत्ती तीन-तीन वर्ष देत नसाल तर ते काही बरोबर नाही. म्हणून या सर्व बाबींचा विचार व्हावा वसतिगृहातील कर्मचारी आहेत त्यांना आपण वर्षानुवर्षे मानधन देत आहोत. त्यांच्या वेतनश्रेणीचा देखील विषय आहे. त्यासंबंधी सन्माननीय मंत्रिमहोदय प्रयत्न करीत आहेत याची मला कल्पना आहे. अनेक वेळा त्यांची माझी भेट झाली आहे, चर्चा झाली आहे. सन्माननीय सभापती महोदय, आपणही त्यासाठी प्रयत्नशील आहात. पण हा विषय आपण किती दिवस लोंबकळत ठेवणार आहात. म्हणून यासंबंधी देखील गांभीर्याने विचार होण्याची आवश्यकता आहे. किती दिवसात आपण यासबंधी निर्णय घेणार आहात, याची सुद्धा माहिती आम्हाला या पुरवणी मागण्यांद्वारे मिळावी. आपण मला वेळ दिल्याबद्दल धन्यवाद.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, बाब क्र.68, पान क्रमांक 77 वर मी बोलणार आहे.

राज्यातील शासकीय धान्य गोदामात हमाली कामाची अनावश्यक व हमालांच्या पाटीचा लिलाव करण्याची पद्धत सुरू आहे. या बाबत नागपूर अधिवेशनात महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे शिष्टमंडळ बाबा आढाव आणि इतरांच्या बरोबर मंत्रिमहोदयांना भेटले होते. या संबंधी त्यांची मंत्रिमहोदयां समवेत प्राथमिक चर्चा देखील झाली आहे. या बैठकीमध्ये मंत्रिमहोदयांनी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रतिनिधींशी दिनांक 4.7.2008 च्या शासन निर्णयानुसार कामगार विभागाशी सल्लामसलत करून घेतलेल्या निर्णयाचा उल्लेख केला होता. तद्वतच याबाबत न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कारवाई केली जात असल्याचे सांगितले. डॉ.बाबा आढाव यांनी माथाडी कायदा लागू करण्यासंबंधी कोणतीही संदिग्धता राहू नये म्हणून काळजी घ्यावी असा उल्लेख देखील केला. मंत्रिमहोदयांनी शासन निर्णय दिनाक 4.7.2008 मध्ये कंत्राटी पद्धत रद्द करणे व माथाडी कायद्याची काटोकोरपणे अंमलबजावणी करणे इ.सुधारणा सुचविण्याच्या सूचना अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या कामगार विभागास दिल्या आहेत. तरी देखील याची बीड जिल्ह्यामध्ये अजून अंमलबजावणी झालेली नाही. तसेच महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यांमध्ये देखील अंमलबजावणी झालेली नाही. या संबंधी शासनाने तातडीची उपाययोजना करणे गरजेचे आहे.

यानंतर मी बाब क्रमांक 75 पान क्रमांक 83 वर बोलणार आहे. सामाजिक न्याय विभागाशी हा प्रश्न संबंधित आहे. महाराष्ट्रामध्ये नर्सिंग कॉलेजेस आहेत. यातील ओबीसी उमेदवारांना शिष्यवृत्ती दिली जात होती. पण या वर्षी शासनाने अचानकपणे शिष्यवृत्ती बंद करण्याचा निर्णय घेतला. यासंबंधी आरोग्य खात्याचे मंत्री श्री.गावित साहेब यांच्याशी देखील मी स्वत: चर्चा केली होती. त्यांचे असे म्हणणे आहे की, आम्ही लवकरच निर्णय घेणार आहोत. या शिष्यवृत्तीधारकांना शिष्यवृत्ती देणार आहोत. माझी शासनाला विनंती आहे की, या संबंधी त्वरित निर्णय घेणे गरजेचे आहे. कारण विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू झालेल्या आहेत. त्यामुळे त्यामध्ये आपल्याला विलंब करता येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दरोडे....

यानंतर मी बाब क्रमांक 155 पान क्रमांक 159 वर बोलणार आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या संदर्भात मी बोलणार आहे. पाटोदा तालुक्यामध्ये मजुरांची संख्या अत्यंत कमी आहे. 59 ग्रामपंचायंतीची कामे सध्या बंद आहेत. जलसिंचन विहीर, रोपवाटिका मोठ्या प्रमाणावर दिलेल्या आहेत. गाळ काढणे, शेतीबांध, वनीकरण, शेती रस्ते इत्यादी कामे आपण केली. तरी देखील 1886 मजूर पाटोदा तालुक्यात कामावर आहेत. अशीच अवस्था आमच्या जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये आहे. तेव्हा या संदर्भात शासनाने ताबडतोबीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषाताई दराडे . . ..

सभापती महोदय, बाब क्र.75, पान क्र.83 बाबत सांगावयाचे तर हा प्रश्न सामाजिक न्याय विभागाशी संबंधित आहे.विद्यार्थ्यांना वसतीगृहामध्ये दिले जाणारे अन्न असते,त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर, वसतीगृह मोंदा, ता.बीड, जि.बीड येथील भातामध्ये खडे, पोळीमध्ये दोरे आणि भाजीमध्ये अळ्या आणि दुधामध्ये पाणी असते. तेथील विद्यार्थी दूध घेण्यास देखील नकार देतात इतके हलक्या प्रतीचे दूध मुलांना दिले जाते. तसेच तेथील विद्यार्थ्यांना फिस्ट दिली जात नाही एवढी वाईट अवस्था या वसतीगृहाची असून शासनाने याची ताबडतोब दखल घ्यावी.

सभापती महोदय, बाब क्र.64, पान क्र.73 याबाबत सांगावयाचे तर मागील 7 वर्षापासून बीड जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाध्ये कॅश बुक अद्ययावत ठेवण्यात आलेले नाही आणि ही अतिशय धक्कादायक अशा प्रकारची बाब आहे. तेथील सदरहू सीइओ यांच्या हे लक्षात आल्यानंतर त्यांनी 6 कर्मचाऱ्यांना निलंबनाच्या नोटीसा दिलेल्या आहेत. कारण त्याठिकाणी एकंदर किती निधी प्राप्ता झाला, त्यातील किती खर्च झाला आणि एकूण किती शिल्लक राहिला आहे, तसेच जे धनादेश वटलेले नाहीत त्यांचे काय करण्यात येणार आहे? तसेच फरकाच्या रकमेची माहिती न ठेवणे इ.बाबी गंभीर स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे शासनाने कोणत्याही परिस्थितीमध्ये ताबडतोब तेथील कॅश बुक करेक्ट करुन घेणे, त्याच्या नोंदी करणे गरजेचे आहे आणि त्यासाठी शासनाने उपाययोजना करावयास पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्र.26, पान क्र.26 बाबत सांगावयाचे तर मी आमदार झाल्यापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये शालेय शिक्षणामध्ये शेती व्यवसायाच्या संबंधात अभ्यासक्रमाचा देखील समावेश करावा हा मुद्दा मांडत असते. तत्कालीन माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी ही बाब मान्य देखील केली होती. परंतु अद्यापपर्यंत याची अंमलबजावणी झालेली नाही. आपल्याला कोणत्याही परिस्थितीत या सर्व गोष्टी करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, पान क्र.9, बाब क्र.8 याबाबत सांगावयाचे तर माजलगाव येथील पोलिसांची निवासस्थाने ही पूर्णपणे उंदीर व घुशींनी पोखरलेली आहेत. त्यामुळे पोलिसांना तेथे रहाणे देखील कठीण झालेले आहे. या बाबतीत गृह विभागाने आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने ताबडतोब निर्णय घेणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, तसेच माजलगाव तालुक्यात तालखेड पासून जवळच असलेल्या शिनगार वाडी या दीड हजार लोकसंख्येच्या गावात पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. तेथील बोअर एक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महिन्यापूर्वीच बंद पडलेली आहे. त्यामुळे तेथील भगिनींना शेतातून पाणी आणण्याची वेळ आलेली असून जलस्वराज योजनेसाठी 35 लाख रुपये खर्च झाले असून त्यात जलस्त्रोताची विहीर, 5 कि.मी.ची पाईप लाईन टाकणे आणि पाण्याची टाकी इ. कामासांठी खर्च झालेला आहे. मात्र त्याठिकाणी 1 लाख 40 हजार रुपयांची पाणीपट्टी बाकी आहे. त्याठिकाणी केवळ तेथील ग्राम सेवकाच्या आणि सरंपचाच्या हलगर्जीपणामुळे ही परिस्थिती उद्‌भवलेली आहे. परंतु याबाबतीत मार्ग काढणे गरजेचे आहे. आपल्याला तेथील लोकांना पाण्या पासून वंचित ठेवता येणार नाही.

सभापती महोदय, धानूर तालुक्यामध्ये आसारडोह 20 गावांच्या पाणी पुरवठ्याच्या योजने बाबत मी प्रत्येक अधिवेशनामध्ये उल्लेख केलेला आहे. त्याठिकाणी संबंधित ठेकेदाराने निकृष्ट प्रतीचे काम केले आहे.परंतु अनेक वर्षे होऊन सुध्दा तेथील लोकांना पाणी मिळत नाही. तसेच आष्टीमध्ये देखील तीव्र पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. याबाबत सांगावयाचे तर आष्टी तालुक्या तील पाण्याची पातळी अत्यंत खाली गेलेली आहे. तेथील अगदी बोटावर मोजता येतील अशा तलावांमधील पाण्याच्या पातळीबाबत काही आकडेवारी देण्याचा मी प्रयत्न करणार आहे. कांबळी मध्यम प्रकल्पामध्ये 18 टक्के पाणी शिल्लक आहे. कडा मध्यम प्रकल्पामध्ये 35 टक्के पाणी असून मेहकरी मध्यम प्रकल्प कोरडा झाला आहे. रुटी मध्यम प्रकल्प देखील कोरडा झाला आहे. तलवार मध्यम प्रकल्प कोरडा आहे, कडी मध्यम प्रकल्प कोरडा आहे, वेलतुरी लघू सिंचन तलावामध्ये 36 टक्के पाणी, बेलगाव लघु प्रकल्पामध्ये 18 टक्के पाणी, पांढरी लघु प्रकल्पामध्ये 24 टक्के पाणी, लोणी लघु प्रकल्पामध्ये 38 टक्के पाणी, सुलेमान देवळा प्रकल्पामध्ये 43 टक्के पाणी, तसेच ब्रम्हगाव, किन्ही, मातकुळी, वडगाव, पारगाव जो.क्र.1, पारगाव जो.क्र.2 प्रकल्प कोरडा झाले आहेत. चोंभा निमगाव, केळ, पिंपळा, सिंदेवाडी, धामणगाव, कोयाळ, बळेवाडी, खुंटेफळ हे सगळे कोरडे पडलेले तालाव आहेत. त्यामुळे येथील पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने तसेच शेतीच्या दृष्टीने देखील पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत देखील गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, बाब क्र.150, पान क्र.155 बाबत सांगावयाचे तर दूषित पाण्यामुळे 190 ग्राम पंचायतींना रेड कार्ड मिळालेली आहेत आणि त्याची यादी देखील माझ्याकडे आहे.परंतु मी ही यादी वाचून सदनाचा वेळ घेणार नाही.पण जर बीडमध्ये 190 ग्राम पंचायतींना दूषित पाण्यामुळे रेड कार्ड मिळाले असेल तर या संदर्भात अत्यंत वाईट परिस्थिती आहे असे म्हणावे लागेल. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड उषाताई दराडे .....

बाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. सभापती महोदयांनी मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देते व माझे भाषण संपविते.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 8, बाब क्रमांक 7- गृह विभाग- सांगली आणि बीड जिल्ह्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग येथे दोन वर्षा पूर्वी अफूची शेती करण्याचा प्रकार इ ाला होता. परप्रांतीयांनी वेगवेगळ्या प्रकारची लागवड करुन त्या अंतर्गत अफूची लागवड केली होती. त्यावेळी 20 लाख रुपयांचा अफू पकडला गेला होता. हे परप्रांतीय केरळी लोक अननसची लागवड करतात. या अननस फळा जवळ साप येतात आणि या सापांचे विष काढून त्याची तस्करी हे लोक करीत आहेत. तेव्हा या गोष्टीकडे पोलीस विभागाने लक्ष देण्याची गरज आहे.

पृष्ठ क्रमांक 8 बाब क्रमांक 6, गृह विभाग-सिंधुदुर्ग जिल्ह्यात निवडणूक म्हटली की तेथे राडा, मारामाऱ्या सातत्याने होत असतात. गेल्या विधानसभेच्या पोटनिवडणुकीत श्री.रमेश गोयेकर नावाचा इसम बेपत्ता झाला. या घटनेला आता सात वर्षे पूर्ण झालेली आहेत. या प्रकरणाचा तपास सी.आय.डी.आणि सी.बी.आय.देखील करु शकले नाहीत. रमेश गोयेकर कोठे बेपत्ता आहेत याचा ते शोध घेऊ शकले नाहीत. या ठिकाणी आबांनी त्यांचा शोध घेण्यात येईल असे सांगितले परंतु अजून त्यांचा शोध लागलेला नाही.

सभापती महोदय, सन 2009 मध्ये एका मंत्री महोदयांच्या भावाची हत्या झाली. त्या प्रकरणाचा तपास सी.आय.डी.कडे सोपविण्यात आला. परंतु अजूनही त्या प्रकरणी गुन्हेगारांचा शोध ते घेऊ शकलेले नाहीत. या सर्व घटनांवरुन पोलीस दल निष्क्रिय झाल्याचे दिसून येते. तेव्हा या दोन्ही प्रकरणी योग्य रितीने तपास होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सन 2012 मध्ये वेंगुर्ला नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये माझ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केला. माझ्या अंगरक्षकांनी गोळ्या झाडल्यावर ते लोक पळाले. यामध्ये एकूण 46 जण होते. या 46 जणांना एकाचवेळी अटकपूर्व जामीन मिळाला. पोलीस विभागाने अटकपूर्व जामिनाच्या विरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली नाही. आबा आपण हे सर्व पाहिले आहे. आमदारावर हल्ला करणाऱ्या 46 जणांना अटकपूर्व जामीन मिळतो आणि पोलीस त्या विरोधात उच्च न्यायालयात धाव घेत नाही ही गंभीर बाब आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

सभापती महोदय, कुडाळ तालुक्यातील माणगावखोरे येथे शिवसेनेच्या उमेदवारास काँग्रेसच्या सरपंचानी मदत केली म्हणून निवडणूक झाल्यानंतर चार-पाच दिवसांनी त्यांना शिगा आणि तलवारीचे वार करुन जंगलात टाकून दिले. या प्रकरणी पोलीस तपास झाला असता त्यामध्ये काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्याची गाडी सापडली. त्याची गुन्हेगार म्हणून पोलिसांनी नोंद केलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रत्येक निवडणुकीत मारामाऱ्या होत आहेत. तेथील लोकांनी हे सर्व सहन करायचे काय ? पोलिसांचा कोणालाही धाक राहिलेला नाही. आपण काही केले तरी न्यायालय आपणास सोडून देते आणि पोलीस गप्प बसतात आणि याची प्रचिती जिल्हापरिषदेच्या निवडणुकीच्या वेळी पहावयास मिळाली.

सभापती महोदय, पृष्ठ 9 बाब क्रमांक 8 - गृह विभाग- मुंबई आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या किनाऱ्यावर पर्सेनेट मासेमारी वरुन मोठा संघर्ष झालेला आहे. पर्सेनेट मध्ये असलेल्या खलाशांना मुंबईवर 26/11 चा हल्ला झाल्यानंतर स्मार्ट कार्डची अट घातलेली आहे. स्मार्ट कार्ड असल्या शिवाय त्यांना बोटीवर जाता येत नाही. असे असताना काही दिवसांपूर्वी मच्छीमारांनी जे 35 खलाशी पकडले त्यापैकी फक्त 7 जणांकडे स्मार्ट कार्ड असल्याचे आढळून आले. बाकींच्याकडे स्मार्ट कार्ड नव्हती. या संदर्भात तक्रार केल्यानंतर पोलीस विभाग सांगते की, ते आमच्या विभागाचे काम नाही मत्स्य विभागाचे काम आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर..

पण मत्स्य विभाग असे सांगतो की, हे आमचे काम नाही हे गृह विभागाचे काम आहे. अशा प्रकारचे हल्ले थांबविण्याकरिता ज्या स्मार्ट कार्डची योजना आणली आहे ती पोलीस विभागाने किंवा मत्स्य विभागाने योग्य रीतीने अंमलात आणण्याची गरज आहे.

सभापती महोदय,पान क्रमांक 9 बाब क्रमांक 9 वर मी बोलू इच्छितो. वर्तमानपत्रामध्ये दोन दिवसापूर्वीच एक बातमी छापून आलेली आहे. दोडामार्ग तालुक्यातील एका तरुण युवतीला गोव्यामध्ये नेऊन तिच्या अश्लील चित्रफिती काढून त्यासंबंधीच्या क्लिप्स संगणकाद्वारे आणि मोबाईलद्वारे ट्रान्स्फर करण्याचे काम चालले आहे. या प्रकरणामध्ये एका बडया व्यक्तींचा संबंध असल्याचे वर्तमानपत्रात छापून आलेले आहे त्यामुळे या प्रकरणातील गुन्हेगारांना पकडून त्यांना योग्य रीतीने शिक्षा देण्याच्या दृष्टिकोनातून गृह विभागाने यामध्ये लक्ष घालावे अशा प्रकारची मी या ठिकाणी विनंती करतो.

सभापती महोदय, पान क्रमांक 26, बाब क्रमांक 26 वर मी बोलू इच्छितो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात केळी, द्राक्ष, आंबा व काजू या पिकांना पीक विमा योजना लागू केलेली आहे. कोकणातील आंबा आणि काजू हे पीक प्रामुख्याने बागायती आहे. येथील हवामानामुळे या पिकांवर होत असलेले परिणाम त्यामुळे बागयतदारकडून सातत्याने या दोन्ही पिकांना हमी भाव देण्यात यावा अशी राज्य शासनाकडे मागणी केली जात आहे.या संदर्भात राज्य शासनाने ठोस पाऊले उचलण्याची गरज आहे. धान्यापासून दारु निर्मिती करण्यासाठी राज्य शासनाने परवानगी दिलेली आहे त्याप्रमाणे कोकणातील जांभूळ, करवंदे आणि काजू यापासून वाईन निर्माण करण्यासाठी कारखाने निर्माण करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे असे सांगण्यात आले होते. त्याकडे जनतेचे लक्ष आहे. तेव्हा या बाबतीत उपाययोजना किंवा प्रस्ताव करण्याच्या बाबतीत शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय,पृष्ठ क्रमांक 155, बाब क्रमांक 150 वर मी बोलू इच्छितो. सिंधुदुर्ग जिल्हा हा 1997-98 सालामध्ये टँकरमुक्त करण्यात आला. गावात आणि वाडयांमध्ये नळपाणी पुरवठा योजना करण्यात आल्या. या नळ योजनांचे आयुष्यमान 12 ते 15 वर्षाचे असते. या सर्व नळपाणी पुरवठा योजना नादुरुस्त झालेल्या आहेत. देखभाल दुरुस्तीसाठी शासनाकडून पैसे दिले जात नाहीत. विजेच्या बिलासाठी सबसिडी दिली जात नाही. अशा परिस्थिती ग्रामपंचायतीला या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर..

नळपाणी पुरवठा योजना चालविणे कठीण झालेले आहे. या सर्व नळपाणी पुरवठा योजनांचे नुतनीकरण करण्याकरिता ठोस उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच विजेच्या बिलाची 50 टक्के सबसिडी देण्यात यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 156, बाब क्रमांक 153 वर मी बोलू इच्छितो. सिंधुदुर्ग जिल्हयातील कणकवली तालुक्यातील उमरठ गावातील स्वजलधारेतील नळयोजनेचे उद्घाटन माननीय पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी इंटरनेटवरुन केले. पण त्या ठिकाणी असलेल्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी खोटी माहिती दिली. त्यामुळे ती नळ योजना सन 2003 सालापासून आजमितीस बंद, अर्धवट आणि अपूर्ण स्थितीत आहे. त्याकडे जिल्हा परिषदेचे आणि पाणीपुरवठा विभागाचे दुर्लक्ष आहे. तेव्हा या नळपाणी पुरवठा योजनेकडे लक्ष देण्यात यावे अशी मी विनंती करतो. कुरुंगवणे गावातील 20 लाख रुपये किंमतीची नळ योजना दोन वर्षापूर्वी पूर्ण झालेली असताना त्याठिकाणी या वर्षी टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी केली जात आहे. अशा प्रकारे वाया जाणाऱ्या पैशाकडे लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 72, बाब क्रमांक 61 वर मी बोलू इच्छितो. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या जलव्यवस्थापन समितीमध्ये जिल्हयातील अनेक नळ योजना तीन ते चार वर्षापासून अपूर्ण आहेत.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / अशिद्धीपत्रकी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

त्या नळ योजना अपूर्ण ठेवणाऱ्या समितीवर आणि ग्रामपंचायतींवर गुन्हे दाखल करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जाहीर केले परंतु प्रत्यक्षात अद्याप गुन्हे दाखल केलेले नाहीत. ते गुन्हे कधी दाखल करणार ? ते गुन्हे दाखल करुन त्या नळ योजना पूर्ण होणार आहेत का ? त्या नळ योजना पूर्ण करण्याकरिता आणि ग्रामीण भागातील लोकांना पाणी मिळण्याकरिता शासन काय ठोस उपाययोजना करणार आहे याची माहिती शासनाने द्यावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी पृष्ठ क्रमांक 72 वरील ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या बाब क्रमांक 61 बाबत बोलणार आहे. जिल्हा परिषदांच्या ज्या बऱ्याच प्रॉपर्टीज आहेत त्या काही खाजगी लोकांच्या नावावर आहेत. ही परिस्थिती महाराष्ट्रात सगळीकडे आहे. मी आपल्याला सिंधुदुर्ग जिल्ह्याचे उदाहरण सांगेन. लोकल बोर्डापासून या प्रॉपर्टीज लोकल बोर्डाच्या नावाने राहिल्या तसेच खाजगी लोकांच्या नावाने राहिल्या. यासाठी खास निधीची तरतूद करुन जिल्हा परिषदांच्या जेवढ्या प्रॉपर्टीज आहेत त्या सर्व जिल्हा परिषदांच्या नावे कशा होतील यासाठी संपूर्ण महाराष्ट्रासाठी खास कार्यक्रम तयार करावा. ज्या नवीन इमारती बांधतो, विहिरी बांधतो त्या बाबत बऱ्याच ठिकाणी कोर्टकेसेस झालेल्या आहेत. त्यामुळे ती कामे सुध्दा होत नाहीत. यासाठी खास निधी देऊन या सर्व प्रॉपर्टीज जिल्हा परिषदांच्या नावे करण्याचा शासनाने प्रयत्न करावा.

सभापती महोदय, संगमेश्वर पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांनी एक फतवा काढला की, तेराव्या वित्त आयोगाचे जे पैसे मिळतात त्यातून ते सांगतील त्याच ठिकाणाहून कॅमेरा, सिमेंटच्या रिकाम्या पिशव्या, संगणक, प्रिंटर्स इत्यादी घ्यावेत. अशा प्रकारचे फर्मान त्यांनी सर्व ग्रामपंचायतींना काढलेले आहे आणि त्याप्रमाणे ते सर्व साहित्य घेतले. ज्या कॅमेऱ्याची किंमत बाजारात 8 ते 9 हजार रुपये आहे तो कॅमेरा 19 हजार रुपयांना घेतला. ज्या रिकाम्या पिशव्या बंधारे बांधण्यासाठी लागतात त्याची बाजारात दोन रुपये किंमत असताना त्या पिशव्या 4 रुपये 20 पैसे दराने घेतलेल्या आहेत. जे प्रिंटर्स 30 हजार रुपये किमतीचे आहेत ते 45 हजार रुपये दराने घेतलेले आहेत. यामध्ये सरपंच आणि ग्रामसेवकांवर जबरदस्ती केलेली आहे. त्या गट विकास अधिकाऱ्याची चौकशी शासन करणार आहे का ?

सभापती महोदय, यानंतर मला गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 8 वरील बाब क्रमांक 6 बाबत बोलावयाचे आहे. 26/11 च्या घटनेनंतर बऱ्याच किनारपट्टीच्या ठिकाणी स्पीड बोटी देण्यात आल्या. परंतु सागरात जाण्यासाठी प्रशिक्षित असलेल्या पोलिसांची अजूनही त्या ठिकाणी तजवीज केलेली नाही. त्यांना लागणाऱ्या प्रशिक्षणाची व्यवस्था नाही. त्या बोटी रिपेअर करण्याची व्यवस्था नाही. ती व्यवस्था करण्याचा शासनाने प्रयत्न करावा. त्याचबरोबर या ज्या स्पीड बोटी समुद्रामध्ये फिरतात त्यामध्ये स्थानिक मच्छीमारांना त्रास देण्याचे काम काही पोलीस करतात. त्याचाही शासनाने विचार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली .....

करावा. ते मासे मागतात. पैसे मागतात. परवाच कर्नाटकातून एक शिष्टमंडळ आले होते. त्यांनी सांगितले की, आम्ही 10 वावच्या आत मासेमारीसाठी गेल्यानंतर हे लोक येतात, आमच्या बोटी थांबवितात, पैसे मागतात, पैसे दिले नाही तर जे काही मासे असतील ते घेऊन जातात. म्हणून या बाबत माननीय गृह मंत्र्यांनी विचार करुन जर पोलीस रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये अशा प्रकारचा त्रास देत असतील तर त्यांना समज देण्याची व्यवस्था करावी. गेले तीन-चार दिवस सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग येथील एक बातमी येत आहे. एका गरीब मुलीला फसवून गोव्याला नेऊन तिची चित्रफीत काढण्यात आली. त्यामध्ये जे कोणी दोषी असतील मग ते कोणत्याही राजकीय पक्षाचे असोत त्यांना शासनाने कडक शासन करावे. कारण ही प्रवृत्ती वाईट आहे. यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांना शासन करावे अशी मागणी मी या ठिकाणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 77 वरील बाब क्रमांक 68 बाबत बोलणार आहे. सध्या बीपीएलचे धान्य मिळते परंतु एपीएलचे पुरेसे धान्य प्रत्येक भागामध्ये जात नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये तीन महिन्याचे धान्य एकाच वेळी देण्याबाबत घोषणा केलेली आहे. यातील अडचण अशी आहे की, एपीएल आणि बीपीएलच्या बाबतीत आपले जे रेशन दुकानदार आहेत

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...

ते अंत्योदय योजनेचा माल किंवा बीपीएलचे रेशनिंग घरपोच कसे काय देऊ शकतील ? एक तर त्यांना रिबेट मिळत नाही. 25 वर्षांपासून त्यांना वाहतुकीचे दर वाढवून दिलेले नाहीत. जे दुकानदार धान्याची उचल करतील त्यांना वाहतुकीचे दर वाढवून दिले जाणार आहेत काय, या दुकानदारांनी घरपोच धान्य दिले तर त्यांना शासन अनुदान देणार आहे काय असा माझा प्रश्न आहे.

सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात गॅस एजन्सी अपूर्ण आहेत. त्यामुळे रॉकेलचा पुरेसा पुरवठा होत नाही. गॅस एजन्सीचे लोक मुजोर झाले असल्यामुळे त्यांची सक्षम यंत्रणेमार्फत चौकशी करावी अशी मी मागणी करतो.

यानंतर सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्र.75, पृष्ठ क्र.83 वर मी बोलणार आहे. आदरणीय मंत्री महोदय हे वैश्य समाजाचा ओबीसी मध्ये समावेश होण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. त्याबाबत 2-3 महिन्यात निर्णय लागेल. नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये सर्वसामान्य लोकांना त्रास सहन करावा लागला. काही लोक हायकोर्टात अपिलात गेल्यामुळे काही लोकांना निवडणूक लढण्याची संधी मिळाली आहे. याबाबत चौकशी केली असता जो मागासवर्गीय आयोग आहे त्यांच्याकडे पुरेशा प्रमाणात कर्मचारी वर्ग नाही. शासनाकडून मदत मिळत नाही अशी त्यांची तक्रार आहे. ओबीसी समाजातील लोक शिक्षणामध्ये मागे आहेत, त्यांच्यावर सातत्याने अन्याय होतो. त्यामुळे या समाजातील लोकांना ओबीसीमध्ये सामावून घेण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय असे मी विचारतो.

सभापती महोदय, जात पडताळणी प्रमाणपत्रासंबंधी या सभागृहात सातत्याने चर्चा होत असते. मंत्री महोदयांनी सभागृहाला आश्वासित केले होते की, संपूर्ण राज्यात जात पडताळणीची ऑन लाईन व्यवस्था करण्यात येईल. हे सांगून 2 वर्षे झाली आहेत. प्रत्यक्षात त्याची सुरुवात कधी पासून करणार आहे ते सांगावे. कारण या संदर्भातील तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत. माननीय सभापतींनी त्याची नोंद घेऊन जात पडताळणी प्रमाणपत्रांसंबंधी दीड तासाची चर्चा घेण्याचे मान्य केलेले आहे. या संदर्भात जातीनिशी लक्ष घालावे अशी विनंती करतो.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.राजन तेली....

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्र.150, पान क्र.155 या मागणीवर मी बोलणार आहे. मी काल सुध्दा बोललो आहे की, राष्ट्रीय पेय जल योजनेमध्ये राज्यातील 15 हजार वाड्यांचा समावेश केलेला आहे. जल स्वराज्य योजना, भारत निर्माण योजनेसाठी केंद्र सरकारकडून बराच पैसा राज्यात येतो. हा पैसा ग्रामपंचायतीपर्यंत जातो. पण तेथे टेंडर काढण्यासाठी यंत्रणा नाही किंवा तज्ज्ञ लोक नाहीत. त्यामुळे भारत निर्माण योजना असेल किंवा जल स्वराज्य योजना असेल या योजनांमधील जुनी कामे असतील ती पूर्ण झालेली नाहीत. त्यामध्ये बराच भ्रष्टाचार झालेला आहे. तेथील बऱ्याच ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, लोकल कमिटी अडचणीत आलेल्या आहेत. या सगळयाचा परिणाम गावातील पाणी पुरवठ्यावर झालेला आहे. म्हणून यासाठी काही तरी करण्याचा शासनाने विचार करावा. पाणी पुरवठ्यासंबंधी ग्रामीण पाणी पुरवठा योजना असेल किंवा एमजेपी असेल या सगळया योजना एकत्रित करुन सगळयांना चांगले पाणी कसे मिळेल व ज्या नादुरुस्त झालेल्या योजना आहेत त्या सुरु कशा होतील यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. युतीच्या काळात 15-15 किंवा 18-18 गावांसाठी मोठया योजना केल्या होत्या. आमच्या 22 गावांसाठी विजयदुर्गची योजना केली होती. पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषद सांभाळू शकत नाही म्हणून पूर्वी विशेष दुरुस्ती निधी जिल्हा परिषदेला दिला जात होता. शासनाने तो बंद केलेला आहे. हा निधी पुन्हा जिल्हा परिषदेला देण्यात यावा अशी विनंती करतो.

आदिवासी विकास विभागाच्या बाब क्र.124, पान क्र.131 वर बोलतो. आमच्या जिल्ह्यात ठाकर समाज आहे. त्या समाजाने त्यांचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याची शासनाकडे मागणी केलेली आहे. त्यासाठी त्यांनी सर्व पुरावे व दाखले दिलेले आहेत. काही लोक कोर्टामध्ये गेले होते. पण दुर्दैवाने सरकारी अधिकाऱ्यांचे असे म्हणणे आहे की, हे लोक लंगोटी लावून कोठे फिरतात ? ते लोक 100 टक्के साक्षर आहेत. 7 ते 10 हजाराची छोटी वस्ती आहे. या लोकांना एस.टी.चा दाखला मिळाला पाहिजे. 35 वर्षांपूर्वी डॉ.गंगावणे यांना मिळाला होता. तो दाखला त्यांना मिळाला तर काही जण शिक्षक होऊ शकतील, जिल्हा परिषद किंवा शासकीय नोकरीत लागू शकतील.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धित प्रत / प्रतिक्षाधीन नाही

श्री. राजन तेली...

त्या गरीब समाजाला न्याय मिळेल. म्हणून त्या ठाकर समाजाचा एस.टी.मध्ये समावेश करावा अशी मी मागणी करतो आणि मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल सभापती महोदय, आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय सन 2011-2012च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी केवळ 4-5 बाबीवरच बोलणार आहे. गृह विभागाच्या पान क्रमांक 8 वरील बाब क्रमांक 7 संबंधी बोलत असताना मी गृह विभागाच्या मंत्री महोदयांना विनंती करतो की, पोलीस स्टेशन मधील टेलिफोनची बिले भरण्याची व्यवस्था आधी करावी. टेलिफोनची बिले न भरल्यामुळे पोलीस स्टेशनमधील टेलिफोन बंद पडलेले आहेत. जेव्हा डोंबिवलीमध्ये दरोडा पडला त्यावेळी पोलीस स्टेशनमधील टेलिफोन बंद असल्यामुळे दरोड्याची माहिती पोलिसांना मिळू शकली नाही. जनतेचा नेहमी पोलीस स्टेशनशी संबंध येत असतो. तेव्हा यापुढे एकाही पोलीस स्टेशनमधील टेलिफोनचे बिल थकीत राहून टेलिफोन बंद राहाणार नाही याची दक्षता मंत्री महोदयांनी घ्यावी.

सभापती महोदय, आज गुन्हेगारांकडे चांगल्या प्रकारची वाहने आणि आधुनिक शस्त्रास्त्रे असतात.पोलीस दलाकडे आधुनिक शस्त्रास्त्रे आणि वाहने असली तर गुन्ह्याचा तपास चांगल्या त-हेने लागू शकेल. दुसरे असे की, कमीत कमी गुन्हे नोंदविण्याची स्पर्धा राज्यातील पोलीस स्टेशनमध्ये लागली आहे की काय असे वाटायला लागले आहे. कारण सर्वसामान्य माणसे आमच्याकडे येऊन सांगतात की, पोलीस स्टेशनवर तक्रार घेतली जात नाही आणि घेतली तर गुन्हा दाखल केला जात नाही. माझ्या पोलीस स्टेशनमध्ये कमीत कमी तक्रारी असाव्यात असा प्रयत्न तेथील पोलीस अधिकारी करीत असतो. तेव्हा या मनोवृत्तीमध्ये सुधारणा होण्याची गरज आहे.

सभापती महोदय, राजकारणाचे गुन्हेगारीकरण कसे होत आहे याबाबतीत ठाणे जिल्ह्यातील अनेक उदाहरणे आपल्याला देता येतील. ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये निवडून आलेला तडीपार आणि वॉण्टेड असलेला एक नगरसेवक कोकण आयुक्तांना आपले सर्टिफिकेट देऊन येतो आणि त्याचा पोलिसांना पत्ताही लागत नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. ज्याच्यावर अनेक गुन्हे आहेत, जो तडीपार आहे अशी व्यक्ती महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये निवडून येते, मतदानामध्ये भाग घेते आणि तरी देखील पोलीस त्या व्यक्तीला अटक करु शकत नाही, यावरुन राजकारणाचे गुन्हेगारीकरण कसे झालेले आहे हे दिसून येते. उल्हासनगरमध्ये आंतरराष्ट्रीय

श्री. संजय केळकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बेटिंगचा किंग असलेला अनिल जयसिंघानी याच्यावर अनेक गुन्ह्यांची नोंद असून त्याच्यावर कोणतीही कारवाई केली जात नाही. तेव्हा पोलिसांच्या कामामध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, काही पोलिसांनी आजारपणाला कंटाळून, त्यांच्या विविध समस्यांना कंटाळून आत्महत्या केल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून येत असतात. पोलिसांवर कामाचा प्रचंड ताण असतो. त्यांना आठवड्यातून नाही तर महिन्यातून देखील एखादी सुट्टी मिळत नाही. पोलिसांची संख्या खूप अपुरी आहे. त्यांच्या कामाचे तास निश्चित नाहीत. पोलिसांची संख्या वाढविली आणि त्यांचे कामाचे तास निश्चित केले तर त्यांच्या कार्यक्षमतेमध्ये निश्चितच वाढ होईल. तेव्हा त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत अशी मी शासनाला विनंती करतो.

पृ.क्र.10 वरील बाब क्रमांक 12 मध्ये होमगार्डना कर्तव्य भत्त्याची प्रलंबित देयके प्रदान करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. होमगार्ड ही एक इफेक्टिव्ह सेवा गृह खात्याकडे आहे. होमगार्ड आणि त्यांचे नागरी संरक्षण दल हे गृहखात्याच्या मदतीला असतात. जेव्हा महापूर येतो, नैसर्गिक आपत्ती ओढवते, मोठा अपघात होतो अशा वेळी होमगार्ड, सिव्हिल डिफेन्स यांचा उपयोग होतो.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

माझी या निमित्ताने राज्य शासनाकडे मागणी आहे की, नागरी संरक्षण दलाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील ठाणे आणि कोकण विभाग आहेत असे शासनाने जाहीर केलेले आहे. त्यासाठी केंद्र शासनाची मदत देखील राज्य शासनास प्राप्त झालेली आहे. ठाणे जिल्हयात होमगार्डचा चीफ कमांडर राज्य शासनाने नेमलेला नाही. नागरी संरक्षण दलाच्या भत्त्यांमध्ये वाढ करण्याची गरज आहे. माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे की, पोलीस दलाचे काम हलके करण्यासाठी होमगार्ड आणि सिव्हील डिफेन्स ही दोन्ही खाती अतिशय इफेक्टीवली काम करु शकतात. नागरिकांमधून स्वयंसेवक निर्माण करुन ते या ठिकाणी काम करु शकतात. होमगार्डला दिला जातो तेवढा भत्ता नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांना देण्यात यावा. होमगार्ड यांना जे काम दिले जाते, तेच काम नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांना दिले जाते. नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांना होमगार्डला जो भत्ता दिला जातो, तेवढा भत्ता दिला गेला तर अनेक तरुण नागरी संरक्षण दलात स्वयंसेवक म्हणून पुढे येतील. पर्यायाने नागरिकांमध्ये शांततेचे वातावरण देखील निर्माण होण्यास मदत होईल. तसेच नैसर्गिक आपत्तीस तोंड देण्यासाठी या दलाचा निश्चितपणे उपयोग होईल. म्हणून माझी मागणी आहे की, नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांच्या भत्त्यामध्ये वाढ व्हावी व त्यांना वेळेवर भत्ता देण्यात यावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 28, पान क्रमांक 27 ही कृषी विभागाची मागणी आहे. डॉ.बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ,दापोली यांना सहाय्यक अनुदान,निवृत्ती योजनेवरील खर्च व सहावा वेतन आयोगासाठी अनुदान देण्या बरोबरच सदर विद्यापीठाच्या उद्यान विद्याची काढणी नंतरचे तंत्रज्ञान या विषयावरील पदवी, पदविका अभ्यासक्रमासाठी राज्य शासनाने 2000 या वर्षी मान्यता दिलेली आहे. त्यासाठी केंद्र शासनाच्या हिश्यांच्या रक्कमेपैकी 25 लाख रुपयांची तरतूद विद्यापीठास मिळालेली आहे. केंद्र शासनाची उर्वरित 25 लाख व राज्य शासनाचे 47 कोटी रुपये अद्याप या कृषी विद्यापीठास उपलब्ध झालेले नाहीत. अभ्यासक्रमाला मान्यता देऊन 12 वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे. शासन स्तरावर निधीची मान्यता मिळालेली नाही, त्यामुळे त्या विद्यापीठास निधी उपलब्ध झालेला नाही. या निधीस शासनाने तत्काळ मान्यता द्यावी व तो निधी कृषी विद्यापीठास उपलब्ध करुन द्यावा अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

सभापती महोदय, बाब क्रमांक 125, पान क्रमांक 131 ही आदिवासी विकास विभागाची मागणी आहे. आदिवासी विकास विभागाच्या बाबतीत कितीही बोलले तरी ते कमीच होईल. माझ्या म्हणण्याशी सन्माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.बबनराव पाचपुते हे सहमत असतील. या विभागाच्या बाबतीत किती बोलणार, काय बोलणार हा आमच्या समोर प्रश्न निर्माण झालेला आहे. आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणारे जेवण निकृष्ट देण्यात येत असल्याबाबत, विद्यार्थ्यांच्या गणवेशाच्या बाबत, आश्रमशाळेतील स्वच्छते बाबत या सभागृहात नेहमी चर्चा होत असते. विद्यार्थ्यांच्या आहारासाठी पुरविण्यात येणारे धान्य, तसेच साहित्य दिले जाते, त्यांचा दर्जा कशा पध्दतीचा असतो हे सर्वांना समजावे म्हणून त्या वस्तू मागील अधिवेशनात सभागृहात आणून दाखविल्या होत्या. या विभागातील अधिकारी मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करीत आहेत. शासनाकडून आदिवासींच्या विकासाकरिता, आदिवासी विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळांकरिता मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो, परंतु तो निधी खालच्या स्तरापर्यंत जात नाही. तो निधी अधिकाऱ्यांकडून मधल्या मध्ये वापरला जातो. ज्या अधिकाऱ्यांकडून आदिवासींच्या विकासासाठी दिलेला निधी दुसरीकडे वापरतात, त्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई केली पाहिजे.

महोदय,या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी श्री.चंदनशिवे यांचे उदाहरण दिले. ठाणे येथे श्री.खाटीक आडनावाचे प्रकल्प अधिकारी आहेत. त्या प्रकल्प अधिकाऱ्यांची अनियमततेच्या बाबतीत अनेक वेळा चौकशी झालेली आहे. त्यांना दोषी देखील ठरविण्यात आले आहे. परंतु त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई शासनाकडून केली जात नाही. या प्रकल्प अधिकाऱ्याच्या बाबतीत मी तारांकित प्रश्न विचारला होता, शासनाकडून मला लेखी उत्तर प्राप्त झाले आहे, त्यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, त्यांची चौकशी पूर्ण झाली असून चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. त्यांचे विरुध्द लवकरच कारवाई करण्यात येईल. परंतु अद्याप त्यांचे विरुध्द कारवाई केली गेली नाही. ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे विरुध्द कारवाई केली जाणार आहे काय ? या विभागात भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यां विरुध्द कडक

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 02.50 श्री.संजय केळकर...

कारवाई केली तर निदान खालच्या स्तरापर्यंत निधी पोहचेल आणि विकास कामे होतील. तसेच खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांमध्ये एक प्रकारचा धाक निर्माण होईल. म्हणून अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो. सभापती महोदय, आपण मला पुरवणी मागण्यांवर बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे पुरवणी मागण्यांवरील मनोगत पूर्ण करतो.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, खर्चाचे पूरक विवरणपत्र 2011-2012 यातील काही बाबींवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-80 वर आम आदमी विमा योजनेचा उल्लेख केला आहे. फॉर्म भरला नसेल, अर्ज भरला नसेल तर पैसे मिळत नाहीत. ऑटोमॅटिक इन्शुरन्स म्हणून या योजनेकडे बघितले पाहिजे. ज्याच्याकडे आधार कार्ड आहे आणि पंचनामा उपलब्ध आहे त्याला निधी मिळाला पाहिजे. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, ही गरिबांना आधार देणारी योजना आहे, तेव्हा शासनाच्या माध्यमातून प्रयत्न होतात, ग्रामसेवक वा तलाठी जाऊन फॉर्म भरतात, विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते देखील गावामध्ये जाऊन फॉर्म भरतात. तरी देखील फॉर्म भरला नाही, सही केलेली नाही म्हणून निधी मिळत नाही याचा शासनाने विचार करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक-74, पृष्ठ क्रमांक-86. सभागृहात उपस्थित असलेले माननीय गृहमंत्री व माननीय ग्रामविकास मंत्री हे सांगली जिल्हयाचे आहेत. पूर, चक्रीवादळामुळे बाधित झालेल्या अनुसूचित कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी पूरक मागणी सादर केली आहे. 2005 मध्ये म्हणजे 7 वर्षापूर्वी चक्रीवादळ झाले होते. आता 7 वर्षानंतर 1.44 कोटी रुपयांची पूरक मागणी सादर केली आहे. हा निधी अगोदर दिला गेला आहे का? 5 वर्षे पुरवणी अर्थसंकल्प किंवा एक्सेस एक्स्पेंडिचरमध्ये ही मागणी का समाविष्ट झाली नाही? तांत्रिक बाब असली तरी शासनाने या बाबीकडे लक्ष देण्यासाठी मी हा मुद्दा उपस्थित करीत आहे. माझी शासनाला विनंती आहे की, नैसर्गिक आपत्ती निवारण निधी उभा केला पाहिजे. प्रत्येक वेळेला नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या कुटुंबांना आर्थिक सहाय्य मिळायला दोन-दोन वर्षे विलंब होतो. नॅचरल कॅलॅमिटी रिलिफ फंड किंवा जे योग्य असेल ते नाव देऊन एक फंड निर्माण करण्यात यावा. आपली विमा योजना परफेक्ट नाही. त्यासाठी निधी उभा करण्याच्या दृष्टीने शासनाने विचार करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाच्या संदर्भातील प्रश्न सभागृहात चर्चेला आला होता. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्या विषयावर आपले विचार मांडले होते. आणखी जास्त मागणी केली तरी हरकत नाही. परंतु या ऊसतोड कामगारांच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

मुलांच्या शिक्षणासाठी निधी दिला पाहिजे. एक पीस मील एफर्ट म्हणता येईल, त्यासाठी जरुर निधी दिला पाहिजे. काही सन्माननीय सदस्यांनी या विषयावर एक तासाची चर्चा घ्यावी अशी मागणी केली होती. ही पूरक मागणी मंजूर करण्यास हरकत नाही. परंतु या संदर्भातील धोरण शासनाने निश्चित करावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, गृहखात्याची बाब क्रमांक-11, पृष्ठ क्रमांक-9. नक्षल विभागातील सुरक्षाविषयक खर्चाची ही पूरक मागणी आहे. 834 नवीन जवानांची नियुक्ती करावयाची आहे. यासाठी 1.08 कोटी रुपयांची मागणी सादर केली आहे. या खर्चामध्ये 20 टक्के राज्य शासनाचा हिस्सा असणार आहे. ही रक्कम अतिशय अपुरी आहे असे मला वाटते. त्या भागात काम करणारे जे जवान आहेत त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध करुन दिली पाहिजे. जळगाव जिल्हयातील एक जवान 3-4 महिन्यापूर्वी शहीद झाला. शासनाकडून त्यांच्या वारसांना आर्थिक मदत दिली जाते. परंतु जवानांच्या सुरक्षेच्या दृष्टीने त्यांना चांगल्या दर्जाची वाहने, अत्याधुनिक हत्यारे पुरविली पाहिजेत. ही विशेष जवान नियुक्त करण्याची बाब अभिनंदनीय आहे. परंतु 1.08 कोटी रुपयांमध्ये किती काम होणार याबद्दल साशंकता वाटते. गृहमंत्र्यांनी जादा निधी उपलब्ध करुन द्यावा आणि जवानांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून कार्यवाही करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक-10 वर होमगार्डना कर्तव्य भत्ता देण्यासाठी 30.01 कोटी रुपयांची पूरक मागणी सादर केली आहे. कर्तव्य भत्त्याची रक्कम कशी वाढली हे कळून येत नाही. प्रशिक्षित होमगार्ड, पोलिसांना मदत करणारे होमगार्ड, महाराष्ट्राला मदत करणारे होमगार्ड यांना पोलीस भरतीमध्ये 2 ते 3 टक्के आरक्षण ठेवण्यात येते अशी माझी माहिती आहे. त्यांना जास्तीत जास्त सुविधा देण्याबाबत विचार करावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीत प्रत/ अशुद्धीशाही नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, बाब क्र. 79, पृ.क्र. 84- सामाजिक न्याय, विमुक्त जाती भटक्या जमाती, ओबीसी मधील ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी स्वयंसेवी संस्थांनी शाळा चालविण्यासाठी ही तरतूद केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी आताच उल्लेख केलेला आहे. विशेष म्हणजे सामाजिक न्याय विभागाकडूनच आम्ही ही अपेक्षा ठेवू शकतो. सभागृहात सन्माननीय सदस्य वारंवार चर्चा घडवून आणतात तसेच शिक्षण विभागाकडून किती जरी अपेक्षा ठेवली तरी प्रत्यक्षात प्रत्येक मुलाची काळजी घेणे, ट्रॅकिंग वगैरे करणे तसेच ही मुले कोणकोणत्या जिल्ह्यात कोठे गेली यासंबंधीची माहिती किंवा मोजदाद करणारी यंत्रणाच आपल्याकडे नाही, त्यामुळे ज्या शाळा चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना शासनाने निधी दिलेला आहे तो स्वागतार्ह आहे पण तो निधी या स्वयंसेवी संस्थांवर किंवा आपल्या विभागावर खर्च होणे गरजेचे आहे. कारण बरीचशी मुले शाळेत किंवा आई-वडिलांबरोबर न जाता कुठे तरी नातेवाईकांकडे गेली असल्याची उत्तरे आम्हाला मिळाली. असे म्हटल्यावर त्यांची शाळा चालू आहे की थांबल्या, चालू असेल तर शिक्षणाचा दर्जा काय अशा कामांसाठी या स्वयंसेवी संस्थांना एक लॉंग टर्म कार्यक्रम सुध्दा दिला गेला पाहिजे. सामाजिक न्याय खात्याचा अभ्यास करीत असताना आम्हाला नेहमीच आश्चर्य वाटत असते की, आंतरजातीय विवाहावरुन समाजात वाद होत असतात, तर कधी कधी हत्या व आत्महत्या सुध्दा होत आहे., यासंदर्भात सामाजिक न्याय विभागाची भूमिका काय आहे, त्यासाठी एखादी चौकशी समिती वगैरे गृह विभागामार्फत माननीय मुख्यमंत्री महोदय नेमण्याची गरज आहे काय असाही प्रश्न निर्माण होतो. माझी मागणी अशी आहे की, अशा प्रकारे ज्या आत्महत्या व हत्या होतांना दिसत आहेत त्यांच्या नियंत्रणा संबंधीचा कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे.

महोदय, रोजगार हमी योजना, बाब क्र. 81 आणि पृ.क्र. 95 च्या संदर्भात जी तरतूद करण्यात आली परंतु ती महाराष्ट्र रोजगार हमी योजनेसाठी जरी ही तरतूद केलेली असली तरी महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेच्या संदर्भात विधिमंडळाच्या पंचायती राज समितीने ज्या अनेक सूचना केल्या आहेत आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचे काम होत नाही. दोन्ही सभागृहांच्या माध्यमातून वारंवार सभागृहाचे लक्ष वेधण्यात येत आहे, अनेक प्रश्नांसंबंधीची माहिती आमच्याकडे असते. रोजगार हमी योजनेच्या कामांवर मजूर उपलब्ध नसतात, सिल्लोड तालुक्यात मजुरी

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

मिळत नाही पण कामाची मागणी असता कामेही निघत नाहीत तसेच दोन तीन आठवडे कामे बंद असतात म्हणून मजूर दुसरीकडे स्थलांतर करतात अशा अनेक घटना पहायला मिळतात म्हणून ही तरतूद केल्यावर त्याचा फायदा कसा होतो याबद्दलची काळजी घेणे आवश्यक आहे.

महोदय, पृ.क्र.77, बाब क्र. 68-अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अनुषंगाने मला सभागृहाच्या निदर्शनास आणावयाचे आहे की, रेल्वे स्थानके, विशेष करुन सोलापूर, हडपसर सारख्या ठिकाणी ट्रान्झिटमध्ये अन्न धान्याचा साठा होतो तेव्हा बऱ्याच वेळा विभागाकडून दुर्लक्ष होत असल्यामुळे ते अन्न धान्य पावसात भिजत पडलेले दिसते. बऱ्याच वेळेला हद्दीचा वाद निर्माण होतो. आपण सर्व विधिमंडळात येत असताना मुंबई गोदीतून देखील कित्येक टन धान्य उघड्यावर पडल्याचे दिसून येते, त्याची दखल कोणीच घेत नाही. म्हणून यासंदर्भात जेथे जेथे असे बेवारस धान्य पडलेले दिसेल त्याकडे लक्ष घालणारी यंत्रणा अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे नाही. तसेच कोणतीही हेल्पलाईन सुध्दा नव्हती पण आता ती निर्माण करण्यात आली. ग्राहक संरक्षण विभागाने तर ग्राहकांच्या संरक्षणाबाबत पूर्णपणे हरताळच फासलेला दिसून येतो. विशेषत: दररोज दुपारी टी.व्ही. चॅनेल्स व वर्तमान पत्रातून अर्ध्या तासाच्या जाहिराती सलग दाखविल्या जातात. त्यात असाध्य रोग, मधुमेह, टक्कल पडणे अशा आजारांवर खात्रीलायक औषधे मिळतील अशा स्वरुपाच्या त्या जाहिराती स्पॉन्सरमार्फत दाखविल्या जातात. वर्तमान पत्र उघडून बघितल्यानंतर दोन-दोन पाने या जाहिरातीचीच दिसतात. त्यातही असाध्य रोगांपासून मुक्ती वगैरे सांगितलेले असते. अशा बाबतीत ग्राहक संरक्षण विभागाने एखाद्या जाहिरातीचा संदर्भ घेऊन खरोखरच जाहिरात आहे की, पैसे कमाविण्यासाठीचे प्रयत्न आहेत याची शहानिशा करुन पाठपुरावा केला आहे काय, याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. तसेच ग्राहक संरक्षण विभागाचा निधी अशा कामावर खर्च झाला पाहिजे, अन्यथा ग्राहकांच्या संरक्षणांच्या नावाने शासन काय करते हा प्रश्न नव्याने उपस्थित होऊ शकतो.

ग्राम विकास विभाग, बाब क्र. 63, पृ.क्र., पृ.क्र. 72 या मागणीच्या अनुषंगाने मला सांगायचे आहे की, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या खर्चाची ही तरतूद केलेली आहे. याबाबतीत खेदाने नमूद करावेसे वाटते की, ज्याप्रमाणे विधानसभा निवडणुकीच्या वेळेस मतदान यंत्रणा, इव्हीएम मशिन्स आणि सीसीटीव्हीची सोय मतदानाच्या वेळेस प्रत्यक्ष असते.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

पण मतदान झाल्यानंतर मत पेट्या ज्या गोडावून मध्ये ठेवलेल्या असतात तेथे मात्र ही सोय नसते. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली असता त्यांनी सांगितले होते आम्हाला या खर्चासंबंधीची तरतूद नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ....

आणि म्हणून अनेक ठिकाणी इव्हीएम मशिन्स गोडाऊन मध्ये अतिशय वाईट अवस्थेत पडलेली होती. ग्रामविकास विभागाची सुध्दा जबाबदारी होती की, विधानसभा निवडणूकी प्रमाणे त्यानी इव्हीएम मशिन्सची सीसीटीव्हीच्या मार्फत निगरानी करुन ही मशिन्स सुरक्षित कशी राहतील हे पाहणे गरजेचे होते याकडेही मला लक्ष वेधावेसे वाटते.

सभापती महोदय, आपण विक्रेंदित पंचायत राजचा नेहमी उल्लेख करीत असतो. स्व.यशवंतराव चव्हाण यांचा आदर व्यक्त करण्यासाठी आपण त्यांच्या नावाने हे वर्ष साजरे करीत आहोत. ग्रामविकास मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. माझ्या माहिती प्रमाणे जिल्हा परिषदेमध्ये विरोधी पक्ष नेते पद नाही. त्यामुळे प्रत्येक जिल्हा परिषदेत विरोधी पक्ष नेते पद असण्याची आवश्यकता आहे. सत्ताधारी पक्ष सुध्दा अनेक ठिकाणच्या जिल्हा परिषदेमध्ये विरोधी पक्षात आहे. विरोधी पक्ष नेते पद हे या पक्षाचे किंवा त्या पक्षाचे असा प्रश्न नाही. जिल्हा परिषदांची व्यवस्था चांगल्या प्रकारे राबवावी या दृष्टिकोनातून यासंदर्भात विचार करावा अशी विनंती करते.

सभापती महोदय, मी आता गृह विभागाच्या बाब क्रमांक 15, पृष्ठ क्रमांक 11 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. बंदिस्त जलवाहिन्यांच्या विरोधात जे लोक लढा देत होते त्यासंदर्भात चौकशी समिती नेमली गेली. या चौकशी समितीचे कामकाज सुरु होण्यासाठी एवढा विलंब का झालेला आहे यासंदर्भात उच्च न्यायालयाने आजच विचारणा केलेली आहे. आमच्या माहिती प्रमाणे जे जे आंदोलक होते त्यांना जर माहिती देण्यासाठी समिती समोर जावयाचे असेल तर त्यांनाच पोलीस अटकाव करतात व त्यामुळेच लोक माहिती देण्यासाठी समिती समोर जात नाहीत. ज्यावेळेला अशा अन्यायाच्या संदर्भात चौकशा समित्या नेमल्या जातात त्यावेळेला स्वत: गृहविभागाच्या संदर्भात माझ्याकडे अप्पर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य यांच्या अनेक गैरप्रकाराच्या संदर्भातील माहिती आलेली आहे. त्यांच्या संदर्भात ज्या तक्रारी आहेत त्यातील केवळ पाचच तक्रारी सभागृहापुढे मांडते.

सभापती महोदय, कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य यांच्या दिमतीला 40 कर्मचारी खाजगी सेवेसाठी असून त्यातील काही पोलीस त्यांच्या फार्म हाऊसवर मजूर म्हणून काम करतात, त्यांच्याकडे असलेल्या दोन-दोन, तीन-गाडयांवर पोलीस कर्मचारी काम करीत आहेत, काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ....

पोलीस त्यांच्या बाणेरच्या घरावर काम करीत आहेत, तर काही पोलीस त्यांच्या वरळी येथील घरी काम करीत आहेत. येरवडा जेलमधील कर्मचा-यांनी लेखणी बंद आंदोलन सुरु केले असून त्यांचे म्हणणे असे आहे की, कार्यालयाची वेळ सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.45 असतांना कारागृह महानिरीक्षक सायंकाळी 5.45 वाजता कार्यालयात येतात. 5.45 वाजता कार्यालयात आल्यानंतर महिला कर्मचा-यांना तसेच इतरांना 15 ते 20 कि.मी. अंतरावरील येरवडयामधून बाणेरच्या घरी बोलवतात. त्याच बरोबर अनेक वेळेला 15-15 दिवस फाईल्स तशाच पडल्यामुळे या कर्मचाऱ्यांना मानसिक दबावाखाली काम करावे लागत आहे. सगळयात भयंकर गोष्ट म्हणजे कारागृह सुरक्षेसाठी असलेले हत्यारी गार्ड व जेलर हे कारागृहात असले पाहिजे परंतु हे अधिकारी या कर्मचाऱ्यांना स्वत:च्या कामासाठी वापरत आहेत. या ठिकाणच्या महिलांना उशिरापर्यंत थांबवून ठेवणे, काम सांगतो असे सांगावयाचे परंतु प्रत्यक्षात स्वत: 5.00 वाजता कार्यालयात हजर व्हावयाचे व त्यानंतर त्यांना सांगावयाचे की, आता काम संपल्यानंतर घरी जा. कर्मचा-यांना घरी जाण्यासाठी रात्रीचे 10.30-11.00 वाजवावयाचे असे काम हे अधिकारी करीत आहेत. त्यांची संपत्ती किती आहे यासंदर्भात चौकशी झाली पाहिजे. त्याच बरोबर मी असे म्हणेन की, कारागृहासारख्या ठिकाणी कर्मचा-यांनी लेखणी बंद आंदोलन चालवले असेल तर ते योग्य नाही. कारागृहात काम करणा-या महिलांनी निदर्शने देखील केली होती. पोलीस विभागात काम करणा-या कर्मचा-यांनी किंवा महिला पोलिसानी आत्महत्या करण्याच्या अगोदर या कारागृहाचे काम बघणारे अप्पर महासंचालक श्री. प्रकाश पवार त्यांच्यावर विभागाने कडक कारवाई करावी अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.धन्यवाद.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी पहिल्यांदा गृह विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे.

मी गृह विभागाच्या पान क्र.8 वरील बाब क्रमांक 6 वर बोलणार आहे. पोलीस दलाच्या गुप्त सेवांकरिता तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद करीत असताना मला शासनाचे लक्ष पुणे शहराकडे वेधावयाचे आहे. अतिशय सुरक्षित शहर म्हणून एकेकाळी पुणे शहराचा लौकिक होता. परंतु, जर्मन बेकरी बॉम्बस्फोट झाल्यानंतर पुणे शहर देखील सुरक्षित नाही हे आपणा सर्वांच्या लक्षात आले आहे. कोरेगाव पार्क येथे बॉम्बस्फोट झाला होतो. तेथे पोलीस ठाणे असले पाहिजे अशी कल्पना पुढे आली होती. तेथे पोलीस ठाणे व्हावे म्हणून मी पाठपुरावा करीत आहे. दोन वर्ष झ ाली तरी पोलीस ठाणे पूर्ण झालेले नाही. येथे पोलीस ठाणे होण्यासाठी मी देखील आमदार निधीतून पैसे दिलेले आहेत. पण हा निधी पुरेसा नाही. निधी अभावी हे पोलीस ठाणे होऊ शकत नाही, ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. पोलीस ठाणे हा अतिशय महत्वाचा विषय आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार केला तर सर्वात प्रथम पोलीस ठाण्याचा विचार झाला पाहिजे. त्याचप्रमाणे पुण्यामध्ये साखळी चोराच्या गुन्ह्यांमध्ये देखील फार मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. पुण्यात आय.टी.क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर आहे. गेल्या काही वर्षापासून आपण पहात आहोत की, त्यांच्यावर हल्ला करण्याचे गुन्हे देखील वाढत आहेत. त्यांच्यावर बलात्कार करण्यात येत आहे. त्यांना पळवून नेऊन खून करण्यात येत आहे. नुकताच परवा एका खून खटल्याचा निकाल लागला आहे. त्यामुळे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, पोलिसांच्या गस्ती वाहनांची संख्या आपण वाढविली पाहिजे. जेणे करून अशा गुन्ह्यांना आळा बसेल.

यानंतर मी पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाच्या पान क्र.155 वरील बाब क्रमांक 153 वर बोलणार आहे. महाराष्ट्रामध्ये शहरांची मोठ्या झपाट्याने वाढ होत आहे. त्याप्रमाणात नागरी सुविधांचा अभाव आहे. आगामी काळामध्ये प्रामुख्याने पाणी हा विषय फार महत्त्वाचा असेल. पाण्याचे योग्य नियोजन नसेल, पाण्याची गळती रोखली नाही तर पाण्याची कमतरता भासेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी .....

तसेच किमान समान पाणी वाटपाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवणे गरजेचे होणार आहे. ह्या फार महत्त्वाच्या गोष्टी आहेत. आताच मार्च महिना सुरू झालेला आहे. आतापासूनच पाण्याची ओरड पुण्यामध्ये सुरू झालेली आहे. काही ठिकाणी 24 तास पाणी आहे, तर काही ठिकाणी अजिबात पाणी नाही. त्यामुळे पाण्याचे नियोजन देखील व्यवस्थित झाले पाहिजे.

मुंबई शहरासाठी पिण्याच्या पाण्यासाठी वेगळे धरण आहे. त्या धर्तीवर पुणे शहरासाठी पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र धरण असावे अशी मी मागणी करीत आहे. सरकारचे धोरण असे आहे की, प्रथम पिण्यासाठी पाणी त्यानंतर उद्योगासाठी आणि नंतर शेतीसाठी पाणी. पुण्यात वरसगाव धरण आहे. खडकवासला धरण आहे. टेमघर धरण आहे. यातील पाणी पिण्यासाठी आणि शेतीससाठी दिले जाते. शेतीला पाणी देणे देखील अतिशय आवश्यक आहे. कारण शेती हा अतिशय आवश्यक घटक आहे. त्यामुळे शेतीला पाणी दिलेच पाहिजे. त्या बद्दल दुमत असण्याचे कारण नाही. आज पुणे शहराची लोकसंख्या 40 लाख आहे. 25 लाख लोकसंख्या पिंपरी-चिंचवडची आहे. ही शहरे झपाट्याने वाढत असल्यामुळे पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. यासाठी रेन वॉटर हार्वेस्टींग अनिवार्य केले तर हा सुद्धा एक मार्ग होऊ शकतो, याकडे देखील मी आपले लक्ष वेधू इच्छिते.

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या पान क्र.83 वरील बाब क्रमांक 76 कडे आपले लक्ष वेधू इच्छिते. मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी अंदापत्रकात करण्यात आलेली तरतूद ही अतिशय अपुरी असल्याचे आढळून आली आहे. ओबीसींना शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची मर्यादा रूपये एक लाखा पर्यंत आहे. पण निधी अभावी अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तसेच ओ.बी.सी.यांच्या स्कॉलरशीपसाठी उत्पन्नाची मर्यादा 1 लाख रुपये आहे, परंतु निधीअभावी अनेक विद्यार्थ्यांना ही स्कॉलरशीप मिळालेली नाही. त्याचप्रमाणे ओ.बी.सी.च्या गरीब विद्यार्थ्यांसाठी इंजिनिअरींग, मेडिकलची 50 टक्के फी भरली जाते. परंतु यावर्षी सदरहू फी भरण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे् नॉन क्रिमिलेअरसाठी सध्याची वार्षिक उत्पन्न मर्यादा चार लाख पन्नास हजार रुपये आहे, ती वाढवून 10 लाख रुपये करण्यात यावी. तसेच ओ.बी.सी.वित्त व विकास महामंडळाला निधी वाढवून देण्यात यावा आणि तो निधी लोकसंख्येच्या प्रमाणात असावा. याकरता किमान 500 कोटी रुपयांचा निधी ओ.बी.सी.साठी आणि वित्त आणि विकास महामंडळाला द्यावा अशा प्रकारची मागणी मी यानिमित्ताने करीत आहे. धन्यवाद.

. . . .2 झ्ेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पशा पटेल (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, बाब क्र.7, पान क्र.8 हा विषय गृह विभागाशी संबंधित आहे. विषय असा आहे की, खसखशीचे पीक आहे, ते सांगली, पुणे आणि बीड मध्ये लावले गेले आहे म्हणजे जे मोठमोठे जिल्हे आहेत तेथे सगळ्या ठिकाणी लावण्यात आले.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : तेथे मोठे नेते आहेत. त्यांनी नगरचे पहिले नाव घेतले.

श्री.सय्यद पाशा पटेल : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब, आपण तसे समजा.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : त्यांनी नगरचे प्रथम नाव घेतले. नगर नंबर 1 आहे.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये खसखशीचे पीक लावण्यात आले आणि यामध्ये गृह विभाग 100 टक्के अपयशी ठरलेला आहे असे लोक म्हणतात, मी नाही.

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : याबाबतीत तुमचे काय मत आहे ?

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, मी सांगतो.

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : तुमचे मत चांगले आहे काय ?

श्री.सय्यद पाशा पटेल : होय, माझे मत चांगले आहे. सगळेजण असे म्हणतात की, गृह विभागाचे हे अपयश आहे. परंतु हे गृह विभागाचे अपयश नाही तर या देशातील शेतकऱ्यांकडे बघण्याच्या दृष्टीकोनाचे अपयश आहे की, शेतकरी अशा पिकांकडे का वळले ? मी माननीय मंत्री श्री.जयंत पाटील साहेबांना सांगू इच्छितो की, शेतकरी कामगार पक्षाची मंडळी आहेत, मग ते या पिकाकडे का वळले ?

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील म्हणजे कोण ते नीट पाहून बोलावे.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, मी तिकडे पाहून कशासाठी बोलू ? त्यांचाही शेतकरी कामगार पक्षाशी संबंध आहे. मी काही वाईट बोललो नाही.राज्यातील शेतकरी या पिकाकडे का वळले, कारण हे जर उघडे झाले तर शिक्षा होणार आहे, जेलमध्येही जावे लागेल इ.सगळया गोष्टी माहिती असताना लोकांनी हे पीक का लावले ? त्यात माझी सर्वात मोठी भूमिका आहे की, मरता क्या नहीं करता. जर कुठल्याही पिकामध्ये काही शिल्लक रहात नसेल तर हे एकच पीक असे आहे की, शिल्लकच शिल्लक आहे. यामध्ये जास्त फायदा मिळवावयाचा असेल तर रिस्क असतेच. म्हणून डोंगर-दऱ्यामध्ये काम करणाऱ्या शेतकऱ्यांनी या पिकाची लागवड केलेली आहे. खरेतर अशा प्रकरचे पीक घेणे चुकीचे आहे काय? पण एका अर्थाने ती चूकच असे म्हणावे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लागेल. याबाबतीत अंतरराष्ट्रीय चोर लोकांचाच व्यवसाय आहे असे म्हटले जाते.परंतु दुसऱ्या बाजूला म्हणजे भाजीमध्ये चव निर्माण करण्यासाठी खसखशीचा वापर केला जातो,ती याच पिकापासून होणार आहे. मग जर या पिकावर बंदी आणावयाची असेल तर मग खसखस कुठून आणावयाची ? असा प्रश्न निर्माण होतो.

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : ज्याला रस्सा असे म्हणतात

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य असे प्रकार खात नाही पण त्यांना टेस्ट माहिती आहे, कमाल आहे तुमचेही अभिनंदन करतो. यामध्ये दोन गोष्टी लपलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी सांगितले की, इंग्रजांच्या काळामध्ये 100 - 200 एकर जमीन दिलेली होती तेवढीच ठेवा आणि बाकीची काढून टाका. ही जमीन 100 वर्षासाठी लिजवर दिली होती. परंतु माझे म्हणणे असे आहे की, जर सगळयानांच चमचमीत जेवण जेवावयाचे असेल तर खसखस लागणारच आहे.आता यामध्ये मोठ्या प्रमाणात बायो टेक्नॉलॉजी आलेली आहे.खसखस उत्पादनाच्या बाबतीत काही चमत्कार करा की त्यापासून अफू निघणारच नाही तर फक्त खसखस निघावी असे काही करता येईल काय? विज्ञानाचा उपयोग करुन यामध्ये काही करता येते का हे पाहिले पाहिजे. परंतु हे सगळच्या सगळे बंद करता कामा नये. दुसरी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे सरकारने देखील या गोष्टीकडे गंभीरपणे पहावे की, शेतकऱ्यांची मानसिकता काय होत आहे ?

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधारित प्रत / अशुधारित नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

श्री.सय्यद पाशा पटेल.....

सभापती महोदय, मी याठिकाणी बऱ्याच गोष्टी सांगितलेल्या आहेत पण त्याकडे कोणी लक्ष देत नाही. ऊस, कांदे, बटाटे किंवा अन्य कोणतेही पीक घ्या, परंतु शेतकऱ्यांच्या हाती काहीच पडत नाही हे सिध्द झालेले आहे. फक्त ऊस शेतीमध्ये दोन पैसे हातात पडू लागले आहेत. त्यामुळे ऊस शेतकरी खूष आहेत आणि ऊसवाले नेते खूष आहेत. कारण त्या भागामध्ये कर्ज देणाऱ्या पतसंस्था इतक्या प्रचंड आहेत की त्यामुळे ते उघडे पडत नाहीत. परंतु ते जर खरोखर उघडे पडले तर आमच्याकडे रोज पाच-सहाच शेतकरी आत्महत्या करतात त्यांच्याकडे शेकड्याने करतील. आमच्याकडे बैलाची मजुरी 295 असेल तर आपल्याकडे ती 495 आहे. म्हणजे आपल्या येथील बैल श्रीमंत, आपण श्रीमंत, आपले कारखाने श्रीमंत, पीक श्रीमंत म्हणून थोडे बरे चाललेले आहे. आज शेतकरी हातात बेड्या घालण्यास तयार आहेत, जेलमध्ये जाण्यास तयार आहेत. तेव्हा आपणास हे होऊ द्यायचे नसेल तर सर्व शेतकरी कसे खूष होतील आणि समाधानाने कसे जगू शकतील याचा शासनाने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, जनतेला पोलिसांची आज कोणत्याही प्रकारची भीती राहिलेली नाही. पोलिसांना कोणीही घाबरत नाही.माझ्या गावाच्या हद्दीत पोलीस स्टेशन नाही. ग्रामपंचायतीच्या इमारतीमध्ये पोलीस स्टेशन आहे. तेथे पोलिसांना नीट बसायला जागा नाही,आरोपिंना ठेवण्यास लॉकअप नाही. त्या ठिकाणी एकही पोलीस अधिकारी टिकत नाही. माझ्या लातूर जिल्ह्यातील औराशहाजी पोलीस स्टेशन आहे. त्या ठिकाणी 36-37 गावांचा मोठा व्यापार आहे. त्याठिकाणी मोठा व्यापार असल्यामुळे चोर देखील खूप आहेत. गावाची लोकसंख्या 15-20 हजाराच्या आसपास आहे. त्या ठिकाणी मध्य वस्तीमध्ये 30-40 एकर गायरान जमीन आहे. पोलीस स्टेशनसाठी पाच एकर जमिनीची मागणी केलेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी ती जमीन पोलीस स्टेशनला दिली तर त्या भागातील लोकांना पोलिसांचा वचक वाटेल. तलाठ्यांनी दोन एकर जमीन दिलेली आहे. परंतु पुढे काही होत नाही. घोडं कुठे अडले ते माहीत नाही. लोक भीककंगाल असले तर काही तरी उचापती करतात. पोलीस स्टेशन असेल तर त्याला काही प्रमाणात आळा बसेल. तेव्हा त्या ठिकाणी एक पोलीस स्टेशन असावे अशी माझी विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल.....

पृष्ठ क्रमांक 27, बाब क्रमांक 28,29 व 30 कृषी विभाग - कृषी विज्ञान आणि संशोधनासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे. कृषी मूल्य आयोगाचे चेअरमन श्री.अशोक गुलाटी यांनी सांगितले की, शेतकरी आपल्या शेतात खर्च करतो त्या खर्चाची माहिती दिल्लीला पोहोचण्यासाठी दोन वर्षे लागतात. या वर्षी शेतकऱ्यांनी किती खर्च केला याची माहिती घेऊन त्या आधारावर हमी भाव देण्याची शिफारस राज्य सरकार करते. शेतकऱ्यांनी केलेल्या प्रत्यक्ष खर्चाची कच्ची आकडेवारी कृषी विद्यापीठाने तयार करायची आणि राज्य शेतमाल समितीकडे त्याची शिफारस करायची आणि राज्य शेतमाल समितीने कृषी मूल्य आयोगाकडे शिफारस करायची अशी पध्दती आहे. त्यानंतर हमी भाव जाहीर होतात. या वर्षाचे हमी भाव जाहीर करायचे असतील तर शेतकऱ्यांनी किती खर्च केला याची माहिती त्याच वर्षी समजली पाहिजे. परंतु ही सर्व माहिती पोहोचण्यासाठी दोन वर्षे लागत आहेत. कै.धीरुभाई अंबानी यांनी मोबाईलची जाहिरात "करलो दुनिया मुट्ठी मे" अशी केली होती. म्हणजे आपल्या मुठीमध्ये मोबाईल आल्यास संपूर्ण जग आपल्या मुट्ठीमध्ये आहे असे समजले जाते. तेव्हा विज्ञान आणि तंत्रज्ञान एवढे प्रगत झाले असताना शेतकऱ्यांच्या बाबतीत असे का होते हे मला माहीत नाही.

यानंतर कु.थोरात..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीशाली नाही

श्री. सय्यद पाशा पटेल....

म्हणून या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मला शासनाला विनंती करावयाची आहे की, या वर्षात शेतकऱ्यांनी त्यांच्या शेती उत्पादनासाठी केलेला खर्च दिल्लीपर्यंत पोहचविण्यासाठी एक ते दोन दिवसांचा प्रवास असला पाहिजे तो दोन वर्षाचा असता कामा नये. शेतकऱ्यांनी शेती उत्पादनासाठी किती पैसे खर्च केलेले आहेत या संबंधीची आकडेवारी जमा करण्यासाठी 50 कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. 50 कोटी रुपये खर्च करुन मिळविलेली माहिती केंद्र शासनाकडे पाठविण्यासाठी दोन वर्षे लागत असतील तर विज्ञान आणि तंत्रज्ञान युगात या बाबतचा विचार करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या शेती उत्पादनासाठी केलेल्या खर्चाची माहिती घेण्यासाठी 200 ते 300 गावे मॉडेल म्हणून निवडली जातात. त्या ठिकाणची माहिती घेण्यासाठी कृषी विद्यापीठामार्फत अधिकारी नियुक्त केले जातात. हे कर्मचारी शेती नांगरण्यासाठी किती खर्च आला, पेरणी करण्यासाठी किती खर्च आला, कोळपणी करण्यासाठी किती खर्च आला अशा प्रकारची माहिती शेतकऱ्यांकडून घेतात. हे अधिकारी चौकशीसाठी दररोज जात नाहीत त्यामुळे ते जेव्हा जातात तेव्हा त्यांना शेतकऱ्यांकडून अचूक माहिती मिळत नाही. मी या ठिकाणी असे विचारले की, गेल्या आठ दिवसामध्ये तुम्ही रोज रात्री कोणत्या भाज्या खाल्ल्या हे सांगा तर ते कोणालाही सांगता येणार नाही. त्याप्रमाणे शेती उत्पादनासाठी झालेल्या खर्चाची माहिती वर्ष ते सहा महिन्यानंतर विचारण्यात आली तर ती कोणालाही सांगता येणार नाही. ही अचूक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने आता विज्ञान आणि तंत्रज्ञानाची आधुनिक साधने उपलब्ध झालेली आहेत म्हणून या बाबतीतील दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता आहे. शासन हा दृष्टिकोन बदलण्यास तयार आहे का? आता पदवीधर मुले शेती करीत आहेत. सकाळी 7.00 वाजता शेतामध्ये जाऊन रात्री 12.00 वाजता ते घरी येतात. त्यांना संगणक हाताळता येतो.

तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते) : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण थोडक्यात पूर्ण करावे.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय,मी फक्त दोन विषयावर बोलणार आहे. ज्या विषयावर कोणीही सन्माननीय सदस्य बोलले नाहीत अशा आपल्या जेवणाची सोय करणाऱ्या शेतकऱ्यांविषयी बोलून मी माझे भाषण दोन मिनिटात पूर्ण करणार आहे. मला या ठिकाणी विनंती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. सय्यद पाशा पटेल. . .

करावयाची आहे की, या बाबतीत एखादी नवीन सिस्टिम शोधण्यात यावी आणि शेतकऱ्यांनी केलेल्या खर्चाची माहिती दोन-चार दिवसात, आठ ते पंधरा दिवसात किंवा दररोज मुंबई व दिल्लीमध्ये जाईल अशी व्यवस्था करण्यात यावी.

सभापती महोदय,कांद्याच्या भावाच्या बाबतीत आम्ही खूप अपेक्षा केल्या होत्या पण या ठिकाणी वेळ चुकवून निवेदन झालेले आहे. काद्याच्या संदर्भात लोकांच्या भावना तीव्र आहेत. कृषी मंत्री श्री. विखे-पाटील यांना मी विनंती करतो की, उत्तर प्रदेशमध्ये बटाटयाचे दर कोसळल्या नंतर राज्य सरकारने थेट बाजार हस्तक्षेप योजनेच्या माध्यमातून बटाटयाची खरेदी केली आणि बटाटयाच्या पिकाला योग्य न्याय दिलेला आहे. त्याप्रमाणे कांद्याच्या पिकाला न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून काही करता येईल काय याचा विचार करुन शासनाने ती उपाययोजना करावी व कांद्याच्या पिकाला न्याय द्यावा एवढीच सूचना या निमित्ताने मला करावयाची आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल ....

सभापती महोदय, यानंतर मला सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 121 वरील बाब क्रमांक 121 बाबत बोलावयाचे आहे. लातूर येथील मेडिकल कॉलेजमध्ये कुत्र्याने प्रेत नेले. त्या ठिकाणी ऑपरेशनला गेल्यानंतर डोळे गेले. अशीच जर सरकारची इमेज राहणार असेल तर ते वाईट आहे. या संदर्भात काय करता येईल याकडे शासनाने लक्ष द्यावे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पूरक मागण्यांवर चर्चा करीत असताना मला काही सूचना करावयाच्या आहेत, काही मागण्या करावयाच्या आहेत. प्रथम मी सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 82 वरील बाब क्रमांक 74 बाबत बोलणार आहे. मुंबई, ठाणे आणि वसई या ठिकाणी समुद्र किनारी ज्या वस्त्या आहेत, त्या ठिकाणी राहणारे जे कोळी बांधव आहेत त्यांना नेहमीच समुद्राशी निगडित असलेल्या आपत्तींचा सामना करावा लागतो. वादळ, वारा, अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती यांचा त्यांना सामना करावा लागतो आणि त्यांचे वर्षातील सहा-सात महिने यामध्येच जातात. त्यांची जी राहती घरे आहेत ती समुद्र किनारी असल्यामुळे त्यांची अवस्था अतिशय दयनीय झालेली आहे. त्यांचा जो व्यवसाय आहे त्यामध्ये ताजी मासळी आणून त्या ठिकाणी ठेवणे, त्यांची विक्री करणे तसेच मासळी सुकविण्यासाठी त्यांना ओटे वगैरे बांधावे लागतात. त्यांच्या घरी कोणतीही व्यवस्था नाही. त्यांना शौचालय नाही, अनेक ठिकाणी पाण्याची व्यवस्था नाही. मासळी सुकविण्याची सुध्दा व्यवस्था नाही. त्यांना रोज नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागतो. म्हणून त्यांच्यासाठी खास निधीची तरतूद करण्यात यावी.

सभापती महोदय, यानंतर मला अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 77 वरील बाब क्रमांक 69 बाबत बोलावयाचे आहे. अन्नधान्य वितरण व्यवस्थेच्या बाबतीत मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली येथील रेशनिंगची व्यवस्था पूर्णपणे मोडकळीस आलेली आहे. रेशन दुकाने फक्त रॉकेल देण्यापुरतीच राहिलेली आहेत. बाकीचे कोणत्याही प्रकारचे धान्य त्या ठिकाणी मिळत नाही. फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून जे धान्य येते ते धान्य गोडावूनमध्ये अतिशय चांगल्या पध्दतीचे असते पण रेशन दुकानावर गेल्यानंतर ते धान्य लोकांना मिळतच नाही. मला अशी सूचना करावीशी वाटते की, मुंबई आणि आजूबाजूच्या शहरांमध्ये रोजगारासाठी खूप मोठ्या प्रमाणात लोक येतात आणि त्यांना रेशनिंग व्यवस्थेचा जो लाभ मिळावयास पाहिजे तो मिळत नाही. त्यासाठी जर आपण मोबाईल व्हॅनची व्यवस्था केली तर त्या गोडावूनमधून डायरेक्ट त्या त्या वस्त्यांवर धान्य तसेच रॉकेल आणि इतर जीवनावश्यक वस्तू त्यांना देता येतील. त्या मोबाईल व्हॅनसाठी आणि वितरण व्यवस्थेसाठी निधीची तरतूद करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर मला आदिवासी विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 132 वरील बाब क्रमांक 128 बाबत बोलावयाचे आहे. मुंबई आणि ठाण्यातील आदिवासी पाड्यांमध्ये आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

झोपडपट्टयांमध्ये मोठ्या प्रमाणावर कुपोषण आहे. या कुपोषणाची अनेक कारणे सांगितली जातात. परंतु त्या ठिकाणी जी आरोग्य केंद्रे आहेत उदा. मुंबईमध्ये प्रत्येक म्युनिसिपल वॉर्डामध्ये जी आरोग्य केंद्रे आहेत त्यांची अत्यंत दुर्दशा झालेली असून अनेक ठिकाणी ही केंद्रे बंद आहेत. ही आरोग्य केंद्रे जर सुस्थितीत केली आणि पोष्टिक व सकस आहार देण्याची व्यवस्था जर वस्त्यावस्त्यांमध्ये आणि आदिवासी पाड्यांमध्ये झाली तर खूप मोठ्या प्रमाणात कुपोषणाची समस्या दूर करता येईल असे मला वाटते.

सभापती महोदय, यानंतर मला रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 159 वरील बाब क्रमांक 155 बाबत बोलावयाचे आहे. आपण ग्रामीण भागामध्ये फार मोठ्या प्रमाणावर स्वयंरोजगार देतो. शहरी भागामध्ये बेरोजगार तरुणांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर आहे. ज्यांची शाळा अर्धवट सुटते, जे शिक्षणामध्ये फार प्रगती करु शकत नाहीत अशी तरुण बेरोजगार मुले शहरांमध्ये झोपडपट्टयांमध्ये राहतात. ते दहा बाय दहाच्या झोपडीत राहू शकत नाहीत. त्यामुळे ते इकडेतिकडे फिरत असतात. त्यांच्या हाताला कोणतेही काम नाही. त्यांच्यासाठी जर आपण रोजगार आणि स्वयंरोजगाराची योजना सुरु करु शकलो आणि त्यासाठी जर काही खास तरतूद करता आली तर ते योग्य होईल. ग्रामीण भागासारखे शहरी भागामध्ये सुध्दा अशा स्वयंरोजगाराच्या योजना राबविणे खूप आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर मला कृषी विभागाच्या पृष्ठ क्रमांक 27 वरील बाब क्रमांक 29 बाबत बोलावयाचे आहे. कोकणातील आंबा पिकाचे सतत तीन वर्षे नुकसान होत आहे. आपण जर पाहिले तर कोकणामध्ये हवामान फार लहरी झालेले आहे. या वर्षी खूप चांगली थंडी पडली. झाडांना मोहोर आला परंतु झाडांना अजूनही फळे धरलेली नाहीत. मार्च महिन्यात मुंबईमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर आंबा येतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

परंतु कोकणातील आंबा आकाराने लहान राहिला आहे, त्याचा आकार मोठा झालेला नाही. गेली 3 वर्षे निसर्गाच्या लहरीपणामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा फटका बसून त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्याची दखल कृषी विभागाने घेऊन त्यांना नुकसान भरपाई देण्याची व्यवस्था केली पाहिजे. यासाठी दापोली कृषी विद्यापीठाने हवामानावर संशोधन केले पाहिजे. शेतकऱ्यांना या विद्यापीठाच्या माध्यमातून मदत होण्यासाठी शासनाने उपाययोजना केली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर गृह विभागाच्या बाब क्र.9, पान क्र.9 वर मी बोलणार आहे. मुंबईमध्ये पोलिसांना हलाखीच्या परिस्थितीमध्ये रहावे लागते. बऱ्याच पोलिसांना शासकीय निवासस्थान मिळत नाही. त्यामुळे कित्येक पोलीस झोपडपट्टीत राहतात. कांदिवली सारख्या ठिकाणी किंवा मुंबईत पोलिसांसाठी भूखंड राखीव आहेत. परंतु गृह विभागाकडून त्यासाठी विशेष निधीची तरतूद केली जात नाही. पोलिसांना मुंबई सारख्या ठिकाणी शासकीय घरे मिळण्यासाठी शासनाने खास तरतूद केली पाहिजे.

यानंतर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्र.155 वर मी बोलणार आहे. मुंबईपासून गावापर्यंत पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य दिसत आहे. लोकांना पिण्याच्या पाण्याचा पुरेसा पुरवठा होत नाही. लहान नाले असतात त्यातील पावसाचे पाणी समुद्रात किंवा नद्यांना जाऊन मिळते. हे नाले 50-60 फूट रुंद व तेवढेच खोल केले तर वाहून जाणारे पाणी तेथेच थांबू शकेल. त्या नाल्यांवर बंधारे केले तर आजुबाजूच्या शेतांना पाणी पुरवठा होऊ शकतो. तसेच तेथील विहिरींचे पुनर्भरण केले तर भूजलाचा स्तर वाढविण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकेल. याचे खूप चांगले उदाहरण मी पाहिले आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरीश पटेल यांच्या शिरपूर येथे श्री.खानापूरकर हे या क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तेथील भूजलाचा स्तर जो 400 फूट खाली गेला होता तो 40 फुटापर्यंत आणला आहे. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना शेतीला मुबलक पाणी मिळत आहे. पाटबंधारेसाठी शासन खूप मोठा निधी खर्च करतो. पण आपल्याला अपेक्षेप्रमाणे रिझल्टस् मिळत नाहीत. म्हणून शासनाने शिरपूर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्रीमती विद्या चव्हाण....

सारखा प्रयोग केला तर त्याचे चांगले रिझल्ट मिळू शकतील. हे काम थोड्या निधीमध्ये होऊ शकते. त्यासाठी विशेष तरतूद केली तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल असे मला वाटते. मी ज्या काही सूचना केल्या आहेत त्याचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2012-13 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, राज्याला आर्थिक शिस्त येण्यासाठी पुरवणी मागण्यांची संख्या कमी होईल असे माननीय अर्थमंत्र्यांनी आम्हाला सांगितले होते. परंतु दुर्दैवाने ते घडलेले नाही. पुरवणी मागण्यांवर आपण नजर टाकली तर 14,339 कोटी 16 लाख 65 हजार इतक्या रकमेच्या पुरवणी मागण्या मागील 3 अधिवेशनामध्ये मांडण्यात आल्या आहेत. त्यामुळे माननीय अर्थमंत्र्यांना राज्यात आर्थिक शिस्त लावण्यामध्ये अपयश आलेले आहे हे निश्चित आहे.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 69, पान क्र.77 वर मी बोलणार आहे. फ्रँकिंग मशीनसाठी ही मागणी केलेली आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागावर बोलत असताना मला सांगावेसे वाटते की, आपण मॉलमध्ये 3-3 दिवस सेल लागल्याचे पाहतो. हा सेल 25, 26, 27 जानेवारी या दिवशी असतो किंवा 30-31 डिसेंबर या दिवशी असतो. बिग बाजार या सारख्या मॉलमध्ये सेल लावून वस्तू विकल्या जातात. स्वस्त दरात वस्तू मिळतात म्हणून लोक घेण्यासाठी जातात. परंतु त्या वस्तुंचा दर्जा, त्यांचे वजन शंकास्पद असते. ज्यावेळी असा सेल लावला जातो त्यावेळी ग्राहकांना पाकिटांवर नमूद केलेल्या वजनाची, दर्जाची व त्याच मिळण्याची शाश्वती देता येत नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

बिचारे लोक भाबडेपणाने रांगा लावतात आणि बॅगा भरुन वस्तू खरेदी करतात आणि मॉलवाले आपले उखळ पांढरे करुन घेतात. या संदर्भात माझी अशी सूचना आहे की, अशा प्रकारे सेल लावायचा असेल, मालाची विक्री करायची असेल तर त्यासाठी मॉलवाल्यांनी अन्न व नागरी पुरवठा विभागातील वजन माप अधिका-यांशी संर्पक साधून सेल लावला पाहिजे किंवा जेथे अशा प्रकारे सेल लागलेला असेल ते वजन माप अधिका-यांनी स्वत: जावून तपासणी करायला पाहिजे.

सभापती महोदय, बोगस रेशन कार्डांचा मुद्दा वारंवार या सभागृहामध्ये उपस्थित होत आहे. सभागृहातील बहुतेक सर्व सन्माननीय सदस्य रेशन कार्ड कमिटीवर आहेत. रेशन कार्डाच्या बाबतीत दक्षता समिती आहे. पश्चिम उपनगरामध्ये मो्ठ्या प्रमाणावर बोगस रेशन कार्डे आहेत.या बोगस रेशन कार्डांची तपासणी कधी करण्यात येणार आहे ? आता आधार कार्डही आलेले आहे. बोगस रेशन कार्डे किती आहेत याचा आकडा जनतेसमोर आला पाहिजे. त्या दृष्टीने मंत्री महोदयांनी त्वरित कारवाई करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी वर्तमानपत्रातून वजन कमी होते, टकलावर केस येतात अशा प्रकारच्या ज्या बोगस जाहिराती दिल्या जातात त्यासंबंधीचा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित केलेला होता. काही वर्षापूर्वी श्री. अनिल देशमुख हे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मंत्री होते त्यावेळी त्यांनी माझ्या "मासा गिळला की अस्थमा बरा होतो" या विषयाच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना सांगितले होते की, अशा प्रकारच्या जाहिराती वर्तमानपत्राच्या किंवा दूरदर्शनच्या माध्यमातून लोकांसमोर येत असतील तर त्याची शासन सुमोटो दखल घेईल आणि कारवाई करील. अशा जाहिरातींची सत्यासत्यता पडताळून पाहून कोणत्या जाहिराती खोट्या असतात याबाबत लोकजागृती केली जाईल. माननीय मंत्री महोदयांनी माझ्या लक्षवेधी सूचनेला दिलेल्या उत्तरानंतर पुढे कोणत्याही प्रकारची कारवाई आजतागायत झालेली नाही.

गृह विभागाच्या पृ.क्र. 8 वरील बाब क्रमांक 7 मध्ये गुंगीकारक द्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थांच्या बेकायदेशीर वाहतुकीला आळा घालण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या गृहखात्याचा कारभार किती तत्परतेने होतो याचे मी एक उदाहरण देतो. मी दिनांक 21.11.2011 रोजी हिवाळी अधिवेशनामध्ये विलेपार्ले येथे पडलेल्या दरोड्याच्या संदर्भात विशेष उल्लेखाची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

सूचना दिली होती. त्याची पोच मला आज माझ्या पिजनहोलमध्ये मिळाली. त्यावर 12 जानेवारी 2012चा शिक्का आहे. विशेष उल्लेख दिल्याच्या तारखेपासून 30 दिवसाच्या आत त्यासंबंधी सदस्यांना कळविले पाहिजे अशा सूचना आहेत. मला ही पोच तीन महिन्यानंतर मिळाली.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ विकले जातात. पार्ले, अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव या भागामध्ये अंमली पदार्थ विकले जातात. या अंमली पदार्थांचे ट्रॅफेकिंग कोण करते ? तर कचरा वेचणारी मुले या अंमली पदार्थांचे ट्रॅफेकिंग करतात. ही मुले कचरा वेचता वेचता बाजूला घरे करतात. त्याकडे पोलिसांचे लक्ष नसते. ही मुले रात्रीच्या वेळी अंमली पदार्थ विकतात. सहारा रोडवरील एचएसबीसी बँकेच्या बाजूला हा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो. विलेपार्ले, अंधेरी (पश्चिम), जोगेश्वरी (पूर्व) येथे हे अंमली पदार्थ मोठ्या प्रमाणावर विकले जातात. कचरा वेचणा-या मुलांची ही एक नवीन चेन निर्माण झालेली आहे. या मुलांकडे कुणाचे लक्ष जात नाही. जेथे कचरा वेचतात तेथेच ही मुले ड्रग्ज ठेवतात. कॉलेज मधील मुले आणि श्रीमंत लोक त्या ठिकाणी गाड्या थांबवून त्यांच्याकडून ड्रग्ज विकत घेतात. या संदर्भात मी जेव्हा विलेपार्ले पोलीस स्टेशनला तक्रार केली त्यावेळी आमच्याकडे ड्रग्ज ट्रॅफेकिंगला आळा घालण्यासाठी स्टाफ कमी आहे असे सांगण्यात आले.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

डॉ.दीपक सावंत...

त्या विभागातील पोलीस अधिकारी आहेत, त्यांचे आडनाव श्री.पणशीकर असे आहे. त्या अधिकाऱ्याकडे ड्रग नियंत्रणाचे काम सोपविलेले आहे. ड्रगची विक्री कोणकोणत्या ठिकाणी केली जाते याबाबतीत त्यांच्याकडे तक्रार केली, परंतु यासंदर्भात त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली गेलेली नाही.

सभापती महोदय, विले-पार्ले येथे मिलन सब-वे येथे पुलाचे काम चालू आहे. एमएमआरडीएच्या आशिर्वादाने या पुलाखाली एक मदरसा बांधला जात आहे. माननीय श्री.अरुप पटनाईक साहेबांनी यासंदर्भात एमएमआरडीएला पत्र दिले आहे की, या पुलाखाली मदरसा बांधला जात असेल तर येथील धार्मिक स्वातंत्र्याला भविष्यात धोका निर्माण होणार आहे. कारण या पुलाखालून गणपतीच्या मिरवणुका जातात, देवीच्या मिरवणुका जातात. हा मदरसा पूर्वी 280 फुटाचा होता, एमएमआरडीएने 1200 चौरस फुटाची जागा उपलब्ध करुन देऊन त्या मदरशाला मान्यता दिली आहे. मिराणी समितीचा अहवाल धाब्यावर बसवून एमएमआरडीएने तेथे मदरशास परवानगी दिली आहे. तो मदरसा जरी असला तरी ती एक मशीद आहे. त्याचे कारण त्या मदरशाच्या बाहेर नळ जोडणी केली गेलेली आहे. आपणा सर्वांना कल्पना आहे की, पुलाच्या खाली अशा प्रकारची वास्तू बांधता येत नाही. या गंभीर बाबीकडे माननीय गृहमंत्र्यांनी लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करणार आहे. बाब क्रमांक 122, पान क्रमांक 124 ही वैद्यकीय शिक्षण विभागाची शिष्यवृत्ती आणि वेतने देण्यासाठी पूरक मागणी सभागृहासमोर मांडण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात मी ऐकले की, जे.जे.रुग्णालयासाठी 550 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. हा निधी महाराष्ट्र शासन देणार आहे की केंद्र सरकार देणार आहे याचा खुलासा माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी केला पाहिजे. जे.जे.रुग्णालयाला एम्स्चा दर्जा देण्यात येणार आहे. त्याबाबतचा देखील माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. जे.जे.रुग्णालयातील मायक्रोबायोलॉजी डिपार्टमेंट बंद आहे. शासनाने श्रीमती अलका देशपांडे यांना जे.जे.रुग्णालयातून घालविले. तसेच जे.जे.रुग्णालयातील फॉर्मकॉलॉजी विभाग बंद आहे. जे.जे.रुग्णालयात बंद असलेल्या डिपार्टमेंटचे पुढे काय करणार आहात याचा देखील खुलासा या ठिकाणी शासनाच्या वतीने केला गेला पाहिजे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय डॉ.विजयकुमार गावित यांना सांगू इच्छितो की, जे.जे.रुग्णालयात न्युक्लिअर मेडिसीनचे एक डिपार्टमेंट होते. न्युल्किअर मेडिसीन विभागाचे खरोखच काम चालू होते किंवा नाही याची मला माहिती नाही. जे.जे.रुग्णालयामध्ये अशा प्रकारचे डिपार्टमेंट असणे ही एक प्रतिष्ठेची बाब होती. पण दुर्देवाने आज ते डिपार्टमेंट बंद करण्यात आले आहे. या गोष्टीकडे देखील लक्ष देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, जे.जे.रुग्णालय सुपर स्पेशालिटी करीत आहात. आज मुंबई शहरात मोठया प्रमाणात कॅन्सरचे पेशंट मोठया प्रमाणात आहेत. टाटा रुग्णालयात प्रवेश मिळवून वैद्यकीय उपचार व्हावेत म्हणून कॅन्सरचे पेशंट चार, चार दिवस लाईन लावून सुध्दा तेथील डॉक्टरांची अपॉईटमेंट मिळत नाही. कॅन्सरचे पेशंट जमिनीवर झोपत आहेत. जे.जे.रुग्णालयात प्रचंड प्रमाणात जागा उपलब्ध असताना तेथे केमोथेरिपीचे एखादे साधे युनीट सुरु केले तर खूप लोकांचे आशीर्वाद आपल्याला लागतील. ग्रामीण भागातून आलेला रुग्ण केमोथेरिपीची ट्रिटमेंट खाजगी रुग्णालयात घेऊ शकत नाही. टाटा रुग्णालयात जाऊन तो लाईन लावू शकत नाही. बाकीच्या गोष्टी करण्यापेक्षा प्राथम्याने या गोष्टी कराव्यात अशी माझी शासनाला आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, या राज्यात अनेक वैद्यकीय महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांमध्ये डीन किती ठिकाणी आहेत याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी. या महाविद्यालयांमध्ये डीनची पदे रिक्त आहेत. अनेक वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये डीन पदाचा ॲडीशनल चार्ज दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे सोपविलेला आहे. माझ्या माहिती प्रमाणे 5 वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये डीन नाहीत अशी वैद्यकीय क्षेत्रातील परिस्थिती आहे आणि आपण विद्यार्थ्यांना मेडीकल सायन्स शिकवितो.

दुसरी गोष्ट अशी की, वैद्यकीय परीक्षेसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये कॉमन सी.ई.टी.च्या बाबतीत एक संभ्रम निर्माण झालेला आहे. पुढच्या वर्षी कॉमन सी.ई.टी.होणार आहे. कॉमन सी.ई.टी.चा अभ्यासक्रम कोणता असणार आहे, कशाच्या आधारे सी.ई.टी.परीक्षा होणार आहे याबाबतची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री, वैद्यकीय शिक्षण सचिव, संचालक, वैद्यकीय शिक्षण हे विद्यार्थ्यांना देऊ शकत नाही, त्यांच्याकडे सी.ई.टी.च्या बाबतीत कोणतीही माहिती नाही ही अतिशय

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खेदाची गोष्ट आहे. पुढील वर्षापासून "नीट" ची परीक्षा सुरु होणार आहे. ही सी.ई.टी.परीक्षा इंजिनिअरींग आणि वैद्यकीय शिक्षणासाठी एकच राहणार आहे असे सांगण्यात येत आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्याने गणिताचा अभ्यास करावयाचा की इतर विषयांच्या अभ्यास करावयाचा या विषयी संभ्रम निर्माण झाला आहे. कुलगुरु सांगतात की, 12 वी च्या गुणांवर सी.ई.टी.द्या....

यानंतर श्री. भोगले...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

सभापती महोदय, आज वैद्यकीय क्षेत्राकडे वळणारा प्रत्येक माणूस मंत्रीमहोदयांकडे आशेने पहात आहे. परंतु मंत्रीमहोदय खुलासा करण्यास उत्सुक नाहीत. ते स्वत: संभ्रमावस्थेत आहेत. नेमका या सीईटीचा अभ्यासक्रम काय असावा हे आजपर्यंत विद्यार्थ्यांना सांगता आलेले नाही. निदान उत्तराच्या भाषणात मंत्रीमहोदयांनी मार्गदर्शन करावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, लातूर येथील नेत्र रुग्णालयामध्ये कॅटरॅक्ट ऑपरेशन्स झाल्यानंतर दुर्दैवाने काही माणसांची दृष्टी गेली. जागतिक आरोग्य संघटनेच्या नियमानुसार ही टक्केवारी कदाचित योग्य असेल. कॅटरॅक्ट सर्जरीमध्ये 10 टक्क्यापर्यंतचे प्रमाण माफ आहे. परंतु वारंवार असे होणे योग्य नाही. जी काळजी घेतली जाते ती अपुरी आहे हेच यावरुन सिध्द होते. कोणाचा तरी हलगर्जीपणा याला कारणीभूत आहे. त्यामुळे ज्यावेळी कॅटरॅक्टची ऑपरेशन्स निश्चित केली जातात त्यावेळी दृष्टी जाण्याचे प्रकार घडून येतात. दोन-तीन वर्षापूर्वी सोमय्या हॉस्पिटलमध्ये अशी घटना घडली होती. मध्यंतरी स्वामी नारायण हॉस्पिटलमध्ये देखील अशी घटना घडली होती. ज्याप्रमाणे अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत दिली जाते, नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या व्यक्तींना अर्थसहाय्य दिले जाते त्याच धर्तीवर कॅटरॅक्ट ऑपरेशनमुळे दृष्टी गेल्यास अर्थसहाय्य देण्यासाठी शासनाने एक कॉमन कार्यक्रम तयार करुन आर्थिक मदत दिली जावी यादृष्टीने धोरण निश्चित करावे. ती मदत मुख्यमंत्री निधीतून किंवा इतर कोणत्याही निधीतून देण्यात यावी. दंगलखोरांचा पोलीस गोळीबारात मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना शासनाकडून मदत दिली जाते. त्यामुळे कॅटरॅक्ट ऑपरेशनमध्ये कोणाच्या चुकीमुळे दृष्टी गेली यापेक्षा ज्यांची दृष्टी गेली त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत, त्या व्यक्तीला एकाच डोळ्याने दिसत असेल आणि नेमकी त्याच डोळ्याची दृष्टी गेल्यास अशा व्यक्तीला अधिक मदत देणे आवश्यक आहे. शासन अशा व्यक्तीला रोजगार उपलब्ध करुन देण्यास असमर्थ असते. कारण त्यांचे वयोमान 45 ते 50 वर्षापुढील असते. त्यामुळे कायमस्वरुपी आर्थिक मदत देण्याबाबत सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाने पृष्ठ क्रमांक 132 वर बाब क्रमांक 128 अन्वये जीवनदायी आरोग्य योजनेसाठी पूरक मागणी सादर केलेली आहे. राज्यात अनेक आश्रमशाळा आहेत. माननीय मंत्री डॉ.विजयकुमार गावीत या ठिकाणी उपस्थित आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

त्यांच्यासमवेत मी अनेक आदिवासी आश्रमशाळांना भेटी दिलेल्या आहेत. न्याहाळे येथील आश्रमशाळेचे काय झाले? दाभोसे आश्रमशाळेचे काम चार वर्षापासून प्रगतीपथावर आहे. तेथील विद्यार्थी कोणत्या परिस्थितीत आपले जीवन कंठित आहेत? सभागृहामध्ये वारंवार सांगितल्यानंतरही काही बदल होत नाही. मंत्रीमहोदय आणि मी स्वत: मिळून या आश्रमशाळांची पाहणी केली आहे. या आश्रमशाळेमध्ये छतावरुन पाणी गळते. खिडक्यांना तावदाने नाहीत. दरवाजांना फटी पडल्या आहेत. आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना सर्पदंश होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. विधानसभेमध्ये माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्याचा जर सर्पदंशाने मृत्यू झाला तर आर्थिक अनुदान दिले जाईल अशी घोषणा केली आहे असे मला कळते. त्यामुळे आदिवासी आश्रमशाळांमधील मुलांचा जर सरपटणाऱ्या जनावरांमुळे किंवा सर्पदंशामुळे मृत्यू झाल्यास आर्थिक मदत जाहीर करणार का? सभापती महोदय, ठाणे जिल्हयात आदिवासी भागामधील दोन भावंडांचा सर्पदंशाने मृत्यू झाला होता. मोखाडा तालुक्याचे प्रकल्प अधिकारी श्री.खाटीक यांनी वेगळ्या हेडमधून त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत दिली होती. शिवसेना पक्षाने सुध्दा आर्थिक मदत केली होती हे मी आग्रहाने सांगू इच्छितो. त्याच धर्तीवर सर्पदंशाने आदिवासी विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला तर कायमस्वरुपी आर्थिक मदत देण्यासाठी धोरणात्मक निर्णय शासनाने जाहीर करावा.

सभापती महोदय, प्राथमिक आरोग्य केंद्रे ही आश्रमशाळांपासून दूर अंतरावर असतात. अधीक्षकाकडे मोटार सायकल असेल तर तो त्या मुलाला मोटार सायकलवरुन आरोग्य केंद्रात न्यायचा प्रयत्न करतो. परंतु मागील बाजूला बसलेला आदिवासी मुलगा वांती करुन मागच्या मागे केव्हा पडतो हेही कळत नाही. कारण वेळ रात्रीची असते.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

या सर्व गोष्टींचा विचार करुन अशी मदत जाहीर करावी अशी मी सूचना करतो.

महोदय, बाब क्र.131, पृ.क्र. 121-आश्रमशाळांच्या संदर्भातील ही मागणी असून या आश्रम शाळांमध्ये जे कर्मचारी रोजंदारीवर काम करतात त्यात शिक्षक आणि चतुर्थ्श्रेणी कर्मचारी सुध्दा आहेत. ते उपोषणाला बसलेले आहेत. मंत्री महोदयांनी या कर्मचाऱ्यांना भेटून चर्चा केली असून या कर्मचाऱ्यांना शासनाने काम करण्याची भूमिका घ्यावी अशी माझी सूचना आहे. खरे तर यासंबंधी संभाजीनगर खंडपीठाने तसा निर्णय सुध्दा दिलेला आहे की, ज्यांना 240 दिवस पूर्ण झालेले आहेत अशा कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत रुजू करुन घ्यावे, तरी देखील या कर्मचाऱ्यांना कायम करण्यात येत नाही. न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर यामध्ये कोणती अडचण आहे हेच मला समजत नाही, याचाही विचार शासनाने करावा. एका बाजूला शासन सांगत असते की आम्हाला लोक मिळत नाही, कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. मुळात आश्रमशाळातील शिक्षक वेळेवर कामावर येत नाही. सकाळी 10 वाजताची वेळ असेल तर ते 3 वाजता कामावर येतात. सभागृहात मंत्री महोदयांनी फार मोठ्या आवेशाने सांगितले होते की, आश्रमशाळातील शिक्षकांसाठी बायो-मॅट्रिक सिस्टम लागू करण्यात येईल पण तरी देखील त्यासंबंधीचा निर्णय अद्याप झालेला दिसत नाही. त्याचबरोबर या आश्रमशाळांमध्ये मुलांना ज्या ट्रंका पुरविल्या जातात त्या पाहिल्या आणि जुन्या ट्रंका पाहिल्या तर त्यात पुष्कळ फरक दिसून येईल. नव्याने ज्या ट्रंका आलेल्या आहेत त्यांचा पत्रा एकदम निकृष्ट दर्जाचा असल्याने एक बुक्का जरी मारला तरी तो पत्रा आत जातो अशी त्यांची क्वॉलिटी आहे.

त्यानंतर आश्रमशाळातील मुलांना ब्लँकेट्स, चादरी, उशा आणि बेडशिट्स ज्या पुरविल्या आहेत त्यांत मोठ्या प्रमाणात घोटाळा झालेला आहे. त्याची चौकशी का होत नाही याचे स्पष्टीकरण उत्तरातून मिळावे अशी मी अपेक्षा करतो. सदोष अन्नधान्याचा पुरवठा याचीही चौकशी झाली पाहिजे. मागील वेळेस सभागृहात मी लाईफबॉय साबण आणि पातेले आणून दाखविले होते त्यात मोठ्या प्रमाणात घोटाळा झालेला आहे. अशा प्रकारे संपूर्ण आदिवासी विकास विभागाचीच सीआयडी चौकशी होणे आवश्यक आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

महोदय, निर्वाह भत्त्याची रक्कम गेल्या चार महिन्यांपासून मिळालेली नाही. शहापूर, किन्हवली, खर्डी, उल्हासनगर आणि नवी मुंबई परिसरातील आश्रमशाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांना ही रक्कम चार महिन्यांपासून मिळालेली नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत देखील याचा उल्लेख झाला होता. हा निर्वाह भत्ता कधी मिळणार याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच या मुलांना महिन्यातून किमान दोन वेळा मटन आणि ऋतुमानाप्रमाणे फळे कधी मिळणार हा प्रश्न शिल्लकच राहतो. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जी रक्कम शासनाने द्यावयाची आहे ती कधी देणार याचेही स्पष्टीकरण मंत्री महोदयांनी करावे अशी विनंती करतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, बाब क्र. 46, पृ.क्र. 47-मुंबईत विविध ठिकाणी असलेल्या शासकीय निवासी इमारतीच्या बांधकामावरील खर्च भागविण्यासाठी ही तरतूद केलेली आहे. शासकीय निवासासंबंधीचा हा प्रश्न असून तो केवळ मुंबईपुरताच मर्यादित नाही तर संपूर्ण राज्यासाठीचा प्रश्न आहे. विशेषत: मुंबईकडे येणाऱ्या रेल्वेतून अनेक शासकीय नोकर प्रवास करीत असतात. त्यामुळे या मार्गावर असलेल्या सर्व तालुक्यांच्या ठिकाणी शासकीय निवासाची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

सभापती महोदय, या कर्मचा-यांच्या निवासाची व्यवस्था केली न गेल्यामुळे हे कर्मचारी कार्यालयात वेळेवर पोहचत नाही व कार्यालयाची वेळ संपण्याच्या अगोदर कार्यालयातून घरी जातात. सामान्य जनतेला जेव्हा कामासाठी कार्यालयात जावे लागते तेव्हा त्यांना कर्मचा-यांच्या त्रासाला सामोरे जावे लागते. त्यामुळे निवासाची व्यवस्था केवळ मुंबईसाठी न करता संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय कर्मचा-यांच्या निवासाचे काम हाती घ्यावे अशी विनंती मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 47, पृष्ठ क्रमांक 47 वरील भूमि अभिलेखे कार्यालयाच्या इमारतीसाठी रु.3,000/- रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. भूमि अभिलेख हा अत्यंत महत्वाचा विभाग आहे. गोंदिया, भंडारा व चंद्रपूर जिल्हयामध्ये भूमि अभिलेखाचे एकही शासकीय कार्यालय नाही. भूमि अभिलेख कार्यालयाची अवस्था अत्यंत वाईट आहे. या कार्यालयात अत्यंत महत्वपूर्ण जमिनींचे रेकॉर्ड ठेवले जात असते. दोन आठवडया आधी मी स्वत: या कार्यालयाला भेट दिली होती. म्हणून मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की, भूमि अभिलेखे विभागाला सर्व साहित्य, संगणक, इमारती तसेच त्यांच्या खर्चासाठी तरतूद पुढील बजेटमध्ये तरी करण्यात यावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, आदिवासी विभागाच्या पृष्ठ क्रमांक 32,33, 34 व बाब क्रमांक 128 तसेच जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 57 व बाब क्रमांक 49 हे दोन्ही विभाग एकत्र करुन माझे विचार मांडणार आहे. बाब क्रमांक 130 मध्ये म्हटले आहे की, जनजाती क्षेत्र उपयोजने अतर्गत पाटबंधारे प्रकल्पांचा विस्तार व सुधारणांच्या कामाचा स्वेच्छादीन अनुदानासाठी रु. 1,000 ची तरतूद करण्यात आलेली आहे. गोंदिया व गडचिरोली जिल्हयातील अति दुर्गम आदिवासी भागातील अनेक प्रकल्पांच्या कामांना शासन दरवर्षी निधी देत असते. परंतु गडचिरोली जिल्हयातील तुलतुली प्रकल्पाचे काम 1983 पासून बंद आहे. चेन्ना प्रकल्पाचे काम 1983 पासून बंद आहे. गडचिरोली तालुक्यातील पोहरा प्रकल्पाचे काम 1983 पासूनच बंद पडलेले आहे. कोरची तालुक्यातील खोबरागडी प्रकल्पामुळे 7200 हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार होती परंतु वन कायद्यामुळे हे प्रकल्प बंद पडलेले आहे अशी आदिवासी क्षेत्राची अवस्था आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

सभापती महोदय, गोंदिया जिल्हयातील सालेकसा पाटबंधारे विभागात मोठया प्रमाणात बांधण्यात येणारे सिमेंट बंधारे, पाणघाट, गेट दुरुस्ती, कालवा दुरुस्ती तसेच जवाहर विहिरींचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून त्यांच्या दुरुस्तीसाठी फार मोठया निधीची आवश्यकता असल्यामुळे मी या यासंदर्भात निधीची मागणी करतो.

सभापती महोदय, गोंदिया जिल्हयातील लघु पाटबधारे विभागाच्या माध्यमातून 89 साठवण बंधारे बांधण्यात आलेले आहेत व त्यासाठी 6 कोटी 50 लक्ष 12 हजार रुपयांचा निधी खर्च इ ालेला आहे. या बंधा-याच्या माध्यमातून 790 हेक्टर जमिनीचे सिंचन व्हावयास पाहिजे होते परंतु प्रत्यक्षात 445 हेक्टर जमीन सिंचनाखाली आलेली आहे. उद्दिष्ट केवळ 60 टक्के पूर्ण झालेले आहे. 40 टक्के रक्कम व्यर्थ गेलेली आहे. त्यामुळे आदिवासी विभागातील जलसंपदा विभागाने याकडे लक्ष द्यावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, गोरेगाव तालुक्यातील कटंगी येथे 6.55 लक्ष खर्च करुन साठवण बंधारा बांधला गेला आहे. या साठवण बंधा-यामुळे केवळ 10 ते 15 हेक्टर क्षेत्रच सिंचनाखाली येणार आहे असे सांगण्यात आले आहे परंतु प्रत्यक्षात 5 हेक्टर एवढेच क्षेत्राचे सिंचन होणार आहे. एवढा मोठा खर्च करुन सिंचन कमी होते त्यामुळे यासंदर्भात योग्य निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. जेवढा आपण खर्च करतो तेवढा लाभ आपल्याला मिळत नाही. यामध्ये शासकीय अधिका-यांनी बेजबाबदारपणे काम केल्याचे दिसून येते त्यामुळे यासंदर्भात शासनाने लक्ष घालण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 132 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. गोंदिया जिल्हयातील इटीयाडोह, कालीसराड, शिरपूर, पुजारी टोला या ठिकाणी सिंचन प्रकल्प असून या प्रकल्पाची सिंचन क्षमता 93,353 हेक्टर आहे परंतु प्रत्यक्षात 32,502 हेक्टरलाच पाणी मिळालेले आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर...

सिंचनाची कामे वन व अन्य हरकतींमुळे अडून राहिलेली आहेत. आज सदर प्रकल्प पूर्ण करणे नितांत आवश्यक झाले आहे.

यानंतर मी बाब क्रमांक 133, पान क्र.132 संबंधी बोलणार आहे. गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यात जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत जिल्हा व इतर मार्गांची फारच दयनीय अवस्था असून त्यावर मोठमोठे खड्डे पडले असल्याचे दिसून येतात. आज संपूर्ण महाराष्ट्रातच खड्डे पडल्याचे चित्र दिसत आहे. आज महाराष्ट्रात खड्डयांचे साम्राज्य दिसून येते. गोंदिया व गडचिरोली जिल्हा नक्षलप्रभावित असल्यामुळे प्राधान्याने या जिल्ह्यातील जिल्हा मार्ग व इतर रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे. या कामासाठी आपण निधी द्यावा अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, गृह विभागाने चौकशी समितीच्या खर्चासाठी तरतूद केली आहे. आमच्या जिल्ह्यामध्ये मुलींचे अपहरण करण्यात येत आहे. त्यांना भूलथापा देऊन त्यांच्याशी खोटा विवाह करून त्या मुलींची मोठ्या प्रमाणावर जावक होत आहे. मी आपल्याला गोंदिया जिल्ह्याचे उदाहरण देतो. गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील बोळूंदा येथून 58 हजार रूपयाला मुलीला पळविल्यासंबंधी दलालांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु, या मुली पळविण्यातील मुख्य सूत्रधाराला पोलीस पकडत नाही. त्याला अटक करीत नाही. गोंदिया, भंडारा, गडचिरोली, हा आदिवासी भाग आहे. त्यामुळे तेथे चौकशी समिती नेमून मुली पळविण्याचा जो गोरखधंदा सुरू आहे त्याची चौकशी करून असे प्रकार थांबविणे आवश्यक आहे, हे मी आपल्या माध्यमातून राज्य शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

यानंतर मी बाब क्र.49, पान क्र.57 वर बोलणार आहे. मोठया व मध्यम प्रकल्पाच्या दुरूस्तीसाठी अतिरिक्त तरतूद केलेली आहे. जवळ जवळ 20 कोटी रूपयाची तरतूद केली आहे. सदर तरतूद ही अत्यंत अपुरी आहे. गोंदिया, भंडारा, चंद्रपूर जिल्ह्यात मध्यम प्रकल्प तयार झाल्यानंतर तेथील कॅनॉलची दुरूस्ती अद्याप पर्यंत झालेली नाही. मागे 8 कोटी रूपयाच्या कामाची निविदा निघाली होती. पण शेवटच्या स्टेजला ती रद्द झाली. यासंबंधी काय झाले हे अद्याप पर्यंत

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काहीच कळलेले नाही. त्यामुळे दुरूस्तीसाठी येणाऱ्या निधीचा दुरूपयोग शासनाने थांबविला पाहिजे. आज शेतकऱ्यांच्या शेतामध्ये थेट पाणी जात असल्यामुळे त्यांच्या पिकांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या कॅनॉलची, पाटचाऱ्यांची दुरूस्ती शासनाने करणे अत्यंत आवश्यक आहे.

यानंतर मी कृषी विभागाच्या बाब क्रमांक 27,28,29 आणि 30 वर बोलणार आहे. आपण अनेक कृषी विद्यापीठांना अनुदान देतो. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ.बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, जि.नाशिक या विद्यापीठांना सहायक अनुदान देण्याची तरतूद केली आहे. ही आनंदाची बाब आहे. यांना प्रोत्साहन दिलेच पाहिजे. त्यांना वेतनेतर अनुदान दिले पाहिजे. कृषी संबंधात संशोधन होत आहे ते खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजे. शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल हे पाहिले पाहिजे. नवीन संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजे, तरच शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्ये वाढ होईल. मला अनेक मुद्यांना स्पर्श करायचा होता. परंतु वेळे अभावी व अन्य सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्याने मी माझे भाषण येथेच थांबवितो. भारत माता की जय.

.....

अशुधारित प्रत / शोधनाधीन नाही

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मला खर्चाच्या पूरक विवरण पत्र 2011-2012 मधील बाब क्र.122, पृष्ठ.क्र.125 वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अनुषंगाने लक्षात आणून द्यावयाचे आहे की, शिष्यवृत्ती व विद्यावेतनासाठी गेल्या कित्येक दिवसापासून आर्थिकदृष्ट्या मागासवर्गासाठी ज्याला आपण ईबीसी सवलत म्हणतो, त्याची उत्पन्न मर्यादा 15 हजारावरुन 1 लाख रुपयापर्यंत केलेली आहे.बाकी सर्व विभागामध्ये ही सवलत देण्यात येत आहे. पण माझ्याकडे सातत्याने गेल्या सहा महिन्यापासून मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी येत असून त्यांचे असे म्हणणे आहे की, हा बेनिफीट अजून एक्सटेंन्ड झालेला नाही. याबाबतच्या जी.आर.मध्ये अनावधानाने किंवा अवधानाने मेडिकल एज्युकेशन असे लिहिण्याचे राहून गेलेले आहे. त्यामुळे त्यांची अशी मागणी आहे की, त्यांच्यासाठी सुध्दा ही मर्यादा 15 हजारावरुन 1 लाख रुपयापर्यंत करावी. मी शासनाकडे मागणी करतो की, जर ही बाब अनावधानाने राहून गेली असेल आणि ती बाब आपल्यापर्यंत पोहोचली नसेल तर याबाबतीत लक्ष घालून सदरहू मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.

सभापती महोदय, दुसरी बाब म्हणजे इतर मागासवर्गीयांना क्रिमीलेअरसाठी निकष लावलेला आहे आणि ज्याप्रमाणे केंद्र शासन यासाठी 6 लाख रुपयांची मर्यादा करीत आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासन हे सुध्दा प्रगल्भ आणि प्रगत राज्य आहे. त्यामुळे या शासनाने देखील या संबंधातील मर्यादा 6 लाखापर्यंत करावी अशी आजच्या पूरक मागण्यांच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

सभापती महोदय, मला आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती करावयाची आहे की, सहा-सात विभागापैकी केवळ अमरावती विभागामध्ये पाच-सहा अनुशेष असलेले जिल्हे आहेत. या फूटपट्टीमध्ये आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाची दोन मेडिकल कॉलेजेस् आहेत. अशा वेळी त्या संपूर्ण जिल्ह्यामध्ये कर्करुग्णांसाठी शासकीय व्यवस्था आजपर्यंत झालेली नाही असा हा एकमेव विभाग आहे.तसेच इतर सगळया विभागामध्ये एमआरआय ची फॅसिलिटी आहे. पण केवळ विदर्भ आणि त्यातही पश्चिम विदर्भातील जो अमरावती विभाग आहे तेथे आपण एक पथदर्शी पायलट प्रोजेक्ट देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करु असे गेल्या वेळेस मान्य केले होते. त्यामुळे मी याबाबतीत पूरक मागण्यांवरील चर्चेच्या माध्यमातून मागणी करीत आहे. तसेच अकोला व कोल्हापूर येथे जे नवीन वैद्यकीय महाविद्यालय झाले आहे, त्याठिकाणी करार पध्दतीने 150 कर्मचारी घेण्यात आले होते. अशा वेळी त्यांच्या वेतनाच्या बाबतीत आणि इतर कायम स्वरुपातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्या मागण्या आहेत त्याबाबत त्यांनी शासनाला निवेदने दिलेली आहेत, आंदोलने देखील केलेली आहेत. त्यानुसार आपण त्यांना 75 टक्के वेतन देण्याच्या बाबतीत आदेश सुध्दा दिलेले आहेत. परंतु ही मागणी कुठे रखडली आहे, कशामुळे राहिली आहे हे मला माहिती नाही. त्यामुळे या पूरक मागण्यांच्या माध्यमातून त्यांची ही मागणी पूर्ण करण्यात यावी अशी मी शासनाला विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

---

3 के-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी ज्या गोष्टीकडे सभागृहाचे लक्ष वेधले होते,तो मुद्दा पुन्हा एकदा सगळयांच्या समोर नीट यावा म्हणून मी तो परत एका वाक्यामध्ये अधोरेखित करीत आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्याचे एका अर्थाने डायनामिक अर्थमंत्री म्हणजेच माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी जुलै 2011 च्या पावसाळी अधिवेशनापूर्वी असे सांगितले होते की, आम्ही पुरवणी मागण्यांचे प्रमाण शक्यतो लवकरात लवकर कमी करु.परंतु गेल्या वर्षभरातील तीनही अधिवेशनामध्ये 14,349 कोटी 16 लाख 65 हजार इतक्या रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या. त्यामुळे असे सिध्द होते की,याबाबतीत कोणत्याही प्रकारचे पूर्वनियोजन नसल्यामुळे वर्षभरानंतर सुध्दा सभागृहामध्ये वारंवार पुरवणी मागण्या सादर कराव्या लागत आहेत. या अधिवेशनामध्ये 4664 कोटी रुपयांच्या ज्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या आहेत. त्यात गृह विभागामध्ये पान क्र.8, बाब क्र.7 बाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे की, अंमली व गुंगीकारक द्रव्य वाहतुक यासाठी 25 लाख 63 हजार रुपयांची पुरवणी मागणी मांडण्यात आलेली आहे.एका बाजूने अंमली व गुंगीकारक द्रव्य वाहतूक कंट्रोल करण्यासंबंधी पुरवणी मागणी करण्यात आली आहे आणि त्याच्याबरोबर नवनवीन अनेक अंमली पदार्थ गावोगावामध्ये उपलब्ध असल्याचे लक्षात येत आहे आणि त्याबाबत कंट्रोल करण्याची कोणती व्यवस्था नाही. तसेच याठिकाणी अफूच्या शेतीचा विषय आला आणि हा विषय यावर्षी उघडकीस आलेला असला तरी गेली दहा वर्षे हा विषय वारंवार सदनामध्ये उपस्थित होत आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये अफूची शेती केली जाते. ही शेती करणाऱ्यांना त्यातून किती मिळते हा वेगळा भाग आहे. पण त्या साठी जे एजन्ट निर्माण झालेले आहेत त्यांनी मात्र करोडो, अब्जावधी रुपये गोळा केलेले आहेत.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्र.10 मध्ये रेडिओ ट्रॅकींग स्पेक्ट्रम यासाठी 2 कोटी 44 लाख 95 हजार रुपयांची पुरवणी मागणी आलेली आहे. अशा प्रकारची अद्ययावत व्यवस्था पाहिजे हे मला मान्य आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेटे)

श्री.चंद्रकांत पाटील...

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय गृह मंत्र्यांनी वारंवार सांगितले की, आम्ही मुंबई शहरामध्ये पाच हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार आहोत. त्यासाठी माननीय गृह मंत्री आणि राज्य मंत्री हे सिंगापूरला जाऊन तेथील कॅमेरा सिस्टीम पाहून आले होते हे आपणा सर्वांना माहीत आहे. परंतु हे कॅमेरे बसविण्यासंबंधी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात आलेली नाही की त्याबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 11, बाब क्रमांक 15- गृह विभाग- चौकशी समितीच्या खर्चासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मावळ ,अंबड आणि मोवाड या ठिकाणी झालेल्या घटनांच्या संदर्भात तीन चौकशी समित्या नेमण्यात आल्या होत्या. त्यासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. दोन वर्षापूर्वी कोल्हापूर येथे महिला पोलिसांचे लैंगिक शोषण झाले होते. त्या संदर्भात देखील अनेक प्रकारच्या समित्या नेमल्या होत्या, परंतु त्याचा अहवाल अजून बाहेर आलेला नाही. तेव्हा या गोष्टीचा खुलासा माननीय गृह मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिरातील चार पैकी दोन दरवाजे मागील सात महिन्यांपासून बंद आहेत. सुरक्षिततेच्या कारणास्तव हे दरवाजे बंद ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी अनेक प्रकारची आंदोलने झाली. त्या ठिकाणी केवळ 40 पोलिसांचे वेगळे बीट मिळाल्यास महालक्ष्मी मंदिराचे चारही दरवाजे उघडे ठेवता येईल असे सांगण्यात आलेले आहे. शासन 40 पोलिसांची तुकडी पुरवू शकत नाही ही खेदाची बाब आहे. शनिवार-रविवार या दिवशी जवळपास एक लाखाच्या आसपास भाविक महालक्ष्मीच्या दर्शनासाठी येतात. नवरात्रीच्या दिवशी ही संख्या दहा-अकरा लाखांच्या घरात जाते. तेव्हा माझी मंत्री महोदयांना विनंती आहे, महालक्ष्मी मंदिराचे चारही दरवाजे उघडे ठेवण्यासाठी तेथे 40 पोलिसांचे बीट उपलब्ध करुन द्यावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 83, बाब क्रमांक 76 सामाजिक न्याय विभाग - विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्यांसाठी मागणी करण्यात आलेली आहे. मेडिकल व इंजिनिअरींग कॉलेजमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी शासनामार्फत भरण्यात येते. परंतु बऱ्याच वेळा ही फी वेळेवर भरली जात नाही. काही कॉलेजेसना ही फी तीन-तीन वर्षे मिळालेली नाही. शासनाकडून त्यांना दोन-तीन कोटी रुपये येणे आहे. तेव्हा या कॉलेजेसनी आता असा निर्णय घेतला आहे की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी प्रथम फी भरावी आणि नंतर शासनाकडून त्याची प्रतिपूर्ती करुन घ्यावी. तेव्हा शासनाने वेळीच कॉलेजची फी भरली नाही तर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुढील वर्षी मेडिकल किंवा इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्रवेश मिळणार नाही. तेव्हा या बाबीकडे शासनाने लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग - कोल्हापूरसारख्या एका मोठ्या शहरात दोन दिवस पाणी पुरवठा बंद झाला होता. महानगरपालिकेने पाणी विभागाची थकबाकी न दिल्यामुळे पाणी पुरवठा बंद केला होता. काही महानगरपालिका इतक्या डबघाईला आलेल्या आहेत की ती सरकारची देणी देऊ शकत नाही. अकोला महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे काही महिने पगार झालेले नाहीत. नगरपालिका व महानगरपालिका शासनाच्या देणी देऊ शकत नसतील तर लोकांनी गैरसोयींना तोंड द्यायचे काय, याचा विचार देखील आपण केला पाहिजे.

सभापती महोदय, शासनाची नवीन मेडीकल कॉलेजेस सुरु झालेली आहेत ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी केला. अगोदरची सिव्हील हॉस्पीटल अतिशय उत्तमपणे चालत होती कारण ती आरोग्य विभागाकडे होती. परंतु ही हॉस्पीटल्स आरोग्य विभागाकडून मेडिकल विभागाकडे आली तेव्हा पासून या हॉस्पीटल्सची अवस्था अतिशय बिकट झालेली आहे. ग्रामीण भागातील लोकांसाठी सिव्हील हॉस्पीटल्स अतिशय महत्वाची आहेत. कारण त्यांना सिव्हील हॉस्पीटलमध्ये चांगली ट्रीटमेंट मिळते. आता सिव्हील हॉस्पीटल्सची अतिशय दुरवस्था निर्माण झालेली आहे याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे आताही सांगतो की 14-14 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या आपण मांडत आहोत त्याचा सरकारने विचार केला पाहिजे आणि एक आर्थिक शिस्त आणली पाहिजे एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

------ यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, बाब क्रमांक 68 पृष्ठ क्रमांक 77 अन्न आणि नागरी पुरवठा या एकाच विषयावर मी बोलणार आहे.

सभापती महोदय, अन्न आणि नागरी पुरवठा विभागामार्फत मुंबई शहर आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये स्वस्त धान्याची योजना फार मोठया प्रमाणात राबविण्यात येते. स्वस्त धान्य योजनेच्या कार्यालयांची अतिशय दूरवस्था आहे. त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. या सर्व कर्यालयांचे संगणकीकरण करण्यात आलेले आहे असे सांगण्यात येते पण या सर्व कार्यालयांमध्ये संबंधित वरच्या अधिकाऱ्यांनी जाऊन पाहणी केली तर या कार्यालयांमध्ये एकही संगणक दिसणार नाही. सन्माननीय आमदारांनी आपल्या निधीतून काही कार्यालयांना संगणक दिले असतील तो भाग वेगळा आहे पण स्वस्त धान्य दुकानांच्या कार्यालयातील संगणकाच्या बाबतीत कोणतीही योजना नाही ती करण्यात यावी अशी माझी सूचना आहे. या ठिकाणी अपुरा स्टाफ आहे. लोकांना एक ते दीड महिना या स्वस्त धान्य दुकानांच्या कार्यालयामध्ये फेऱ्या माराव्या लागतात त्यामुळे या कार्यालयातील स्टाफ वाढविण्यात यावा. तसेच स्वस्त धान्य दुकानदारांची स्वत:ची मनमानी आहे त्या मनमानीला आळा बसला पाहिजे एवढेच मला या निमित्ताने अन्न आणि नागरी पुरवठा विभागाच्या संदर्भात सांगावयाचे आहे. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री दिवाकर रावते, ॲड. उषा दराडे, सर्वश्री परशुराम उपरकर, राजन तेली, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री. सय्यद पाशा पटेल, श्रीमती विद्या चव्हाण यांनी पाणी पुरवठा व आरोग्य विभागावर सविस्तरपणे वेगवेगळे मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी कारंजा तालुक्यातील मांडवा या गावी काही दुकानदारा विरुध्द तक्रारी करण्यात आल्या होत्या असा मुद्दा उपस्थित केला होता. त्या तक्रारीमध्ये तथ्य आढळून आलेले आहे असे असताना सुध्दा जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी त्याच्या विरुध्द कारवाई केलेली नाही म्हणून त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.तसेच कोकणामध्ये गॅस धारकांना गॅस एजन्सीकडून बराचसा त्रास होत आहे. या संदर्भात दिनांक 19-03-2012 रोजी जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिलेले आहेत. अशा प्रकारच्या तक्रारी आल्या असतील किंवा तक्रारी आल्या नसल्या तरी अधून-मधून त्यांची तपासणी करुन अनियमितता आढळल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी अशा प्रकारचे निर्देश देण्यात आलेले आहेत. राज्यातील माल साठविण्यासाठी गोडावून्समध्ये वाढ करण्यासाठी केंद्र शासनाकडून बराचसा निधी मिळालेला आहे त्यामधून 583 नवीन गोडावून्स प्रस्तावित केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सांगितले की, तीन महिन्याचे धान्य एका वेळी देण्यात येणार आहे त्याच्या वाहतुकीचा भार दुकानदारांवर पडेल. परंतु शासनाच ती व्यवस्था करणार आहे. शासनच वाहने देत असल्यामुळे त्याचा परिणाम निश्चितपणे दुकानदारांवर होणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी श्रृगांरवाडी, आष्टी व इतर 195 गावांच्या दूषित पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. निश्चितपणाने शासनाने याची नोंद घेतलेली आहे. ज्या ठिकाणी दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे त्या ठिकाणी कशा पध्दतीने चांगले पाणी मिळेल या दृष्टीने व्यवस्था करावी लागेल ती व्यवस्था करण्याबद्दल निश्चितपणे सांगितले जाईल. नळ पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीच्या ठिकाणी तसेच दुष्काळी भागातील काही गावांना पाणी पुरवठयाच्या तात्पुरत्या योजना करण्यात येतात त्या ठिकाणी पी.पी.एस.योजना करण्याच्या बाबतीत निश्चितपणे सांगितले जाईल.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित ....

त्याचबरोबर वेगवेगळ्या ठिकाणी ज्या पाणी पुरवठा योजना आहेत, जलस्वराज किंवा भारत निर्माणच्या ज्या योजना असतील त्या बऱ्याच प्रमाणात अपूर्ण आहेत, ही गोष्ट खरी आहे. त्यासाठी वेगळा निधी देऊन त्या योजना कशा पूर्ण करता येतील याकडे निश्चितपणे लक्ष दिले जाईल.

सभापती महोदय, या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सांवत यांनी सांगितले की, बऱ्याचशा खात्यांमध्ये अजून बरीच पूर्तता करावयास पाहिजे किंवा मशिनरीज नाहीत. त्या बाबतीत मी निश्चितपणे लक्ष घालीन. परंतु आपण या ठिकाणी डॉ. अलका देशपांडे यांच्या संदर्भात जो उल्लेख केला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, शासनाचे जे धोरण आहे त्याप्रमाणे आपण 65 वर्षाच्या पुढे नेमणूक देत नाही. त्यामुळे आपण त्यांना नेमणूक दिली नाही. परंतु आपल्याकडे असे काही विभाग आहेत की, ज्या ठिकाणी आपल्याला शिक्षकांची गरज आहे. त्यासाठी आपण मंत्रिमंडळासमोर जात आहोत. 65 वर्षाच्या पुढे सुध्दा त्यांना त्या ठिकाणी एक्स्टेंशन देता आले पाहिजे किंवा त्यांना ऑनररी म्हणून त्या ठिकाणी नेमता आले पाहिजे या दृष्टीने आपण निश्चितपणे यामध्ये लक्ष घालत आहोत.

केमोथेरेपीच्या बाबतीत सुध्दा आपल्याला माहीत असेल की, मुंबईमध्ये जी शासकीय रुग्णालये आहेत त्या ठिकाणी रेडिओथेरेपीची व्यवस्था करीत आहोत. आपण असे नियोजन करीत आहोत की, महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने जी महसुली विभागीय ठिकाणे आहेत त्या ठिकाणी नवीन फुलफ्लेज कॅन्सर इन्स्टिट्यूट ज्यामध्ये केमोथेरपी असेल, रेडिओथेरपी असेल इत्यादी सर्व गोष्टी त्या ठिकाणी करण्याचे प्रपोजल आहे. त्यामध्ये प्रामुख्याने आपण आता जे काही प्रपोजल केलेले आहे त्या बाबत मंत्रिमंडळासमोर जाण्याचा विचार सुरु आहे. पुणे, नागपूर, अकोला या तीन ठिकाणी आम्ही ते घेत आहोत. ज्या ठिकाणी जुन्या इन्स्टिट्यूट आहेत, मुंबईत, औरंगाबाद, नागपूरला आहे पण त्या ठिकाणी पूर्ण सोय नाही पण या तीनही ठिकाणी ते फुलफ्लेज करण्याचा प्रस्ताव आपण केलेला आहे. त्या दृष्टीने पावले टाकण्याचा निश्चितपणे प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सीईटीच्या बाबतीत उल्लेख केला. सीईटीचा एक अभ्यासक्रम केंद्र शासनाने वेबसाईटवर टाकलेला होता. त्या बाबतीत त्यांनी हरकती मागविल्या होत्या. त्यानंतर पुढे त्यामध्ये त्यांनी पाहिजे तसे लक्ष दिलेले नाही. हे केंद्र सरकारच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. विजयकुमार गावित .....

अखत्यारित असल्यामुळे ते त्या बाबतीत निर्णय घेतील परंतु या वर्षी सीईटी घ्यावयाची नाही अशा पध्दतीचा निर्णय आहे. पुढच्या वर्षापासून सुरु करु असे त्यांनी सांगितलेले आहे.

डॉ. दीपक सावंत : माननीय मंत्री महोदय, आपण डॉक्टर आहात तसेच आपल्या कुटुंबामध्ये सुध्दा डॉक्टर आहेत. मुले सीईटीची तयारी एक-दीड वर्ष आधी सुरु करतात. 2013 मध्ये सीईटी असेल तर आता 2012 हे वर्ष सुरु झालेले आहे आणि पुढच्या वर्षी आम्हाला काय करावयाचे आहे, कोणता अभ्यासक्रम करावयाचा आहे हे मार्चमध्ये मुलांना कळले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय हे सरकार म्हणून बोलत आहेत. त्यांनी 'वेबसाईटवर टाकला' असा शब्द वापरलेला आहे. 'टाकला' असा शब्द कसा असू शकतो ? एरवी आपण रस्त्यावर जसे बोलतो तसे या ठिकाणी नको.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, केंद्र शासनाने ते वेबसाईटवर टाकलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : टाकले म्हणजे काय ?

श्री. विनोद तावडे : वेबसाईटवर अपलोड केले आहे असे माननीय मंत्री महोदय सांगू शकतील पण पुन्हा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते त्याबाबत त्यांना प्रश्न विचारतील.

श्री. दिवाकर रावते : वेबसाईटवर प्रदर्शित केले आहे असे त्यांना म्हणता येईल.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले की, असे जे राष्ट्रीय कार्यक्रम होतात त्यामध्ये काही वेळेला दुर्दैवाने काही गोष्टी घडत असतात. ज्याचा डोळा गेला असेल त्याला मदत केली पाहिजे ही शासनाची सुध्दा भूमिका आहे पण शासनाने एकदा मदत केली किंवा कोणाकोणाला मदत केली यापेक्षा आम्ही एक विचार केला की, या बाबतीत एक समिती नेमावी आणि समिती नेमून आणि त्या समितीने एकदा ठरवून दिल्यावर ते आपण लागू करणार आहोत. त्यामुळे ती अडचण सुध्दा दूर होऊ शकेल. सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांनी जे सांगितले त्या बाबत मी सांगू इच्छितो. खरे म्हणजे ई.बी.सी. सवलतीची उत्पन्न मर्यादा 15 हजारावरुन 1 लाख रुपये केलेली आहे. परंतु चुकीने ते राहिले असेल तर मी ते रेक्टिफाय करुन घेईन. ओबीसीच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी सांगितले. किती करावयाचे, किती फी घ्यावयाची या बाबतीत आपण निश्चित धोरण ठरवित आहोत, त्या वेळेला निश्चितपणे याचा विचार करु.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित....

त्याचप्रमाणे आपण एमआरआयबाबत बोलला आहात. या संदर्भात नियोजन व वित्त विभागाला विचारणा करण्यात आली होती. त्यांनी प्रायोगिक तत्वावर काही कॉलेजमध्ये ते करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. ते करीत असताना सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांच्या कॉलेजबाबत निश्चितपणे विचार केला जाईल.

कोल्हापूर, लातूर व अकोला येथील कॉलेजच्या संदर्भात 70 टक्के पगार देण्याची बाब विचाराधीन आहे. मला वाटते की, त्याबाबत लवकर निर्णय होईल त्यासाठी प्रयत्न चालू आहे.

डॉ.रणजित पाटील : जी नवीन कॉलेज होऊ घातली आहेत त्यांना यापूर्वीच वेतन दिलेले आहे.

डॉ.विजयकुमार गावित : त्यांना दिलेले नाही तर विचाराधीन आहे. 70 टक्के देण्याचा विचार सुरु आहे. सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या, आरोग्य विभागाच्या, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी ग्राहक संरक्षण विभागाच्या संदर्भात जो मुद्दा उपस्थित केला होता त्याबाबत विभागीय चौकशी नेमली आहे.

सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी नरसिंग कॉलेजसंबंधी मुद्दा मांडला होता. त्याबाबत समाजकल्याण विभाग व आदिवासी विकास विभागाशी चर्चा झालेली आहे. जे रजिस्टर्ड आहेत, ज्यांना सरकारने एनओसी दिलेली आहे त्यांना निश्चितपणे पैसे दिले जातील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आज सभागृहात अनेक खात्यांचे मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, ज्या खात्याचे मंत्री महोदय उपस्थित आहेत त्यांची उत्तरे होऊ द्यावीत. जे मंत्री महोदय आता उपस्थित नाहीत ते सभागृहात येत आहेत.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय डॉ.विजयकुमार गावित यांनी अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे मी उत्तर देईन असे सांगितले होते. परंतु त्यांनी माझ्या मुद्याला उत्तरच दिलेले नाही. ते उत्तरच देऊ शकत नाहीत. कारण त्यांना आम्ही उपस्थित केलेला विषय माहीतच नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागापैकी ग्राहक संरक्षण विभागाच्या माध्यमातून टी.व्ही.वर निरनिराळया वस्तूंची जाहिरात दाखविली जाते त्याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ज्या खात्याचे मंत्री महोदय उपस्थित नाहीत त्यांनी त्यांच्या खात्याची उत्तरे उद्या द्यावीत.

तालिका सभापती : मघाशी मंत्री महोदयांनी आपल्या मुद्याचे उत्तर दिलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही सरकारची अडचण समजून घेत आहोत. आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत आम्हाला मंत्री महोदयांकडून उत्तर अपेक्षित आहे. त्यामुळे आपण आम्हाला मदत करावी. आपण त्यांना मदत करु नये. मंत्री महोदयांची उत्तर देण्याची तयारी असेल तर त्यांनी ते दिले पाहिजे. टी.व्ही.वर जाहिरातीमध्ये गुरु या ग्रहाची अंगठी घ्यावी, तुम्हाला अपेक्षित फळ मिळेल असे सांगितले जाते. त्याबाबत मंत्री महोदयांकडून उत्तर आलेले नाही.

डॉ.विजयकुमार गावित : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी टी.व्ही.वर निरनिराळया जाहिराती दिल्या जातात. याबाबत मंत्री महोदयांनी त्या जाहिराती अयोग्य असतील तर त्याबाबत कारवाई करण्याचे निर्देश दिलेले होते. त्याबाबत निश्चितपणे अधिकाऱ्यांना कारवाई करण्याचे निर्देश दिले जातील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आज पुरवणी मागण्यांवरील चर्चेचा पहिला दिवस होता. संबंधित खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित नसतानाही इतर विभागाच्या मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्यांच्या मुद्यांची नोंद करुन घेतली आहे हे खरे आहे.आज जे मंत्री महोदय उपस्थित आहेत त्यांची उत्तरे आम्ही ऐकतो.

यानंतर श्री.शिगम....

असंशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

परंतु जे मंत्री महोदय आज सभागृहामध्ये हजर नाहीत त्यांची उत्तराची भाषणे उद्या ठेवावीत. त्या त्या विभागाच्या मंत्र्यांनीच पुरवणी मागण्यावरील चर्चेला उत्तर देणे संयुक्तिक ठरेल. या संदर्भात आपण माननीय सभापतींना विचारुन घ्यावे.

तालिका सभापती : कोणकोणत्या खात्याच्या पुरवणी मागण्यासंबंधी उत्तर देण्यात येईल हे माननीय मंत्री महोदयांनी सुरुवातीलाच सांगितले होते आणि त्याप्रमाणे त्यांनी उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जे पूरक प्रश्न विचारले त्यालाही माननीय मंत्री महोदयांनी उत्तरे दिलेली आहेत.

डॉ. दीपक सावंत : मी उपस्थित केलेल्या मुद्यांना मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही.

श्री. विनोद तावडे : आपणाला कामकाज उरकून घ्यायचे आहे काय ? मी माननीय सभापतींना विनंती करण्यास सांगितले. ती देखील विनंती आपण केलेली नाही.

तालिका सभापती : मी माननीय सभापतींना विचारतो. तोपर्यन्त अन्य विभागाचे जे मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत ते त्यांच्या विभागाच्या मागण्यांना उत्तर देतील.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आज जिल्हा परिषदांच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या निवडणुका असल्यामुळे स्वाभाविकपणे मंत्री महोदयांना त्या ठिकाणी हजर रहावे लागणार हे गृहीत धरुन आम्ही सहकार्य केले. संबंधित खात्याचे मंत्री सभागृहामध्ये नसताना सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेऊन चर्चा केली. माझी एवढीच विनंती आहे की ज्या खात्याचे मंत्री महोदय सभागृहामध्ये हजर आहेत त्यांनी पुरवणी मागण्यावरील चर्चेला उत्तर द्यावे. परंतु ज्या खात्याचे मंत्री महोदय उपस्थित नाहीत त्यांच्या उत्तरासाठी उद्या सकाळी 10 ते 11.15 पर्यन्त विशेष बैठक घ्यावी. विरोधी पक्षाने सहकार्याची भूमिका दाखविलेली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, पुरवणी मागण्या म्हणजे अर्धे बजेट आहे. आधी तुम्ही खर्च करता आणि मग मंजुरी घेता. अर्थ खाते ही काय कुणाची खाजगी मालमत्ता आहे काय? ज्या खात्याचे मंत्री महोदय सभागृहामध्ये हजर नाहीत त्या खात्याच्या पुरवणी मागण्यासंबंधीचे उत्तर अन्य खात्याच्या मंत्री महोदयांनी देणे संयुक्तिक होणार नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, ज्या विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्यांनी आपले अभिप्राय दिलेले आहेत त्यासंबंधी उत्तर देण्याची माननीय मंत्री महोदयांची तयारी आहे.

उप सभापती : सभागृहामध्ये जे मंत्री महोदय उपस्थित आहेत ते त्यांच्या विभागांच्या पूरक मागण्यासंबंधी उत्तर देतील. दरम्यानच्या काळात मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्याशी या संदर्भात चर्चा करीन.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागावर्गीयांचे कल्याण व व्यसनमुक्ती कार्य मंत्री) : सभापती महोदय, सामाजिक न्याय, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागावर्गीयांचे कल्याण व व्यसनमुक्ती कार्य विभागाच्या सन 2011-12 वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर श्री. सुभाष चव्हाण, श्री. रामनाथ मोते, श्रीमती उषा दराडे, श्री.अरुण गुजराथी, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. राजन तेली, श्रीमती दिप्ती चवधरी यांनी अतिशय चांगल्या सूचना केल्या आहेत. त्याबद्दल मी सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. ओ.बी.सी.च्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. यामध्ये एक विषय असा आहे की, इंजिनिअरींग आणि मेडीकल कॉलेजमधील ओ.बी.सी.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क शासनाकडून भरले जाते, शैक्षणिक शुल्क भरण्यामध्ये मोठी पेंडन्सी आहे, ही गोष्ट खरी आहे. ओ.बी.सी.प्रवर्गासाठी एकाच वेळी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध झाला नाही. त्यासाठी आता 57 कोटींची पुरवणी मागणी सभागृहासमोर मंजुरीसाठी मांडण्यात आली आहे. तो निधी प्राप्त झाल्यानंतर मोठया प्रमाणात हा प्रश्न मिटेल. तरी देखील ओ.बी.सी.च्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक शुल्क भरण्याचा शिल्लक राहणार आहे. त्याचे कारण असे की, उत्पन्नाची मर्यादा न बघता आपण ओ.बी.सी.प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क भरतो. वेगवेगळया विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या महाविद्यालयांचे वेगवेगळे शैक्षणिक शुल्क आहे. ते देण्याचे काम शासनामार्फत केले जाते. या ठिकाणी एका सन्माननीय सदस्यांनी सूचना केली की, हे शैक्षणिक शुल्क अगोदर विद्यार्थ्यांकडून घेतले पाहिजे. परंतु शासनाला तसे करता येणार नाही. अशी पध्दत सुरु केली तर बरेच ओ.बी.सी.चे विद्यार्थी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणार नाहीत, पर्यायाने ते शिक्षण घेऊ शकणार नाहीत. उलट ओ.बी.सी.च्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क भरण्याची जबाबदारी शासनाची आहे. मी या ठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, यापुढच्या काळामध्ये याबाबतीत पेंडन्सी राहणार नाही, अशी व्यवस्था शासनाच्या माध्यमातून करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : मागील काळातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची रक्कम पेंडींग आहे. ती प्रथम देण्यात यावी. तसेच विद्यार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र तीन, तीन महिने दिले जात नाही. त्याबाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी सांगावी.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे : विद्यार्थ्यांना जातीची प्रमाणपत्रे ताबडतोबीने दिली गेली पाहिजेत. तशा सूचना सर्व संबंधिताना देण्यात आलेल्या आहेत. ओ.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेला आहे, परंतु त्यांची शैक्षणिक शुल्काची रक्कम थकीत आहे. जातीचे प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे ओ.बी.सी.विद्यार्थ्यास प्रवेश दिला गेला नाही, अशा प्रकारची एकही तक्रार शासनाकडे प्राप्त झालेली नाही. इंजिनिअरींग आणि मेडीकल कॉलेज आहेत, त्या ठिकाणी शिक्षण घेत असलेल्या ओ.बी.सी. विद्यार्थ्यांची आऊटस्टॅन्डींग रक्कम जास्त आहे. ओ.बी.सी.च्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काचा प्रश्न निर्माण झालेला आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी मोठया प्रमाणात शासनाकडे निधी उपलब्ध आहे. ओ.बी.सी.च्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी एकाच वेळी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होत नाही ही गोष्ट मी अगोदरच मान्य केलेली आहे. यासाठी 57 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली आहे.

दुसरा मुद्दा महत्वाचा विषय व्ही.जे.एन.टी. आणि ओ.बी.सी. या प्रवर्गास क्रिमीलेअरची मर्यादा 4.50 लाख रुपये एवढी आहे. ती मर्यादा वाढवून मिळावी अशी सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी मागणी केली आहे. क्रिमीलेअरच्या संदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत असा निर्णय झाला आहे की, केंद्र शासनाने ओ.बी.सी. प्रवर्गाची क्रिमीलेअरची मर्यादा वाढविल्या बरोबर आपण देखील मर्यादा वाढवावी. माझ्या माहिती प्रमाणे पुढील दोन महिन्यामध्ये ही मर्यादा केंद्र सरकारकडून 6 ते 6.50 लाखापर्यंत वाढविण्याची शक्यता आहे. केंद्र सरकार ज्या दिवशी क्रिमीलेअरची मर्यादा वाढवेल, त्याच्या दुसऱ्या दिवशी महाराष्ट्र सरकार तसा निर्णय घेईल.

सभापती महोदय, ओ.बी.सी.प्रवर्गातील लाभार्थ्यास भाग भांडवल खूप कमी देण्यात येत होते. या वर्षी शासनाने 15 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यापुढच्या रेग्युलर बजेटमध्ये भाग भांडवलासाठी अधिक तरतूद मिळविण्याचा विभागाचा प्रयत्न रहाणार आहे.

सभापती महोदय, नर्सिंग कोर्सच्या बाबतीत एक प्रश्न निर्माण झालेला आहे. राज्यात बऱ्याचशा नर्सिंग स्कूल, कॉलेज अनधिकृत आहेत. ज्या नर्सिंग स्कूल, कॉलेज चालू आहेत, त्या अधिकृत आहेत की अनधिकृत आहेत यासंबंधी शंका येऊ लागली होती. म्हणून मी माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांच्या बरोबर यासंदर्भात एक बैठक आयोजित केली.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोणत्या नर्सिंग स्कूल, नर्सिंग कॉलेज अधिकृत आहेत त्यासंबंधी सविस्तर माहिती घेऊन तेथील ओ.बी.सी.प्रवर्गातील विद्यार्थिनींना लाभ देण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. चुकीच्या माणसांकडे ही रक्कम जाऊ नये याची शासन काळजी घेत आहे. यासंबंधी येत्या दोन, तीन दिवसात ऑर्डर निघणार आहेत. नर्सिंग कोर्सेससाठी ज्या विद्यार्थीनी प्रवेश घेतील त्यांना केंद्र शासनाच्या गाईड लाईन्स प्रमाणे त्यांना शिष्यवृत्ती देण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी वैश्य वाणी समाजाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. वैश्य वाणी समाजाला ओ.बी.सी.मध्ये घेण्यासंदर्भातील नॉर्मस् पूर्ण केलेले नाहीत असे हायकोर्टाने सांगितले आहे. नॉर्मस् पूर्ण करण्याची प्रक्रिया सुरु आहे. यासंदर्भात कमिशनचा रिपोर्ट यावयाचा आहे. त्यानंतर हा विषय मंत्रिमंडळापुढे जाईल. तो विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्य होईल असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, आम आदमी विमा योजने संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. अर्ज केला असेल तरच अर्जदाराला लाभ मिळू शकतो. ती गोष्ट बरोबर नाही. यामध्ये ॲटोमॅटीक व्यवस्था असली पाहिजे. त्यासाठी सपोर्टीग आधार कार्ड आहे. अशा गोष्टींचे समर्थन घेऊन, आम आदमी विमा योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. गरीब माणूस अर्ज करु शकत नाही. गरिबांनी अर्ज केला नाही तरी त्यास या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे म्हणून शासनामार्फत सक्रीय अशा प्रकारचा निर्णय घेण्यात येईल.

सभापती महोदय, ऊस तोड कामगार महाराष्ट्रातील बऱ्याच जिल्हयात आहे. त्यांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून पुरवणी मागणी मांडण्यात आली आहे. ऊस तोड कामगारांना रोजच कामावर जावे लागते. त्यामुळे त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची आबाळ होते. ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा इयत्ता सातवी पर्यंत होती. त्या मुलांना इयत्ता 10 वी पर्यंत शिक्षण घेता यावे म्हणून निवासी शाळा सुरु करीत आहोत. यापुढच्या काळात निवासी शाळा मोठया प्रमाणात वाढल्या पाहिजेत असा शासनाचा प्रयत्न आहे.

4...

श्री. शिवाजीराव मोघे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, परदेशी शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्यात यावी व लाभार्थ्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी या ठिकाणी करण्यात आली आहे. परदेशी शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे सिलेक्शन होते, त्यानंतर त्याला शिष्यवृत्ती देण्यात येते. परदेशात शिक्षण घेण्यासाठी कितीही शैक्षणिक शुल्क असले तरी तेवढे शैक्षणिक शुल्क शासन उपलब्ध करुन देत असते.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे.....

जे लाभार्थी आहेत त्यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने या पुढील काळात व्यवस्था होईल यासाठी शासनाचे प्रयत्न राहणार आहेत. सभागृहाने सामाजिक न्याय विभागाच्या पूरक मागण्या मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी निवडणुकीच्या संदर्भात सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत अशी सूचना केली आहे. वास्तविक सीसीटीव्ही कॅमेरे शासनाकडून लावले जात नाहीत. निवडणूक आयोगाला सूचना करावी लागेल. त्याप्रमाणे या पूरक मागणीमध्ये 32 कोटी रुपये मागितले आहेत. 90 कोटी रुपयांचा खर्च स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी ग्रामविकास विभागाकडून देण्यात आला आहे. माननीय सदस्यांची अतिरिक्त सोय करण्याची सूचना निवडणूक आयोगाकडे पाठवावी लागेल.

सभापती महोदय, माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी कॅशबुक अद्ययावत ठेवण्याबाबत सूचना केली आहे. कॅशबुक अद्ययावत ठेवण्यासाठी व्यवस्था करुनही कॅशबुक अद्ययावत आढळले नाही तर जागच्या जागी कारवाई करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी जिल्हा परिषदेची मालमत्ता जिल्हा परिषदेच्याच नावे असावी याबाबत सूचना केली आहे. जिल्हा परिषदांनी अद्याप आपल्या अचल मालमत्तेवर आपले नाव लावले नसेल तर ते लावावे अशा सूचना महाराष्ट्रात दिल्या गेल्या आहेत. 7/12 वर नाव लावण्याची कायदेशीर प्रक्रिया लक्षात घेता महसूल विभागाने एकत्रित सूचना द्याव्यात असा प्रस्ताव ग्रामविकास विभागामार्फत महसूल विभागास सादर केला आहे. लवकरच त्याच्यावर कार्यवाही होईल. महसूल विभागामार्फत एकच आदेश दिले गेले तर महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी जुन्या लोकल बोर्डाच्या नावावर जागा आहेत त्या सर्व जागा जिल्हा परिषदांच्या नावावर करण्याची व्यवस्था होऊ शकते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी दोन सूचना केलेल्या आहेत. ग्रामपंचायतीचे विभाजन करुन नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी जनरल कॅटगरीची 2000 लोकसंख्या असावी लागते आणि आदिवासी भागातील वाडा-तांड्यासाठी लोकसंख्येचे प्रमाण 1000 इतके निश्चित केले आहे. एखादे गाव लहान असेल आणि त्या संपूर्ण गावाचे 100 टक्के दुसरीकडे पुनर्वसन झाले असेल मूळची ग्रामपंचायत होती तोच दर्जा त्यांना पुढे देण्याची व्यवस्था अलीकडेच केली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार जर 2000 पेक्षा जास्त लोकसंख्या असेल तर त्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल. तसा प्रस्ताव त्यांनी निदर्शनास आणून द्यावा. माननीय सदस्यांनी दुसरा एक मुद्दा उपस्थित केला आहे तो म्हणजे ग्रामपंचायतींना अ,ब,क व ड असा दर्जा देण्यात यावा.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील.....

आमच्या विभागात यावर ग्रेडेशन कशा प्रकारे करावयाचे याविषयीची कार्यवाही करण्यासाठी एक छोटा गट तयार करण्यात आलेला असून त्याच्या दोन तीन बैठका सुध्दा झाल्या आहेत. ग्राम पंचायतींचे ग्रेडेशन करताना कोणते निकष लावावेत याचीही चर्चा सुरु आहे. त्यात लोकसंख्या हा मुख्य निकष असणारच आहे. त्याचबरोबर आर्थिक निकष, सेवा व सुविधांचा निकष, उत्पन्नाचे निकष, शहरालगतच्या ग्रामपंचायतींचे उत्पन्न जास्त असल्याने अशा प्रकारचे निकष लावणे जरुरीचे आहे. या निष्कर्षाप्रत आल्यानंतर तशी माहिती सदनात दिली जाईल. मुख्यत: ठाणे, रायगड, पुणे, नाशिक जिल्ह्यातील अनेक ग्राम पंचायतींचे उत्पन्न जास्त आहे. त्यामुळे या पैशाचे नियोजन होणे व त्याच्या खर्चाचा ताळमेळ व्यवस्थित राहणे यादृष्टीने आपण ग्राम पंचायतींना कॅटेगराईज्ड करीत आहोत व ते काम लवकरच होईल अशी माझी खात्री आहे.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जिल्हा परिषदांच्या संदर्भात अशी सूचना केली की, जिल्हा परिषदेच्या पातळीवर ज्या विविध समित्या निर्माण केल्या जातात त्यामध्ये जवळपास सर्वच विषय येतात. हे काम एकत्रितपणे मिळून-मिसळून करावे आणि जिल्हा परिषदा चालवाव्यात अशी कल्पना आहे. कारण सामोपचाराने काम झाले तर कामही वेगाने होते असा अनुभव असल्यामुळे विरोधी पक्षनेते पद जिल्हा परिषदेत निर्माण करुन नवीन आर्थिक सोर्स तयार करण्याच्या दृष्टीने जास्त गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. पण हे आताच सांगणे योग्य नाही, कारण त्याला वेळ द्यावा लागेल. विरोधी पक्षनेते पद निर्माण केले तर त्यामुळे खर्च वाढेल. इतकी वर्षे हे पद नव्हते पण तरी देखील सूचना चांगली असली तरी त्याचा अभ्यास करुनच योग्य तो निर्णय घेतला जाईल. एवढे सांगून ग्राम विकास विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत (रोजगार हमी मंत्री योजना व जलसंधारण मंत्री) : महोदय, सन 2011-12 च्या पूरक विवरण पत्राच्या माध्यमातून रोजगार हमी व जलसंधारण विभागाच्या मागण्यांवर आपले विचार व्यक्त करताना डॉ. नीलम गोऱ्हे यांनी रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत पंचायत राज समितीने काही सूचना दिलेल्या आहेत पण त्यांची अंमल बजावणी होत नाही, असा मुद्दा मांडला, त्यासंदर्भात मी इतकेच सांगू इच्छितो की, सदर बाब तपासणी करुन आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. तसेच सिल्लोड, जि. औरंगाबाद या तालुक्यात मागणी करुनही मजुरांना काम मिळत नाही असेही त्यांनी निदर्शनास आणले. पण मी खात्रीने सांगतो की, अशी परिस्थिती अजिबात नाही. शासनाने यावर्षी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे राज्यात मजुरांची संख्या जवळपास 6.15 लाख इतकी आहे. आतापर्यंत आपण 439.43 लक्ष इतकी मनुष्य दिवस निर्मिती केलेली आहे. आजतागायत त्यावर 1000 कोटी रुपये आपण खर्च केलेले आहेत. मागील वर्षी 350 कोटी रुपये या योजनेवर खर्ची पडले होते. पण यावर्षी आपण पहिल्यांदाच चार आकडी खर्चापर्यंत गेलो आहोत. तसेच एमआयएस वर 972.19 कोटी रुपये इतका खर्च दाखविला आहे. औरंगाबाद जिल्ह्यात सुध्दा 28529 इतके मजूर आजही कामावर आहेत.

सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी जलसंधारणाच्या संदर्भात सूचना केली की, शासनाने शिरपूर पॅटर्नप्रमाणे राज्यात नाला खोलीकरण व गाळ काढण्यासाठी योजना सुरु करावी. या अनुषंगाने मी असेही सांगेन की, अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यात बेंबडी या गावात नाला खोल करुन गाळ काढण्यात आला त्यासाठी जो पथदर्शी प्रकल्प राबविला त्या कार्यक्रमासाठी 90 लाख रुपयाचा निधी सुध्दा आपण उपलब्ध करुन दिला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत .....

या कामाचे तज्ज्ञ पथकाकडून मूल्यमापन केले जाईल व ही योजना राज्यभर राबविण्याचा निर्णय घेतला जाईल असे या निमित्ताने नमूद करु इच्छितो. त्यामुळे सन 2012-2013 च्या रोजगार हमी योजना तसेच जलसंधारण विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी सभागृहाला विनंती करतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (कृषी मंत्री) : सभापती महोदय, कृषी विभागाच्या बाब क्रमांक 27 ते 31 या पूरक मागण्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण, सन्माननीय सदस्य डॉ. गो-हे, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी चर्चेमध्ये भाग घेतांना काही सूचना केलेल्या आहेत. विशेष करुन पीक उत्पादन खर्चा संबंधी कृषी मूल्य आयोगाला एस्टिमेट पाठविण्यास विलंब होत असतो. यासंदर्भात केंद्रीय कृषी मूल्य आयोगाने गाईडलाईन तयार केलेल्या आहेत. बहुतांशी कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून केंद्रीय कृषी मूल्य आयोगाला कळवली जात असते. एस्टिमेट पाठविण्यास विलंब होतो ही बाब बरोबर असून यामध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सभापती महोदय, राज्य शेती माल समितीच्या पुनर्रचनेच्या बाबतीतील प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून या महिना भरात यासंदर्भातील समितीची स्थापना करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, उत्तर प्रदेश सरकारच्या बटाटा खरेदी करण्याच्या धर्तीवर सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत परंतु राज्य सरकारला सर्व शेतीमालाच्या मार्केट इंटर्व्हेन्शनच्या संदर्भात एक नवीन धोरणच घ्यावे लागणार आहे. यासाठी जी काही रक्कम लागणार आहे व त्यासाठी जी काही यंत्रणा लागणार आहे ती विकसित करावी लागणार आहे परंतु यासंदर्भात जेव्हा संपूर्ण अर्थसंकल्प मांडला जाईल त्यावेळेस यासंदर्भातील योजना मांडण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी आंबा पिकाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. आंबा पिकाचे ज्या ज्या वेळेस नुकसान झालेले आहे त्या त्या वेळेस राज्य सरकारने आंबा उत्पादक शेतक-यांना मदत केलेली आहे. आंबा पिकावर हवामानाच्या बदलामुळे जे परिणाम होतात त्यासंदर्भात कोकण विद्यापीठामध्ये 226 आंब्याच्या जातीवर संशोधन सुरु आहे. हवामानचा बदल तसेच ग्लोबल वॉर्मिंगचा विचार करुन कोकण विद्यापीठातून चांगल्या प्रकारच्या व्हरायटी निर्माण होतील व ही आंब्याची रोपे शेतक-यांना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही कोकण कृषी विद्यापीठाकडून सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेबांनी काजू पासून वाईन निर्माण करण्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. काजू पासून वाईन निर्माण करण्याच्या संदर्भात कोकण कृषी विद्यापीठाने शिफारस केलेली आहे. परंतु यासंदर्भात जेवढे संशोधन व्हावयास पाहिजे होते तेवढे संशोधन झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. काजू पासून वाईन निर्मिती करण्याच्या संदर्भात विद्यापीठामध्ये संशोधन सुरु असतांना पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिपमध्ये एखादी खाजगी संस्था पुढाकार घेत असेल तर तशा पध्दतीच्या सूचना विद्यापीठाला देण्यात येतील. या सर्व प्रकल्पासाठी मिळणारे जे अनुदान आहे त्यासाठी केंद्र सरकारकडे वेळोवेळी आपण पाठपुरावा करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांबद्दल मी आभारी आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी कृषी विद्यापीठात सेंद्रीय शेती विषयचा अभ्यासक्रम असावा आणि शालेय अभ्यासक्रमात कृषी विषयक अभ्यासक्रम अंतर्भूत करण्यासंबंधी सूचना केली आहे. यासंबंधी शालेय शिक्षण विभागा बरोबर चर्चा सुरू आहे. ऑप्शनल सब्जेट म्हणून इयत्ता सातवी पासून अभ्यासक्रम सुरू करता येईल काय, याचा विचार खरे तर शालेय शिक्षण विभागाने केला पाहिजे. आमचा विभाग या संबंधातील शिफारस शालेय शिक्षण विभागाला जरूर करेल. कृषी विद्यापीठाने सेंद्रीय खता विषयी वेळोवेळी होणाऱ्या संशोधना विषयीची माहिती अभ्यासक्रमात अंतर्भूत केलेली आहे. त्यामुळे स्वतंत्र अभ्यासक्रम सुरू करण्याची आवश्यकता नाही, एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो. कृषि विभागाच्या बाब क्रमांक 27 ते 31 या मागण्या मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र गावित (आदिवासी विकास राज्यंमत्री) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या आदिवासी विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेत सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी भाग घेतला.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आदिवासी उप योजना क्षेत्रा बाहेर बोगस आदिवासी लोकसंख्या दाखवून ठक्कर बाप्पा योजनेसह आदिवासी विकास विभागाच्या अन्य योजना राबविण्यात येत आहेत असे सांगितले आहे. त्यांनी त्यांच्या अलिबाग मतदार संघातील बारसेत गावात अजूनही वीज नाही, रस्ते नाहीत असे निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे येथे ठक्कर बाप्पा योजनेच्या माध्यमातून त्याची पूर्तता करण्यात येईल.

आदिवासी क्षेत्रामध्ये आदिवासी लोकप्रतिनिधी असल्यामुळे आदिवासींची बऱ्यापैकी कामे होतात. ओटीएसपीचे क्षेत्र आहे तेथे आता जातीने लक्ष दिले जाईल. तसेच ज्या प्रीमिटीव्ह ट्राईब्ज आहेत, ओटीएसपीच्या बाहेरील जमाती आहेत त्यासाठी विशेष निधी उपलब्ध केला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आदिवासी विभागा अंतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा, वसतिगृह यांच्या दूरवस्थेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. ठाणे जिल्ह्यात असू दे किंवा राज्यातील अन्य जिल्ह्यात असू दे विद्यार्थ्याने घरी शिक्षण घेतले काय आणि आश्रमशाळेत राहिला काय यात फारसा फरक नाही असा उहापोह त्यांनी केला आहे. श्री.चंदनशिवे, कक्ष अधिकारी यांच्याबद्दल देखील मत व्यक्त केले आहे. श्री.चंदनशिवे यांनी निधी संबंधी अडवणूक केली अशा प्रकारचे गंभीर आरोप सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी केले आहेत. याबाबत श्री.चंदनशिवे, कक्ष अधिकारी यांच्या विरूद्ध निश्चित अशी कारवाई केली जाईल.

या आर्थिक वर्षामध्ये जवळ जवळ 94 आश्रमशाळांच्या इमारती व 26 वसतिगृहांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. येणाऱ्या काही वर्षांमध्ये 552 आश्रमशाळांसाठी जवळ जवळ 630 कोटी रूपये राखून ठेवण्यात आलेले आहेत. येणाऱ्या काही वर्षामध्ये निश्चितच ह्या इमारती पूर्ण केल्या जातील. ह्या इमारती महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या राहतील.

आदिवासी विभागामध्ये रिक्त पदे आहेत. आदिवासी विभागाच्या क्षेत्रीय आस्थापनेवर अनुशेषाची वर्ग 2 आणि वर्ग 3 ची 450 पदे भरण्याची जाहिरात देण्यात आलेली आहेत.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तसेच नाशिक विभागाअंतर्गत जवळजवळ 875 शिक्षक संवर्गाची जी पदे आहेत, ती पदे सुध्दा लवकरच भरण्यात येतील आणि 680 पदे भरण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी ठाकर समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करावा अशा प्रकारची मागणी केली असून सुप्रीम कोर्टाच्या गाईड लाईनमुळे यामध्ये एक टेक्नीकल अडचण निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत साहेब आणि मी असे दोघांनी बऱ्याच वेळेला शासकीय आश्रमशाळा, वसतीगृहे याठिकाणी संयुक्तपणे भेटी दिलेल्या आहेत. म्हणून निर्वाह भत्याच्या संबंधामध्ये आणि आहार खर्चासाठी डिसेंबर 2011 च्या हिवाळी अधिवेशनामध्ये जवळजवळ 89 कोटी रुपयांची पूरक मागणीव्दारे तरतूद करुन आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे हा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्यानुसार आयुक्त कार्यालयाकडून निर्वाह भत्त्याची आणि आहार खर्चाची तरतूद प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मार्फत तेथे उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच तालुका स्तरावर निर्वाह भत्त्यामध्ये हा दर महिन्याला 50 रुपयावरुन 500 रुपयापर्यंत वाढ केलेली आहे. तसेच जिल्हा स्तरावर निर्वाह भत्त्यामध्ये 250 रुपयावरुन जवळजवळ 600 रुपयापर्यंत वाढ केलेली आहे आणि विभागीय स्तरावर निर्वाह भत्त्यामध्ये 300 रुपयावरुन 800 रुपयापर्यंत वाढ केलेली आहे.

तसेच सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी महत्वाचा प्रश्न उपस्थित केला की, सर्प दंश होऊन मृत्युमूखी पडलेल्या विद्यार्थ्यास सानुग्रह अनुदान किती देणार आहात ? याबाबत सांगावयाचे तर सर्पदंश झाल्याने मृत्युमुखी पडलेल्या विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांना जवळजवळ 75 हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याच्या बाबतीत जी.आर.काढलेला आहे.

श्री.संजय केळकर (खाली बसून) : प्रकल्प अधिकारी श्री.खाटीकच्या बाबतीत काय कारवाई केली जाणार आहे?

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : मुलांना चार महिने निर्वाह भत्ता मिळालेला नाही. याबाबतीत मी आपल्याला गावांची नावे देखील सांगू शकतो. या मुलांना निर्वाह भत्ता कधी देणार आहात ?

श्री.राजेंद्र गावित : सभापती महोदय, याबाबतीत सांगावयाचे तर अधिवेशनापूर्वी प्रत्येक जिल्हा निहाय निर्वाह भत्ता देण्याच्या दृष्टीने निधीचे वितरण करीत असतो,तसेच समाननीय सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र गावित . . . .

श्री.संजय केळकर साहेबांनी प्रकल्प अधिकारी श्री.खाटिक यांच्या बाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. ते मुळामध्ये कृषी विभागामध्ये होते. त्यांनी भ्रष्टाचार किंवा गैरप्रकार केल्याचे सकृत दर्शनी आढळून आले नाही. याबाबतीत त्यांची सखोल चौकशी करुन त्यांना संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात आलेले आहे. आदिवासी विकास विभागाच्या बाब क्र.124 ते 133 अशा एकूण 10 पुरवणी मागण्या असून एकूण 76 कोटी, 13 लाख 81 हजार इतकी रक्कम आहे. सभागृहाने याला मंजुरी द्यावी अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करीत आहे.

---

3 व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, गृह विभागाशी संबंधित असलेल्या बाब क्रमांक 5 ते 12 आणि 14 अशा एकूण 10 बाबी असून एकूण या बाबींवरील खर्च 34 कोटी 47 लाख 22 हजार एवढा आहे. या पुरवणी मागण्यांना मान्यता देण्यात यावी अशी मी सुरुवातीलाच विनंती करतो.

सभापती महोदय, एकंदरीत राज्य शासनाने ज्या पुरवणी मागण्या मांडलेल्या आहेत त्याच्या तुलनेमध्ये गृह विभागाने ज्या मागण्या सादर केलेल्या आहेत, त्याचे प्रमाण अत्यंत अत्यल्प असून त्या केवळ 34 कोटी रुपयांच्या आहेत. म्हणून यावरील चर्चा सुध्दा अत्यंत अत्यल्पच अपेक्षित आहे. दिल्ली येथे सुप्रीम कोर्टामध्ये वकील नेमलेले आहेत, त्यांची फी देणे, त्याचबरोबर केंद्र सरकार कडून गुंगीकारक द्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थांच्या बेकायदेशीर वाहतुकीला आळा घालण्याकरता जे अनुदान प्राप्त झाले होते त्याची प्रतिपूर्ती करणे, त्याचबरोबर मागील काळामध्ये राज्यामध्ये तीन ठिकाणी जे गोळीबार झाले होते त्या संबंधात ज्युडिशिअल इन्क्वायरी नेमली, त्यामुळे त्यासाठी येणारा खर्च.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

राज्यामध्ये सण, समारंभ त्याच बरोबर निवडणुका यासाठी होमगार्डचे अतिरिक्त मनुष्यबळ वापरण्यात आले, त्यासाठी अतिरिक्त भत्त्याची तरतूद करणे अशा छोट्या छोट्या कारणांसाठी परंतु पोलिसांच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या गोष्टींसाठी मागणी करण्यात आलेली आहे. फक्त 34 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलत असताना माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी 45 हजार पोलिसांची विम्याची रक्कम वेळेत न भरल्यामुळे त्यांची पॉलिसी डिस्कंटीन्यू झालेली आहे असे सांगितले. विम्याचा हप्ता भरण्यासाठी विलंब झालेला आहे हे मी कबूल करतो. परंतु पॉलिसी डिस्कंटयुन्यू झालेली नाही. दिनांक 15.2.2012 रोजी 4 कोटी 97 लाख तर नक्षलग्रस्त विभागासाठी दिनांक 31.1.2012 रोजी 1 कोटी 24 लाख् रक्कम भरलेली आहे. पॉलिसींच्या रकमा उशिरा भरल्या गेल्या परंतु त्या पॉलिसी डिस्कंटयून्यू झालेल्या नाहीत. पोलिसांना देण्यात येणाऱ्या वेतनामध्ये थोडा बदल केल्यामुळे पोलिसांच्या पगारातून त्यांची विम्याची रक्कम न कापता त्यांना पगार देण्यात आला. त्यामुळे हप्ता भरण्यासाठी थोडा वेळ झाला. आता आम्ही त्यामध्ये दुरुस्ती केलेली आहे. यापुढे असा विलंब होणार नाही. पॉलिसीवर कोणताही परिणाम न होता पोलिसांना पॉलिसीचे प्रोटेक्शन मिळेल या दृष्टीने आवश्यक असलेल्या सूचना आम्ही दिलेल्या आहेत. या पुढील काळात तशी दक्षता घेतली जाईल.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी राज्यात अफूचे पीक सापडले त्याबद्दल चिंता व्यक्त केली आणि काही सूचना देखील केल्या. सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी या बाबीचा आधार घेऊन शेतकऱ्यांच्या व्यथा मांडण्याचा देखील प्रयत्न केला. या प्रकरणी सांगली जिल्ह्यामध्ये काही गुन्ह्यांची नोंद झालेली आहे ही गोष्ट खरी आहे. ज्यावेळी पोलिसांनी मला या संदर्भात माहिती दिली की, आम्हाला अशा अशा प्रकारची खबऱ्याकडून माहिती मिळाली आणि आम्ही त्याठिकाणी धाडी टाकल्या असता तेथे तसे पीक आढळून आले आहे. त्यावेळी मी पोलिसांचे अभिनंदन केले आणि दुसरे वाक्य बोललो की, उद्यापासून चर्चा सुरु होईल की,"गृह मंत्र्यांच्या जिल्ह्यात अफूचे पीक." सांगली हा माझा जिल्हा आहे आणि तो राहणारच. तेथे एखादी चुकीची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

गोष्ट घडली तर तो गृह मंत्र्यांचा जिल्हा असतो. परंतु तेथे अनेक मोठ्या चांगल्या गोष्टी घडतात तेव्हा तो जिल्हा गृह मंत्र्यांचा आहे असे कोणी म्हटल्याचे माझ्या ऐकिवात नाही. तेव्हा तसे म्हणण्याची भूमिका भविष्यात दाखवावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पोलिसांना मिळालेल्या माहितीवर त्यांनी धाडी टाकलेल्या आहेत. बीड, पुणे-ग्रामीण, सातारा, सांगली, कोल्हापूर या ठिकाणी काही शेतांमध्ये अफूची लागवड होत असल्याचे आढळून आले. काही संघटनांनी शेतकऱ्यांना हे खसखस पीक आहे म्हणून खसखस पिकविण्याचा प्रयत्न केला. शेतकरी गरीब आहेत तेव्हा त्यांनी हे पीक लावले तर त्याकडे थोडे दुर्लक्ष करा, या पिकाला कायदेशीर मान्यता द्या असे सांगण्यात आले. या बाबत सांगू इच्छितो की, अतिशय मर्यादित क्षेत्रावर हे पीक राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशमध्ये घेतले जाते. या पिकाचे कन्ट्रोल्ड कल्टीव्हेशन केले जाते. केंद्र सरकारचा नार्कोटिक्स विभाग त्यावर नियंत्रण ठेवत असतो. हे पीक कमी क्षेत्रावर घेत असल्यामुळे या पिकाला दर आहे. हे पीक सर्वत्र लावल्यास त्याला काहीच दर मिळणार नाही अशी या पिकाची स्थिती आहे. परंतु या पिकाकडे जगाचा पाहण्याचा दृष्टीकोन अतिशय गंभीरपणाचा आहे. कोणाला चार पैसे जादा मिळत आहेत यापेक्षा तरुण पिढी बिघडणार नाही याही गोष्टीची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे असे पीक घेताना कोणी आढळले तर नार्कोटिक्स ॲक्ट प्रमाणे दहा वर्षाची शिक्षा आहे. परंतु जगातील काही राष्ट्रामध्ये असे पीक घेणाऱ्यास व व्यापार करणाऱ्यास फाशी शिक्षा आहे. म्हणजे अतिरेकी एवढाच हा महत्वाचा गुन्हा मानला जातो. तेव्हा याचे कुणीही समर्थन कामा नये.

सभापती महोदय, पोलिसांना जी माहिती मिळाली त्याप्रमाणे त्यांनी बीड जिल्ह्यामध्ये 5, सांगली जिल्ह्यामध्ये 9, पुणे जिल्ह्यामध्ये 4 , कोल्हापूर जिल्ह्यामध्ये 1, सातारा जिल्ह्यामध्ये 2 अशा एकूण 21 गुन्ह्यांची नोंद केलेली आहे.

यानंतर कु.थोरात..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

72 एकर शेतीमध्ये हे पीक घेण्यात येत असल्याचे आढळून आले आहे. या 72 एकर शोतामधील 3 कोटी 57 लाख रुपयाचे पीक पोलिसांनी उद्ध्वत केलेले आहे. या गुन्हयामध्ये 89 शेतकऱ्यांना अटक करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर हा तपास पुढे नेत असताना आता चार व्यापाऱ्यांनासुध्दा अटक करण्यात आलेली आहे. हे जे उत्पन्न झालेले आहे ते विकण्यासाठी पुढच्या लिंक्स असणार आहेत. त्यामुळे मी या संदर्भात एवढेच सांगू इच्छितो की, या संदर्भात राज्य स्तरावर एक वेगळा सेल निर्माण केला जाईल आणि याची पाळेमुळे खणून काढण्याची आवश्यकता आहे. या गुन्हयामध्ये उत्पादन करणारे शेतकरी दोषी असले तरी यातील काही शेतकरी इनोसंट सुध्दा आहेत. पण हे पीक घेणारे, हे उत्पादन विकणारे आणि ते तरुणांपर्यंत पोहचविणारे जे कोणी गुन्हेगार असतील त्यांच्याकडे बघण्याचा शासनाचा दृष्टिकोन अतिशय गंभीरपणाचा असेल. या संदर्भातील आताचा कायदा देशस्तरावरचा आहे. तो केंद्र शासनाचा कायदा आहे. तो अतिशय कडक कायदा आहे. या कायद्यातील सगळया कलमांचा वापर करुन याच्या व्यापाऱ्यामध्ये जे लोक आहेत त्यांच्यावर कठोरपणाने कारवाया केल्या जातील. पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने या ठिकाणी वेगवेगळया अडचणी मांडण्यात आलेल्या आहेत. या अधिवेशनामध्ये गृह विभागाच्या संदर्भात वेगवेगळया विषयावर चर्चा होणारच आहे. म्हणून आत्ताच सगळयाच गोष्टीचा उल्लेख करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. तरी सुध्दा काही महत्वाचे प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेले आहेत. जेलच्या संदर्भात तेथील महिला कर्मचाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची आय.जी.च्या संदर्भात तक्रार आहे अशा स्वरुपाचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करण्यात आला आहे. शासनाकडे या तक्रारी यापूर्वीच आलेल्या आहेत. त्यांच्या एका शिष्टमंडळाने माझी भेट घेतलेली आहे. दोनच दिवसापूर्वी मी या संदर्भात सूचना केलेल्या आहेत. पोलीस महासंचालक श्री. प्रवीण दीक्षित हे या प्रकरणाची पूर्णपणे चौकशी करतील आणि या संदर्भातील अहवाल एका महिन्याच्या आत शासनाला सादर करतील.

डॉ. नीलम गोऱ्हे : ज्यांची चौकशी करावयाची आहे त्यांच्याकडेच चार्ज असेल तर ती चौकशी योग्य रीतीने होऊ शकणार नाही.

श्री. आर.आर.पाटील : त्यांच्याकडे चार्ज असल्यामुळे ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे ते लोक पुढे येत नाहीत त्यामुळे चौकशीमध्ये व्यत्यय येतो असे अभिप्राय चौकशी अधिकाऱ्यांनी दिले

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

तर या संदर्भात वेगळया भूमिका घेतल्या जातील पण पूर्णपणे चौकशी केली जाईल आणि दोषी आढळून आल्यानंतर जी कारवाई करणे आवश्यक आहे ती निश्चितपणाने केली जाईल.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी या ठिकाणी एक वेगळीच व्यथा व्यक्त केली आहे. 26/11 नंतर अलीबागकडे जाणाऱ्या रात्रीच्या बोटी सुरक्षेच्या कारणास्तव पोलिसांनी बंद केलेल्या आहेत. या बोटी बंद केलेल्या आहेत ही गोष्ट खरी आहे. सुरक्षेच्या बोटींची गस्त वाढविण्यात आलेली आहे. शेवटी मुंबईच्या सुरक्षिततेसाठी काही गोष्टी करणे जसे आवश्यक आहे तसेच अलिबागचे लोक मुंबईमध्ये आल्यानंतर त्यांनी लवकर घरी जावे, त्यांनी रात्री उशिरापर्यंत येथे थांबू नये हाही याच्या पाठीमागचा उद्देश असू शकतो. सुरक्षेच्या दृष्टीने रात्री बोटी सुरु करता येतील काय हे बघणे जसे आवश्यक आहे तसे अलिबागच्या या बोटी रात्री सुरु करण्यामुळे आणि अलीबागचे लोक उशिरा घरी जाण्यामुळे काही परिणाम होईल काय या दोन्हीचा अभ्यास करुन लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी बसवर, गाडयांवर हल्ले करणाऱ्या लोकांना जामीन मंजूर झालेला आहे अशा प्रकारची तक्रार केलेली आहे. ही संपूर्ण केस तपासण्यात येईल आणि यामध्ये अपील करण्याची आवश्यकता भासली तर निश्चितपणाने अपील करण्याची भूमिकासुध्दा स्वीकारली जाईल पण ती केस तपासून या बाबतीतील निर्णय घेतला जाईल. अनेक प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुण्यातील महिला असुरक्षित आहेत. एकेकाळी पुणे हे सुरक्षित शहर होते असा मुद्दा मांडलेला आहे. आपण कदाचित आपल्याच वर्तमानपत्रातील बातम्या वाचतो दुसऱ्या वर्तमानपत्रातील बातम्या वाचत नाही म्हणून असुरक्षित झाल्याची भावना होते. ही गोष्ट खरी आहे की, गुन्हेगारीचे प्रमाण जशी शहरे वाढत आहेत तसे वाढत असले तरी राज्य शासनाने मनुष्यबळ वाढविलेले असल्यामुळे आणि एकंदरितच महाराष्ट्रातील लोक कायद्याचे पालन करणारे असल्यामुळे अन्य राज्यांच्या तुलनेमध्ये फार मोठया प्रमाणात गुन्हेगारी वाढली अशी स्थिती नाही. मी आजही आकडेवारीच्या आधारे सांगू इच्छितो की, आंतरराष्ट्रीय शहरांमध्ये महिलांच्या दृष्टीने असेल किंवा अन्य बाबतीत असेल आपले मुंबई हे शहर सर्वाधिक सुरक्षित शहर मानले जाते आणि भविष्यामध्ये सुध्दा हे शहर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

अधिक सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टिकोनातून ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या निश्चितपणाने शासन करणार आहे. एकेकाळी गँगस्टर येथे डोके वर काढावयाचे पण आज सगळया गँगस्टर्सना नेस्तनाबूत करण्यामध्ये मुंबई पोलिसांना निश्चितपणाने यश आलेले आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

ज्या काही त्रुटी राहात आहेत त्या भविष्यामध्ये आम्ही निश्चितपणे दूर करु. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे प्रश्न उपस्थित केले आहेत ते आम्ही लिहून घेतलेले आहेत. त्या बाबतीत आम्ही लेखी उत्तर सुध्दा देऊ.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी अशी व्यथा व्यक्त केली की, ज्या चौकशा नेमल्या जातात त्या चौकशा लवकर होत नाहीत. मी आपल्या मताशी पूर्णपणे सहमत आहे. अनेक वेळा सभागृहामध्ये न्यायिक चौकशी करण्याची मागणी होते. नंतर आपल्याला हायकोर्टाकडून न्यायाधीशांची नावे घ्यावी लागतात. त्यामध्ये चार-सहा महिने जातात. तसेच सर्व इन्फ्रास्ट्रक्चर तयार करुन द्यावे लागते. त्यामध्ये कोट्यवधी रुपये खर्च होतात आणि ते प्रकरण विसरुन गेल्यानंतर कधी तरी त्या संबंधीचा अहवाल प्राप्त होतो. म्हणून अनेक वेळा शासनाने अशा चौकशा नाकारुन प्रशासकीय चौकशीला प्राधान्य देण्याची भूमिका स्वीकारली. या चौकशांच्या बाबतीत जर आपण बघितले तर सरकारचा प्रामाणिक हेतू होता की, या तीनही गोळीबारांची चौकशी लवकरात लवकर व्हावी. पण या बाबतीतील प्रोसीजरच एवढे लांबलचक आहे आणि प्रत्येक वेळी एवढा वेळ लागतो की, या चौकशा होऊन शासनाकडे लवकर अहवाल येत नाहीत. अशा चौकशांच्या बाबतीत एखाद्या दुर्मिळ घटनेच्या बाबतीत, जर एखादी घटना महत्वपूर्ण असेल तरच अशी चौकशी केली पाहिजे. अन्यथा कोट्यवधी रुपये खर्च होत आहेत आणि खूप उशिरा अहवाल आल्यावर त्याचा काही उपयोग सुध्दा होत नाही असे शासनाला सुध्दा जाणवते. परंतु जालन्याची चौकशी असेल, मावळची चौकशी असेल...

श्री. विनोद तावडे : मावळच्या बाबतीत हायकोर्टाने आजच काय म्हटले आहे ते आपल्याला कळले असेल. आपण काय केलेले नाही याबाबत डायरेक्टीव्हज आलेले आहेत.

श्री. आर. आर. पाटील : मला काही समजलेले नाही. काय केले हे सुध्दा आम्ही हायकोर्टासमोर ठेऊ. परंतु मावळचा गोळीबार असेल किंवा जालन्याचा गोळीबार असेल किंवा नागपूरचा असेल त्यामध्ये सरकारने कोणालाही पाठीशी घालण्याची भूमिका स्वीकारलेली नव्हती. दोन्ही सदनाने जी चौकशी मागितली ती शासनाने मान्य केली. न्यायमूर्तींच्या नेमणुका झालेल्या आहेत आणि आता चौकशीही सुरु झालेली आहे. मी स्वत: न्यायमूर्तींना विनंती करुन लवकरात लवकर या चौकशांचे अहवाल शासनाला प्राप्त व्हावेत या दृष्टीने प्रयत्न करणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. दीपक सावंत : ज्या ठिकाणी ड्रग्ज विकले जातात ते स्पॉट मी सांगितले. त्याबाबत आपण माहिती घ्यावी.

श्री. आर. आर. पाटील : मी स्पॉट लिहून घेतलेले आहेत. लवकरच वरिष्ठ अधिकारी त्या ठिकाणी जातील. एखाद्या दिवशी आपण दोघे संयुक्तपणाने फिरु आणि कोठे मिळतात काय मिळतात ते मलाही दाखवा. जर अधिकारी दुर्लक्ष करीत असतील तर त्यांच्यावरही कठोर कारवाई करु. दिवसाढवळ्या रस्त्यावर उघडपणे विकले जात असेल तर ही बाब तरुण पिढीच्या दृष्टीने गंभीरपणे घेऊ. सभापती महोदय, वेळोवेळी ज्या चर्चा होतील त्यावेळी त्याचे उत्तर आम्ही देऊच. या ठिकाणी ज्या पुरवणी मागण्या आहेत त्या अगदी छोट्या आहेत.

श्री. चंद्रकांत पाटील : कोल्हापूर येथील महिला पोलीस लैंगिक शोषणाच्या बाबतीत अहवाल दोन वर्षे झाली तरी प्राप्त झाला नाही.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, या बाबत बोलले नसले तरी ही एक अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. अलीकडच्या काळामध्ये मुलींसाठी 30 टक्के रिझर्व्हेशन ठेवल्यामुळे पोलीस दलामध्ये मुलींची संख्या वाढत चाललेली आहे. त्यामुळे त्यांच्याही सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक आहे. पण कोल्हापूरची घटना जी पहिल्यांदा लोकांच्या चर्चेमध्ये आली त्यामध्ये जणूकाही त्यातील अनेक मुली गरोदर आहेत अशा स्वरुपाची अतिशय चुकीची चर्चा पुढे आली. त्यातील एकच मुलगी जिचे लग्न झाले होते ती गरोदर होती आणि एका मुलीवर अन्याय झाला होता. बाकीच्या मुलींवर कोणताही अन्याय झाला नव्हता आणि बाकीच्या मुलींचा कोणताही दोष नव्हता. पण कधी कधी चर्चा इतक्या व्यापक प्रमाणात केल्या जातात की सगळ्याच मुलींना मान खाली घालून नोकऱ्या कराव्या लागतात. सभापती महोदय, या घटनेचा अहवाल शासनाकडे आलेला आहे. त्या बाबतीत आम्ही लवकरच त्याप्रमाणे कारवाई करु. शासनाला तो अहवाल प्राप्त झालेला आहे. सभापती महोदय, गृह विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्या अशी मी पुन्हा एकदा विनंती करतो

उप सभापती : सन 2011-2012 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

उप सभापती : यानंतर एक शासकीय विधेयक चर्चेला घ्यावयाचे होते पण संबंधित माननीय मंत्री महोदय आता सभागृहात उपस्थित नसल्यामुळे ते विधेयक नंतर चर्चेला घेण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या बिलावरील चर्चेला आम्ही तयार होतो परंतु माननीय मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे बिल झाले नाही याची आपण नोंद घेतली पाहिजे. नाही तर सन्माननीय संसदीय कार्य मंत्री म्हणतात की, आम्ही बिलाच्या बाबतीत सहकार्य करीत नाही. शासनाची तयारी नव्हती म्हणून बिल घेता आले नाही याची आपण नोंद घ्यावी.

उप सभापती : बिलावर आपण नेहमीच सहकार्य करीत आला आहात याचा मी अत्यंत आदरपूर्वक उल्लेख करतो. परंतु माननीय मंत्री महोदयांची मला चिठ्ठी आलेली आहे की, विधानसभेत काही तरी महत्वाचे कामकाज चालू आहे.

श्री. दिवाकर रावते : कोणते मंत्री ?

उप सभापती : माननीय मंत्री महोदय श्री. भास्कर जाधव यांची चिठ्ठी आलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती.....

आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या नगरविकास विभागाशी संबंधित असलेल्या विधेयकाबाबत माननीय नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी ते विधानसभा सभागृहातील कामकाज व्यस्त असल्यामुळे सदर विधेयक पुढे ढकलण्याबाबत मला विनंती केली आहे. त्यामुळे सदर विधेयक पुढे ढकलण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे अर्ध्या तासाच्या चर्चा उद्या घेण्यात येतील.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, गुरुवार, दिनांक 22 मार्च, 2012 रोजी सकाळी 11 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक संध्याकाळी 5 वाजून 25 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 22 मार्च, 2012 च्या सकाळी 11 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही